18-07-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1
ABG/ D/ MMP/ 11:00

**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**सभापती** : तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न क्रमांक 41695 हा माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी विचारलेला आहे. ते दिंडीला निरोप देण्याकरिता गेलेले असल्यामुळे ते येईपर्यंत हा प्रश्न चर्चेला घेऊ नये, अशा प्रकारचे त्यांनी लेखी पत्राव्दारे व दूरध्वनीव्दारे मला कळविले आहे. त्यामुळे ते येईपर्यंत हा प्रश्न चर्चेला घेत नाही. ते सभागृहात आल्यानंतर तो प्रश्न चर्चेला घेण्यात येईल.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक 1 व अनुक्रमांक 6 हे दोन्ही प्रश्न एकत्रितपणे चर्चेला घ्यावीत अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे.

**तारांकित प्रश्न क्रमांक 41838**

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात निकृष्ट दर्जाचे व**
**कालबाह्य औषधे रुग्णांना पुरविले जात असल्याबाबत**

**(३) * ४२६५१ डॉ.रणजित पाटील, श्री.नागो पुंडलिक गाणार, श्री.प्रवीण पोटे पाटील, श्रीमती शोभाताई फडणवीस, ॲड.आशिष शेलार, श्री.विनोद तावडे, श्री.चंद्रकांत पाटील, श्री.जयप्रकाश छाजेड, श्री.संजय दत्त, श्री.मोहन जोशी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.सुभाष चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.गोपीकिसन बाजोरिया, श्री.नितीन गडकरी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरोग्य विभागाकडून पुरविले गेलेले घाण व शेवाळ युक्त सलाईन जिल्हा स्त्री रुग्णालय, अमरावती येथील रुग्णांना लावले जात असल्याच्या घटना तसेच २५०० दूषित सलाईन माहे एप्रिल, २०१३ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आल्या, हे खरे आहे काय,

(२) तसेच दिनांक १ मे, २०१३ च्या सुमारास अमरावतीचे पालकमंत्री जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना सामाजिक कार्यकर्त्यांनी रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सलाईन साठा सन २००६ पासून सदर रुग्णालयात होता व मुदतबाह्य होता हे निदर्शनास आणून दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यपालन अधिकारी यांना चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत, तसेच सदर सलाईनच्या बाटल्या मध्य प्रदेशातील पोस्ट दुधिया, असारवाड येथील पॅरेंटरेअल ड्रग्स (इंडिया) लि. कंपनीद्वारा निर्मित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर सलाईन कम्पाउंड, सोडियम, लैक्टेट इंजेक्शन आयपी नावाने असून त्याचा पुरवठा आरोग्य संचालक कार्यालयातूनच संपूर्ण राज्यभर करण्यात आल्याची माहिती आढळून आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर सलाईन बॉटल रिकामी करण्याचे पत्र पोलीस प्रशासनाने आरोग्य विभागाला व तसेच या प्रकरणी दोषी असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवरही फौजदारी कारवाई करावी असे निर्देश राज्याच्या आरोग्य सचिवांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, अन्न व प्रशासन विभागाने सलाईनचे नमुने मुंबई येथील प्रयोगशाळेत पाठविले आहेत, हे खरे आहे काय,

३...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.४२६५१....

(७) असल्यास, सदर नमुन्याचे अहवाल प्राप्त झाल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार सीईओ, जि.प.,डि.एच.ओ. व अधिक्षक तसेच जिल्हा स्त्री रुग्णालय व जिल्हा परिषदेच्या औषध विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.सुरेश शेट्टी** : (१) अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयामध्ये दिनांक २७.०४.२०१३ रोजी गळती असलेल्या व तडे गेलेल्या आयव्ही रिंगर लॅक्टेट ५०० एम.एल.बॉटलमध्ये Fungus निदर्शनास आले. तथापि, सदर आयव्ही रिंगर लॅक्टट ५०० एम.एल.बॉटलचा रुग्णांकरिता वापर करण्यात आलेला नाही.

(२) अशा प्रकारची तक्रार मा. पालकमंत्री यांच्याकडे करण्यात आली होती.

(३) होय.

(४) आय.व्ही.रिंगर लॅक्टेट ५०० एम.एल.बॉटल हे उत्पादन वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचलनालयाच्या दिनांक १९.०९.२००९ च्या दर करारानुसार दिनांक १९.०९.२००९ ते १८.०९.२०११ या कालावधीकरिता दर करारावर उपलब्ध होते. सह संचालक आरोग्य सेवा (प्रा.आ.कें.-जि.प.स्तर) मुंबई यांनी दिनांक २८.०१.२०११ च्या खरेदी आदेशान्वये म्हणजेच सन २०१०-११ या आर्थिक वर्षात एकूण ८००५० इतक्या आय.व्ही.रिंगर लॅक्टेट ५०० एम.एल.बॉटलचे खरेदी आदेश मे.पॅरेंन्टल ड्रग्ज इंडिया प्रा.लि. यांना दिले होते.

(५) नाही.

(६) होय.

(७) मे.पॅरेंन्टल ड्रग्ज इंडिया प्रा.लि., इंदोर (म.प्र.) यांनी स्त्री रुग्णालय अमरावती करीता पुरवठा केलेल्या बॅच नंबर १ डी-२६८ च्या आय.व्ही.रिंगर लॅक्टेट ५०० एम.एल.बॉटलचे अन्न व औषध प्रशासन अमरावती यांनी ताब्यात घेतलेल्या गळती नसलेल्या व तडे नसलेल्या बॉटलच्या नमुन्यांचा तपासणी अहवाल प्राप्त झालेला असून सदर अहवालात सॅम्पल गुणवत्तेनुसार (Sample is of STANDARD QUALITY) असल्याचे नमूद केलेले आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, अमरावती येथे एकमेव जिल्हा स्त्री रुग्णालय आहे. १९० खाटांच्या या रुग्णालयात ३०० पेक्षा जास्त रुग्ण ॲडमीट असतात. या रुग्णालयात वर्ग-१ ची ५ पदे आहेत, त्यातील ४ पदे रिक्त आहेत. ९००० प्रसूती, ३००० सिझरीन आणि अन्य आजार अशा

४...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जवळपास १२ ते १४ हजार शस्त्रक्रिया या रुग्णालयात होत असतात. त्यामुळे तेथे कायम औषधांचा तुटवडा भासतो. औषधांचा तुटवडा भासल्यानंतर जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या कार्यालयाकडून लोन बेसीसवर औषधे घेतली जातात. लोन बेसीसवर घेतलेल्या रिंगर लॅक्टेटच्या सलाईनमध्ये शेवाळ  व अन्य घाण असलेल्या बाटल्या आढळून आल्या. मी स्वत: रुग्णालयात गेलो. त्यानंतर मी जिल्हा आरोग्य कार्यालयाच्या भंडारगृहात गेलो. त्या भंडारगृहाची परिस्थिती अतिशय भनायक असल्याचे माझ्या निदर्शनास आले. जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या कार्यालयाचे औषधे ठेवण्याचे भंडारगृह हे २० वर्षापूर्वी सिमेंटने बांधण्यात आलेले आहे. सलाईनची बाब उघडकीस येण्यापूर्वी एक दिवस अगोदर श्री.शिंदे, ड्रग इन्स्पेक्टर तेथे गेले होते. त्यांनी त्यांच्या अहवालात स्पष्ट म्हटले आहे की, या भंडागृहातील तापमान, व्हेंटीलेशन, लाईट कंडीशन हया इनप्रॉपर आहेत. एक दिवस अगोदर त्यांनी अहवालात हया बाबी नमूद केलेल्या आहेत. फस्ट एक्सपायरी फस्ट आऊट असे औषधी वापरण्याचे एक सूत्र असते. औषधी प्राप्त झाल्यानंतर त्याचा प्रथम वापर केला जातो. रिंगर लॅक्टेट सलाईन्स हया २०११ मध्ये खरेदी केल्या होत्या. त्यानंतर बरीच औषधे आली. त्या बाहेर ठेवल्या गेल्या आणि त्याचा वापर केला गेला. फस्ट एक्सपायरी फस्ट आऊट हे सूत्र लावले गेले नाही म्हणून सदरची औषधे अडीच ते तीन वर्षे तशाच डम करुन ठेवल्या गेल्या. त्या ठिकाणी औषधांचा साठा करण्यात येणारे भंडारगृह बरोबर नाही. फस्ट एक्सपायरी फस्ट ऑऊट हे सूत्र वापरले गेले नाही, ड्रग इन्स्पेक्टरने जो अहवाल दिला होता, त्या बाबतीत कार्यवाही केली नाही, जिल्हा आरोग्य विभागाच्या भंडारगृहाचे वेळोवेळी इन्स्पेक्शन झालेले दिसून येत नाही. या बाबतीत ज्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी काम करावयाचे असते, त्यांनी ते काम केले नाही. म्हणून काम न करण्याऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल काय ? मी या अनुषंगाने आजुबाजूच्या जिल्हयातील देखील माहिती घेतली आहे. त्या जिल्हयांमध्ये देखील औषधांचा साठा करण्यासाठी बांधण्यात आलेल्या भंडारगृहाची अशीच परिस्थिती आहे. म्हणून एनआरएचएमच्या निधीतून काही जिल्हयांमध्ये भंडारगृहाची बांधकामे करण्यात येतील काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्या बाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, गेल्या वर्षी शासनाने संपूर्ण राज्यात ड्रग स्टोअरेज युनीट निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या निर्णयाच्या अनुषंगाने ८ ठिकाणी ड्रग सेंट्रलाईज युनीट

५...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निर्माण केले आहेत. नवीन प्रॉक्यूअरमेंट पॉलिसीची अंमलबजावणी करीत आहोत. त्याप्रमाणे प्रथम या ८ सेंट्रलाईज युनीटमध्ये ड्रग येते. त्यानंतर या युनीटमधून सर्व ठिकाणच्या रुग्णालयांना ड्रगचे वितरण केले जाते. डब्ल्यू.एच.ओ.नॉर्म प्रमाणे हे सेंट्रलाईज युनीट निर्माण केले आहेत. आता शासनाने जिल्हा स्तरावर अशा प्रकारचे वेअर हाऊस निर्माण करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यासाठी एनआरएचएम आणि राज्य शासनाच्या बजेटमधून प्रोव्हीजन केलेली आहे. आपण प्रत्येक जिल्हयात ड्रगचे वेअर हाऊस हे डब्ल्यू.एच.ओ.नॉर्म प्रमाणे करणार आहोत.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42651..... श्री.सुरेश शेट्टी.....

त्याचे काम ऑलरेडी सुरु केले आहे. औषधांची मॉडर्न स्टोरेज कपॅसिटी कशी करायची याचा निर्णय घेऊन कामाला सुरुवात केली आहे. अमरावती येथील रुग्णालयाची इमारत ही 100 ते 125 वर्षे जुनी आहे. त्या इमारतीच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. मागील वर्षी जवळजवळ 25 ते 30 कोटी रुपये खर्च केलेले असून यावर्षी देखील काही निधी खर्च होणार आहे. जून्या इमारतीमध्ये नवीन स्टोरेज युनिटचे काम सहा महिन्यात पूर्ण होईल.

सभापती महोदय, राज्यात सर्व ठिकाणी असे युनिट करणार आहोत. फक्त अमरावतीमध्ये हे काम करणार असे नाही. जून्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये ड्रग्ज स्टोरेज रुमची संकल्पना नव्हती. औषधे गोडावूनमध्ये ठेवण्यात येत असत. आता ड्रग स्टोरेज रुम रिव्हॅम्प करुन रिफ्रीजरेशन आणि स्टोरेजची प्रोव्हीजन वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या नॉम्सप्रमाणे करणार आहोत. मूळ प्रश्न सलाईनच्या संदर्भात विचारला होता. सलाईनची खरेदी 2011 मध्ये झाली आहे. तेव्हा प्रोक्यूरमेंट ई-टेंडरिंग करीत नव्हतो. ही खरेदी डीएमईआर आणि इएसआयएसच्या रेट कॉन्ट्रॅक्टनुसार करीत आहोत. पूर्वीची प्रोक्यूरमेंट केली त्यानंतरची सर्व खरेदी ई-टेंडरिंगप्रमाणे करीत आहोत. प्रोक्यूरमेंटमध्ये आयव्ही रिंगर लॅक्टेट विकत घेतली त्यामध्ये कुठेही दोष आढळलेला नाही. आवश्यक असेल तर एफडीएच्या अहवालाची प्रत मी पटलावर ठेवावयास तयार आहे. बॉटलमध्ये लिकेज झाले. एक बॉटल स्लाईटली क्रॅक झाल्याने त्या बॉटलमध्ये फंगस आले. अशा बॉटल चेक करण्याची एक नॉर्मलाईज प्रोसीजर आहे.

सभापती महोदय, आपण प्रत्येक हॉस्पिटलमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरापर्यंत नवीन सॉफ्टवेअर कॉम्प्युटरमध्ये लोड करुन फार्मासिस्टना ट्रेनिंग देत आहोत. या सॉफ्टवेअरव्दारे मंत्रालयात आणि आरोग्य सेवा संचालनालयामध्ये बसून प्रा.आ.केंद्राच्या लेव्हलपर्यंत एकूण ड्रग्जची क्वॉंटीटी किती आहे, एक्स्पायरी डेट काय आहे हे आपल्याला कळते आणि त्याबद्दलचा ॲलर्ट आरोग्य सेवा संचालनालयापर्यंत येतो.This software is already placed on computers. सन्माननीय सदस्यांना मी स्वत:सोबत घेऊन जाऊन ही प्रक्रिया कशी घडते हे दाखविण्यास तयार आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, सलाईन खरेदी 2011 मध्ये केल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले. सलाईन खरेदी केल्यानंतर त्याची एक्स्पायरी डेट किती कालावधीनंतरची असते? ज्या कंपनीला खरेदीचे आदेश दिले त्यांनी आतापर्यंत किती सलाईनचा पुरवठा केला, त्या सलाईनच्या साठ्याबाबत चौकशी केली आहे काय?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42651.....

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, वस्तुस्थिती अशी आहे की, वॉर्डमध्ये काम करणाऱ्या नर्सने स्वत: सलाईनच्या बॉटलमध्ये फंगस असल्याचे आयडेण्टिफाय केले. तिने ती बॉटल बाजूला काढून ठेवली. स्थानिक आमदार ॲड.यशोमती ठाकूर यांनी रुग्णालयाला भेट दिली त्यावेळी फंगसयुक्त बॉटल त्यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी बॉटलमध्ये फंगस असल्याचे सांगितले. हे शासनाला मान्य आहे. परंतु या बॉटलमधील फंगस रुग्णालयातील एएनएमने आयडेण्टिफाय केल्यानंतर ती बॉटल यूज करायची नाही म्हणून तिने बाजूला काढून ठेवली होती. सलाईनची एक्स्पायरी डेट नॉर्मली 2 ते 3 वर्षानंतरची असते. ज्या सलाईनची खरेदी केली आहे त्याची एक्स्पायरी डेट जून, 2014 आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरापर्यंत ऑनलाईन औषध खरेदी कशाप्रकारे केली जाते हे सांगितले. राज्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये कॉम्प्युटरची सुविधा उपलब्ध आहे का? त्या ठिकाणी वीज पुरवठा खंडित झाल्यास इन्व्हर्टर उपलब्ध आहेत का?

नंतर सी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र**.42651......

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, 90 टक्के पीएचसीमध्ये कॉम्प्युटर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. काही रिमोट एरियामध्ये कनेक्टीव्हीटी नसल्यामुळे इंटरनेटची सुविधा उपलब्ध नाही. परंतु ज्या ठिकाणी इंटरनेट फंक्शनिंग नाही, त्या ठिकाणी कनेक्टीव्ही देण्याच्या संदर्भात आय.टी.विभागाशी चर्चा सुरु आहे. जिल्हा रुग्णालयामध्ये विजेच्या संदर्भात एक्स्प्रेस फिडर बसविण्याचा निर्णय घेतलेला आहे. परंतु पीएचसीमध्ये काही वेळेला वीज नसल्यामुळे प्रॉब्लेम होतो.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये न्यु प्रॉक्युअरमेंट पॉलिसी, स्टोरेज वेअर हाऊस, सॉफ्टवेअर, अशी सर्व माहिती दिल्यामुळे मी त्यांना धन्यवाद देतो. परंतु मुख्य मुद्दा असा आहे की, अमरावतीमध्ये "First Expiry, First Out" या धोरणानुसार सलाईन आणि बॉटल डिस्पोज ऑफ न केल्याबाबतचा गुन्हा डीएचओने केला आहे का, असल्यास, डीएचओ यांच्यावर कोणती कारवाई केली जाणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, फ्युचरिस्टिक प्रोग्राम मी सांगितलेला नाही. परंतु आम्ही एक वर्षापूर्वी जो प्रोग्राम लॉंच केला आहे, त्याची माहिती दिलेली आहे. पीएचसीमध्ये ऑलरेडी सॉफ्टवेअर देण्यात आलेले आहे. वेअर हाऊसचे काम प्रत्यक्षात सुरु झालेले आहे. ड्रग प्रॉक्युअरमेंटची नवीन पॉलिसी सन 2012 मध्ये करण्यात आली असून त्यामध्ये टोटली ई-टेंडरिंग पध्दतीने प्रोक्युअरमेंट केले जाते. पुढच्या दोन महिन्यात प्रोक्युअरमेंटसाठी सेप्रेट कॉर्पोरेशन करण्याच्या संदर्भात शासनाने निर्णय घेतलेला आहे. फर्स्ट एक्सपायरी-फर्स्ट आऊट हा विषय ऑलरेडी पॉलिसीमध्ये आहे. या ठिकाणी डीएचओंच्या संदर्भात जो मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे, त्यासंदर्भातील बाब तपासून योग्य ती कारवाई केली जाईल, एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, जिल्हा रुग्णालयामध्ये एक्स्प्रेस फिडर लावण्यात येईल, अशी माहिती माननीय मंत्री महोदयांनी दिलेली आहे. पंचायती राज समितीचे सदस्य म्हणून आम्ही अनेक पीएचसी तसेच जिल्हा रुग्णालयाला भेटी दिलेल्या आहेत. परंतु आम्हाला कोठेही इन्व्हर्टर लावल्याचे आढळून आलेले नाही. शासनाने एक्स्प्रेस फिडरची मागणी महावितरण कंपनीला अद्यापपर्यंत केलेली नाही. ही मागणी कधीपर्यंत केली जाणार आहे ?

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.42651**......

श्री.विक्रम काळे.......

एक्स्प्रेस फिडर बसविण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. ग्रामीण भागात इन्व्हर्टर घेण्याचे आदेश दिले तर ते उद्या इन्व्हर्टर घेऊ शकतील. त्यामुळे ग्रामीण भागातील पीएचसीला एक महिन्याच्या आत इन्व्हर्टर दिले जातील का ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, एक्स्प्रेस फिडरचे आदेश देण्यात आले असून त्यासाठी पैसे भरण्याचाही निर्णय घेतला गेला आहे. 15 दिवसांपूर्वी महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांबरोबर आमच्या विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांची बैठक झाली असून त्यासंदर्भात निर्णय घेण्यात आलेले आहेत. केवळ ठाणे जिल्हयात अडचण होती. परंतु, अन्य जिल्ह्यांसाठी टाईम टेबल फिक्स झाले असून त्या संदर्भातील माहिती प्रश्नोत्तराच्या तासानंतर सभागृहाच्या पटलावर ठेवली जाईल.

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, सलाईनचा स्टॉक होता. परंतु आम्ही त्या ठिकाणी जाऊन समक्ष फोटो काढलेले आहेत. असे असतांनाही माननीय मंत्री महोदय सांगतात की, त्या दिवशी सलाईन स्टॉकमध्ये होते. त्या दिवशी फंगस असलेले सलाईन डॉक्टर रुग्णांना चढवीत होते, हे आम्ही प्रत्यक्ष बघितले आहे. आम्ही ही बाब जेव्हा त्यांच्या निदर्शनास आणून दिली तेव्हा फंगस असलेले सलाईन काढण्यात आले. जेव्हा आम्ही या विषयाच्या खोलात गेलो, त्यावेळी डॉक्टरांनी आम्हाला टोलवाटोलवीची उत्तरे दिली. त्यामुळे संबंधित डॉक्टरांवर किती दिवसात ॲक्शन घेतली जाणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, लॅक्टेट बॉटल देण्याच्या अगोदर व्हाईट बॅकड्रॉपमध्ये व नंतर ब्लॅक बॅकड्रॉपमध्ये बघितले जाते. या टेस्ट केल्यानंतरच सलाईन दिली जाते व ही नॉर्मल प्रोसिजर आहे. ही प्रोसिजर सर्व सरकारी तसेच खाजगी हॉस्पिटलमध्ये अवलंबली जाते. पेशंटला डायरेक्ट सलाईन लावण्याची पध्दत कोठेही अस्तित्वात नाही. माझ्याकडे जी काही माहिती आहे त्यानुसार दि.27/4/2012 रोजी नर्स श्रीमती एस.पी.इंगळे यांनी सलाईन प्रोसिजर प्रमाणे टेस्ट केल्यानंतर त्यांना फंगस आढळून आल्यामुळे सलाईनची बॉटल बाजूला काढून ठेवण्यात आली होती.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42651...

श्री.सुरेश शेट्टी ...

गोडाऊन मध्ये टेस्ट केल्यानंतर ती बॉटल साईडला ठेवण्यात आली. ती बॉटल कुठल्याही पेशंटला देण्यात आली नव्हती, हे मी खात्रीने सांगत आहे. सन्माननीय सदस्यांनी स्वत:फोटो काढले आहेत असे सांगितले आहे. त्यांचे म्हणणे ग्राह्य धरून पुन्हा एकदा याची चौकशी करून अहवाल मागविण्यात येईल व तसे घडले असेल तर कारवाई करण्यात येईल.

.......

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महावितरणच्या बीड विभागातून बोगस बीले अदा केली जात असल्याबाबत**

**(4) * 41912 श्री.अमरसिंह पंडित, श्री.विनायकराव मेटे** : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) महावितरणाच्या बीड विभागातून कंत्राटदारांना कंपनीतील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या संगनमताने कोट्यवधी रुपयांची बोगस बीले अदा होत असल्याची तक्रार लोकप्रतिनिधी यांनी दिनांक 12 मे, 2013 रोजी वा त्या सुमारास संचालक, महावितरण मुंबई यांच्याकडे केली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, महावितरणच्या बीड विभागात कार्यकारी अभियंत्यांसह इतरांना धमकावण्याचे प्रकार कंत्राटदारांकडून होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींच्या तक्रारी बाबत महावितरण कंपनीने कोणती कार्यवाही केली आहे व त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(4) उक्त प्रकरणाबाबत केलेल्या चौकशीच्या अनुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र मुळक, श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (1) हे खरे आहे

(2) हे खरे आहे

(3) तक्रारीत नमूद कंत्राटदारांना सन 2008 पासून निविदा प्रकियेद्वारे देण्यात आलेली कामे व अदा करण्यात आलेली देयके यांची पडताळणी केल्यानुसार निविदेमधील अटी व शर्तीनुसार सदर कंत्राटदारांवर कार्यवाही करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(4) सदर प्रकरणी अधीक्षक अभियंता, बीड यांना संबंधित कंत्राटदारावर योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, कंत्राटदारावर कारवाई करण्यात येईल असे स्पष्टपणे लेखी उत्तरामध्ये माननीय मंत्रिमहोदयांनी नमूद केले आहे. या सगळ्या प्रक्रियेमध्ये, गैरव्यवहारामध्ये केवळ कंत्राटदार एकटाच जबाबदार आहे असे नाही. महावितरणचे उच्चपदस्थ अधिकारी हे देखील यात सामील आहेत. महावितरणचे कार्यकारी संचालक श्री.ठाकूर यांनी लेखी पत्राद्वारे संबंधित कंत्राटदाराची बिले अदा करण्यासाठी अधीक्षक अभियंता यांना आदेशित केले. आज ते म्हणतात की, मी लेखी आदेशित केले म्हणजे त्याचा अर्थ बिले काढा असा होत नाही. त्या कामाची वास्तविकता त्यांनी तपासून पहायला हवी होती. त्या कंत्राटदारावर आपण कारवाई



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41912....

श्री.अमरसिंह पंडित...

करावी. आपण त्याचे रजिस्ट्रेशन निलंबित कराल. पण तो दुसऱ्या कोणाचे तरी रजिस्ट्रेशन घेऊन येईल आणि आपले काम सुरू ठेवेल. उच्चपदस्थ अधिकारी मुंबईत बसून अशा प्रकारे बिले काढण्यासंबंधी आदेश काढत आहेत. त्यांच्या विरूद्ध शासन कोणती कारवाई करणार आहे, असा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी येथे जी बाब सांगितली आहे ती खरी समजून त्यानुसार ॲक्शन घेण्यात येईल. त्यांनी ज्या अधिकाऱ्याच्या नावाचा उल्लेख केला आहे त्याची सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याकडून चौकशी करण्यात येईल. त्यांनी काहीही पाहणी न करता खाली लेखी स्वरूपात सूचना दिल्या असतील तर त्यांच्यावर ॲक्शन घेण्यात येईल.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, ही गंभीर गोष्ट आहे. यात कोट्यवधी रूपयांची बोगस बिले निघाली आहेत. बीड विभागातील कार्यकारी अभियंत्यासह इतरांना धमकावण्याचे प्रकार कंत्राटदाराकडून होत आहेत असे प्रश्न क्रमांक दोनमध्ये नमूद केले आहे. याचा अर्थ कंत्राटदार धमकावतो आहे असा अर्थ होतो. त्यास माननीय मंत्र्यांनी "हे खरे आहे" अशा प्रकारचे उत्तर दिले आहे. ॲक्शन, चौकशी हा नंतरचा भाग आहे. एक कंत्राटदार आपल्या अधिकाऱ्यांना धमकावत असेल तर शासन त्याच्या विरूद्ध पोलीस केस दाखल करणार आहे काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, "होय".

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सदर कंत्राटदाराचे कंत्राट कधी नेमले, महावितरण मध्ये हा कंत्राटदार किंवा त्याची कंपनी किती वर्षे काम करीत आहे तसेच, त्याने आता पर्यंत दिलेल्या बिलांसंबंधात फेर चौकशी करण्यात येणार आहे काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, या कंत्राटदाराला सन 2008 मध्ये गावठाण फिडर सेपरेशन योजने अंतर्गत काम देण्यात आले होते. त्याची कामे अद्यापि अपूर्ण आहेत. आकाश इलेक्ट्रीकल, बीड हे बीड जिल्ह्यातील असून GFSS योजने अंतर्गत 4 कामांचे आदेश सन 2008



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41912....

श्री.अजित पवार....

मध्ये देण्यात आले होते. त्याची किंमत रूपये 509 लाख 38 हजार होती. कामा नुसार रूपये 409 लाख 65 हजार इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे. त्यानंतर काही फिडर कार्यान्वित नाही असे आमच्या लक्षात आले. त्यामुळे अधीक्षक अभियंता यांना फौजदारी गुन्हा दाखल करावा अशा प्रकारच्या सूचना दिल्या होत्या. तसा प्रश्न आता श्री.शेलार साहेबांनी देखील विचारला आहे. परंतु, तशा प्रकारची केस अधीक्षक अभियंता यांनी दाखल केलेली नाही. कदाचित ते दबकत असतील, त्यांना भीती वाटली असेल. बीड येथे चुकीच्या सवयी लागलेल्या आहेत. कामकाज खराब होत आहे असे म्हणणे उचित होणार नाही. परंतु, तेथे अत्यंत चुकीच्या सवयी लागल्या आहेत. त्यामुळे चांगली शिस्त लावण्याकरिता आम्ही प्रयत्न करणार आहोत. आज मी आणि माननीय राज्यमंत्री ब्रीफिंग घेत होतो तेव्हा अधिकाऱ्यांना स्पष्ट सांगितले आहे की, या कंत्राटदाराला काळ्या यादीमध्ये समाविष्ट करावे. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित म्हणाले ते बरोबर आहे. कंपनीचा समावेश काळ्या यादीमध्ये केल्यानंतर कंत्राटदार दुसऱ्या कुठल्या तरी कंपनीच्या मार्फत टेंडर भरण्याचा प्रयत्न करतो. या सर्व गोष्टीला आळा बसला पाहिजे अशा पद्धतीच्या सूचना आजच अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत. या पुढे त्या ठेकेदाराला काम मिळणार नाही या बद्दलची खबरदारी निश्चितपणे महावितरण कंपनीकडून घेतली जाईल.

...........

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औरंगाबाद शासकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) प्रशासनाने निधी खर्च न केल्याबाबत**

**(5) * 42243 श्री.सतीश चव्हाण, श्री.संदीप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.एम.एम.शेख, श्री.दीपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विनायकराव मेटे, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित** : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) औरंगाबाद शासकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) प्रशासनाने सन 2012-2013 मध्ये प्राप्त निधी खर्च न केल्याने 8.35 कोटी रुपये परत गेले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, तदनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.विजयकुमार गावित** : (1) नाही

(2) प्रश्न उद्‌भवत नाही.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना उत्तरामध्ये सुधारणा करावयाची आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, औरंगाबाद शहरात घाटी रुग्णालय आहे. औरंगाबादला मराठवाड्याची राजधानी मानली जाते. मराठवाड्यातील आठ जिल्हे आणि खानदेशातील जळगाव व अन्य जिल्ह्यांतील लोक घाटी रुग्णालयात उपचारासाठी येतात. या घाटी रुग्णालयात अत्याधुनिक मशिनरी असावी यासाठी आम्ही लोकप्रतिनिधी मोठ्या प्रयत्नाने माननीय वित्त मंत्री महोदयांकडून निधी मंजूर करुन घेतला. परंतु अधिकाऱ्यांच्या अनास्थेमुळे त्यातील 5 कोटी 7 लाख रुपये खर्च झाले नाहीत. आर्थिक वर्षात मंजूर झालेला निधी खर्च न करण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार काय ? माझा दुसरा प्रश्न आहे की, हा अखर्चित निधी केव्हा खर्च करणार आहात, या रुग्णालयामध्ये अत्याधुनिक मशिनरी केव्हा खरेदी करणार आहात ?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42243.....

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, घाटी रुग्णालयासाठी सहा कोटी रुपये निधी मंजूर झाला होता आणि त्या रकमेतून खरेदी करण्यात आलेली आहे. घाटी रुग्णालयासाठी डी.पी.डी.सी.मधून 5 कोटी 60 लाख रुपये मंजूर झाले त्यापैकी 5 कोटी 19 लाख रुपये खर्च करण्यात आले. डी.पी.डी.सी.मधून मंजूर झालेला निधी खर्च करण्यास उप संचालकांकडून प्रशासकीय मान्यता घ्यायची की जिल्हाधिकारी यांचेकडून प्रशासकीय मान्यता घ्यायची याबाबत निर्णय होण्यास बराच कालावधी गेला. जिल्हाधिकारी यांना काही ठराविक रकमेपर्यंत खर्च करण्याची प्रशासकीय मंजुरी देता येते. तेव्हा उप संचालकांकडून प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर 70 लाख रुपयांच्या मशिनरीसाठी निविदा काढण्यात आल्या. मशिनरीमध्ये काही त्रुटी असल्याच्या तक्रारी आल्यामुळे त्याबाबत चौकशी करण्याबाबत सांगण्यात आले. चौकशीमध्ये वेळ गेल्यामुळे 70 लाख रुपये खर्च झाले नाहीत. या वर्षी 70 लाख रुपये उपलब्ध करुन मशिनरी खरेदी करण्यात येईल. जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासकीय मान्यता द्यावी असे आदेश काढलेले आहेत. मी माझ्या विभागाला सूचना दिलेल्या आहेत की, जी काही खरेदी करावयाची असेल ती कोणत्याही परिस्थितीमध्ये डिसेंबर अखेरपर्यंत किंवा 15 जानेवारीच्या आत खरेदीचे आदेश दिले पाहिजेत.

श्री.एम.एम.शेख : सभापती महोदय, औरंगाबाद शहरातील घाटी रुग्णालयात जवळपास 12 जिल्ह्यातील लोक उपचारासाठी येतात. आम्ही डी.पी.डी.सी.मधून जवळपास साडेसहा कोटी रुपये मंजूर करुन घेतले. हा निधी डीनच्या अखत्यारित येत नसल्यामुळे साडेपाच कोटी रुपये संचालक, वैद्यकीय शिक्षण यांनी मागून घेतले. डिसेंबर महिन्यापर्यंत साडेपाच कोटी रुपये जमा असताना देखील ते खर्च करण्यात आले नाहीत. घाटी रुग्णालयामध्ये मशिनरी नसल्यामुळे रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागत असल्यामुळे रुग्णांना मोठा आर्थिक भूर्दंड सोसावा लागत आहे. माननीय मंत्री महोदयांनी 70 लाख रुपयांची खरेदी झालेली नाही असे सांगितले. परंतु प्रत्यक्षात साडेपाच कोटी रुपयांची खरेदी झालेली नाही. तेव्हा ही खरेदी लवकरात लवकर करण्यात येईल काय ?

यानंतर श्री.बोर्डे..

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42243....

डॉ.विजयकुमार गावित : महोदय, ज्या रकमेतून ही खरेदी केलेली आहे त्यातील केवळ 70 लाख रुपये अखर्चित राहिले आहेत. ते या वर्षी देऊन निश्चितपणे खर्च करण्यात येतील. या विषयी प्रशासकीय मान्यता जिल्हाधिकाऱ्यांनी द्यावयाची की विभागाच्या संचालकांनी द्यावयाची या बाबतचा निर्णय घेण्यास वेळ लागला. अशा प्रकारचा वेळ पुढील काळात लागणार नाही याबाबत खबरदारी घेतली जात आहे.

श्री.विक्रम काळे : महोदय, मी माननीय मंत्र्यांना सुरुवातीलाच विचारले होते की, त्यांना या प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये काही सुधारणा करावयाची आहे काय ? परंतु त्यांनी नकारार्थी उत्तर दिले. या प्रश्नाला उत्तर देत असताना माननीय मंत्र्यांनी निबंध वजा उत्तर वाचून दाखविले आहे. परंतु त्यांनी जे काही सांगितले त्यातील काहीच लेखी उत्तरामध्ये नमूद केलेले नाही. प्रत्येक प्रश्नाच्या लेखी उत्तराला 'प्रश्न उद्‌भवत नाही' असेच लेखी उत्तर दिलेले आहे. माननीय मंत्र्यांनी कबूल केले की, प्रशासकीय मान्यता कोणी द्यावयाची हे अधिकाऱ्यांना समजले नाही. प्रशासकीय मान्यता नेमकी कोणी द्यावयाची हेच जर अधिकाऱ्यांना समजत नसेल तर त्या अधिकाऱ्यांना कोणी खुर्चीवर बसविले ? या निमित्ताने मी स्पेसिफिक प्रश्न विचारतो की, ज्या अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे सामुग्री खरेदी करण्यात दिरंगाई झाली त्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात येईल तसेच ज्या अधिकाऱ्यांनी असत्य लेखी उत्तर दिले त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात ?

डॉ.विजयकुमार गावित : महोदय, सन्माननीय सदस्यांनी "औरंगाबाद शासकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) प्रशासनाने सन 2012-2013 मध्ये प्राप्त निधी खर्च न केल्याने 8.35 कोटी रुपये परत गेले हे खरे आहे काय," असा प्रश्न विचारला होता. ते पैसे परत गेले नाहीत म्हणून त्या प्रश्नाला 'नाही' असे लेखी उत्तर देण्यात आले. जे लेखी उत्तर देण्यात आलेले आहे ते बरोबर आहे. त्यामुळे बाकीच्या प्रश्नांना 'प्रश्न उद्‌भवत नाही' असे लेखी उत्तर दिलेले आहे.

श्री.दिवाकर रावते : माननीय मंत्री कोणाची तरफदारी करीत आहेत ते माहीत नाही. मला वाटते त्यांनी सन्माननीय सदस्यांचा सन्मान राखण्याची काळजी घ्यावी. सन्माननीय सदस्यांनी 8.35 कोटी रुपये परत गेले काय, असा प्रश्न विचारला होता. आपण या ठिकाणी जे उत्तर दिलेले आहे त्यावरुन उपरोक्त लेखी प्रश्नाला 'अंशत: हे खरे नाही परंतु 70 लाख रुपये खर्च

..2..

करण्याचे राहून गेले' असे उत्तर द्यावयास पाहिजे होते. शिवाय या कामासाठी काही रक्कम डीपीडीसी मधून मिळाली आहे. या प्रश्नाला समाधानकारक उत्तर मिळवून घेण्यासाठी सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना भांडावे लागत आहे ही वस्तुस्थिती आहे. प्राप्त झालेले 8.35 कोटी रुपये परत गेल्याबाबत हा प्रश्न विचारला होता. परंतु सन्माननीय मंत्र्यांनी 5 कोटी आणि 6 कोटी बाबत खुलासा केला आहे. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी जो प्रश्न विचारला आहे तोच प्रश्न मी विचारीत आहे की, सभागृहाची दिशाभूल करणाऱ्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात येईल ?

डॉ.विजयकुमार गावित : महोदय, सन्माननीय सदस्यांनी 8.35 कोटी रुपये परत गेले काय असा लेखी प्रश्न विचारला होता. त्याला योग्य असेच लेखी उत्तर दिलेले आहे. या प्रश्नाच्या अनुषंगाने उपस्थित झालेल्या उप प्रश्नांना उत्तर देताना मी सविस्तर खुलासा केला आहे. त्यामुळे मी जे उत्तर दिलेले आहे ते योग्य आहे.

डॉ.दीपक सावंत : महोदय, डीपीडीसीने निधी मंजूर केला आहे. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, प्रशासकीय मान्यता देण्यात अधिकाऱ्यांना काय अडचणी होत्या ?

डॉ.विजयकुमार गावित : महोदय, डीपीडीसीच्या निधीला प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार आमच्या विभागाच्या संचालकांना नसून जिल्हाधिकाऱ्यांना आहेत. या प्रकरणी डीपीडीसीचा निधी देण्याचा निर्णय घेतला होता. पूर्वी विभागाकडून प्रशासकीय मान्यता घेण्यात डिले होत होता. जानेवारी, मार्च महिन्यापर्यंत प्रशासकीय मान्यता मिळत होती. त्यामुळे या संदर्भात प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिले. त्यानुसार त्यांनी प्रशासकीय मान्यता देणे अपेक्षित आहे. परंतु त्यांनी या संदर्भातील प्रशासकीय मान्यता विभागाच्या संचालकांनी द्यावी असे म्हटले होते. वास्तविक पाहता प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांनाच आहेत. तशा प्रकारचे पत्र सुध्दा आमच्या विभागाने दिले आहे. त्यामुळे यापुढे त्यांनीच प्रशासकीय मान्यता द्यावयास पाहिजे.

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई : महोदय, घाटी रुग्णालयाला सरकारकडून किती निधी वर्ग करण्यात आला, तसेच रुग्णांना त्याचा उपयोग होण्यासाठी जी साधनसामुग्री खरेदी केली आहे ती किती रकमेची आणि कधी खरेदी केली ? तसेच ज्या अधिकाऱ्यांनी हे घडवून आणले त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात ?

डॉ.विजयकुमार गावित : महोदय, ही खरेदी मार्च महिन्यामध्ये झाली आहे. मी यापूर्वीच सांगितले आहे की, 70 लाख रुपये अखर्चित राहिले होते. जी यंत्रे खरेदी केली होती ती सर्व बसविलेली असून, ती कार्यान्वित झाली आहेत.

-----------

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्पांवर कोट्यवधी रुपये खर्च करुनही महानिर्मितीने एकही मेगावॅट वीज तयार केली नसल्याबाबत**

**(६) * ४२९४० श्री.चंद्रकांत पाटील, श्री.विनोद तावडे, श्री.भगवान साळुंखे, डॉ.रणजित पाटील, श्री.नितीन गडकरी, श्री.नागो पुंडलिक गाणार, श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्पांवर १९ हजार कोटींचा खर्च होऊनही २००४ नंतर महानिर्मितीने एकही मेगावॅट वीज तयार केली नसल्याचा आरोप करुन वीज गैरव्यवहाराचीही चौकशी करण्याची मागणी विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधान परिषद यांनी मा.मुख्यमंत्र्यांना माहे एप्रिल २०१३ च्या शेवटच्या आठवड्यात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) अद्याप चौकशी केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेंद्र मुळक, श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (१) मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे दिनांक ३०.४.२०१३ रोजीचे सदरहू पत्र प्राप्त झाले आहे. मात्र औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पावर १९ हजार कोटींचा खर्च होऊनही सन २००४ नंतर महानिर्मिती कंपनीने एकही मेगावॅट वीज तयार केली नाही, हे खरे नाही.

सन २००४ पासून महानिर्मिती कंपनीच्या प्रकल्पावर खर्च झालेल्या निधीद्वारे स्थापित क्षमतेत २५०० मे.वॅ. वाढ झालेली आहे व सदर संचातून प्रत्यक्ष वीज निर्मिती सुरु आहे. तसेच ३२३० मे.वॅ.एवढ्या क्षमतेच्या प्रकल्पांची कामे युध्द पातळीवर सुरु आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, 2004 ते 2012 या दरम्यान एकूण 19 हजार 672 कोटी रुपये महाराष्ट्रातील महाजनको कंपनीने खर्च केले. त्यामध्ये 5730 मेगावॅटची वाढ अपेक्षित होती पण ती वाढ झालेली नाही. पण या दरम्यान आपण जी 42 हजार 929 मेगावॅट ऊर्जा निर्माण करीत होतो ती निर्मिती 39 हजार 49 मेगावॅटपर्यंत खाली आलेली आहे. म्हणजे नवीन 19 हजार कोटी रुपये खर्च करुन वीज निर्मितीमध्ये वाढ होण्याऐवजी जी क्षमता होती ती आपण कमी केली. या बाबतीत जी कारणे दिलेली आहेत त्यामध्ये अनेक प्रकल्प कार्यान्वित होत आहे असे म्हटले आहे. पुढचा प्रश्न असा विचारला होता की, ही क्षमता कमी झाल्यामुळे आपल्याला जास्त दराने वीज खरेदी करावी लागली आणि ग्राहकांवर बोजा पडला. या बाबतीत असे उत्तर दिले आहे की, 4 रुपये 50 पैसे प्रती युनिट प्रमाणे खरेदीची परवानगी आहे या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 42940 ..... श्री. चंद्रकांत पाटील ...

दराऐवजी 3 रुपये 81 पैसे या दराने वीज खरेदी केली. आपल्या प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या विजेची प्रती युनिट किंमत किती आहे ? जर ती किंमत 3 रुपये 81 पैशापेक्षा कमी असेल तर यामध्ये आपला तोटा आहे. आपल्या प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या विजेची प्रती युनिट किंमत किती असते ? आपण आता या कमर्शियल कंपन्या केलेल्या आहेत त्यामुळे त्यांचा सरकारशी संबंध राहिलेला नाही. कंपन्यांनी तरी किमान ब्रेक इव्हनचा विचार केला पाहिजे. 19 हजार रुपये खर्च केल्यानंतर त्यांचा ब्रेक इव्हन कधी येण्याचे अपेक्षित धरले आहे ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्यामार्फत सन्माननीय सदस्यांना आणि सभागृहाला सांगू इच्छितो की, साधारणत: 2500 मेगावॅटचे प्रकल्प उभारण्यात आले आणि त्यांना सीओडी सुध्दा देण्यात आली आहे. त्यावर साधारणत: 16,030 कोटी रुपये खर्च करण्यात आले. 3230 मोगावॅटची कामे सध्या सुरु आहेत. त्यावर आतापर्यंत 13,276 कोटी रुपये खर्च झालेला आहे. 19 हजार कोटी रुपये खर्च करुन 1 मेगावॅट सुध्दा वीज निर्मिती झाली नाही हे म्हणणे चुकीचे आहे. 2500 मेगावॅट वीज निर्मिती झाली. परळी येथे संच क्रमांक 6- 250 मेगावॅट, पारस येथील संच क्रमांक 3- 250 मेगावॅट, परळी येथील संच क्रमांक 7- 250 मेगावॅट, पारस येथील संच क्रमांक 4- 250 मेगावॅट, खापरखेडा येथील संच क्रमांक 5- 500 मेगावॅट, भुसावळ येथील संच क्रमांक 4- 500 मेगावॅट, भुसावळ येथील संच क्रमांक 5- 500 मेगावॅट या प्रकल्पांना सीओडी मिळालेली आहे आणि ते संच सुरु झालेले आहेत. अशा प्रकारे 2500 मेगावॅटचे काम सुरु झालेले आहे. जी 3230 मेगावॅटची कामे प्रगतिपथावर आहेत त्यामध्ये परळी येथील संच क्रमांक 8- 250 मेगावॅट, चंद्रपूर येथील संच क्रमांक 8 आणि 9 प्रत्येकी 500 मेगावॅट, कोराडी येथील संच क्रमांक 8 आणि 9 - प्रत्येकी 660 मेगावॅट, कोराडी येथील संच क्रमांक 10- 660 मेगावॅट अशी मिळून 3230 मेगावॅटच्या संचांना येत्या काही काळात सीओडी मिळणार आहे. आतापर्यंत साधारणत: 29 हजार 307 कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहे. त्यामध्ये 2500 मेगावॅट वीज निर्मिती झालेली आहे आणि 3230 मेगावॅट क्षमतेचे संच तयार करण्याचे काम प्रगतिपथावर आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 42940 .....

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही. आपल्या प्रकल्पातून तयार होणाऱ्या विजेची प्रती युनिट किंमत किती पडते तसेच आपल्या प्रकल्पांचा ब्रेक इव्हन काय आहे ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, आपण तीन चार प्रकारे वीज तयार करीत असतो हे सभागृहाला माहीत आहे. 2012-2013 मधील महावितरणच्या वीज खरेदीची माहिती सांगतो. महाजनकोच्या औष्णिक, गॅस, जल या सर्वांचा आपल्याला सरासरी प्रती युनिट वीज दर 3 रुपये 79 पैसे आहे. खाजगी प्रकल्पांचा वीज दर प्रती युनिट 3 रुपये 32 पैसे आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42940.... श्री.अजित पवार.....

अपारंपरिक ऊर्जेच्या विजेचे दर सन 2012-13 मध्ये 4.32 पैसे, लघु विदिका शॉर्ट टर्ममधून वीज घेतली जाते त्याचे दर 3.81 पैसे, सेंट्रल ग्रीडमधून वीज घेतली जाते त्याचा दर 2.76 पैसे म्हणजे एकूण सरासरी 3.85 पैसे विजेचा दर आहे. आताच एमईआरसीने विंड मिलला विजेचा दर 5.81 पैसे प्रति युनिट असा केला आहे. कोजनरेशनचा 5.79 पैसे व बायोमासला दर वाढवून देण्यात आलेला आहे. अशा प्रकारे महावितरणच्या वीज खरेदीचे दर आहेत.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, वीज खरेदीचा सरासरी दर 3.85 पैसे असल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. शॉर्ट टर्म वीज खरेदीचा दर 3.81 पैसे आहे. महाविजनिर्मितीच्या प्रकल्पांचा वीज खरेदीचा दर 3.50 पैसे आहे. माझी माहिती अशी आहे की, कोराडी प्रकल्पातून सन 2005 साली 6,444 मे.वॉ.वीजनिर्मिती होत होती आता 2,491 मे.वॉ.विजनिर्मिती होत आहे. नाशिकच्या परळी येथील प्रकल्पाची तीच स्थिती आहे. चंद्रपूर, पारस येथील प्रकल्पाची तशीच स्थिती आहे. केवळ भुसावळ व खापरखेडा येथील प्रकल्पांची स्थिती वेगळी आहे. पाच ठिकाणी सन 2004-05 पेक्षा सन 2012-13 मध्ये महाविजनिर्मिती कंपनी कमी वीज निर्माण करीत आहे हे खरे आहे काय ? त्याचबरोबर निकृष्ट दर्जाचा कोळसा व महाआयात कोळशाच्या खरेदीवर भर यामुळे शासनाला अडचण आली असे उत्तरात नमूद केले आहे. या दोन प्रकरणांमध्ये सरकारची नेमकी काय भूमिका आहे ?

श्री.अजित पवार : अलीकडे काही लोक वीज खरेदीमध्ये काही तरी चुकीचे चालले आहे अशा प्रकारचे जाणीवपूर्वक वातावरण तयार करीत आहेत. या प्रश्नाच्या उत्तराच्या निमित्ताने मी हे स्पष्टपणे सांगू इच्छितो की, वीज खरेदीमध्ये पूर्णपणे पारदर्शकता आहे. सभागृहाच्या एक गोष्ट लक्षात आणून देऊ इच्छितो की, देशामध्ये काही राज्ये वीज खरेदी करतात त्यामध्ये उत्तर प्रदेश राज्याचा वीज खरेदीचा दर आपल्या राज्यापेक्षा जास्त आहे, पंजाबचा दर जास्त आहे, आंध्र प्रदेशचा दर जास्त आहे. दिल्लीच्या बीएसईएसचा दर जास्त आहे. (अडथळा) त्या राज्यात वीज खरेदी केली जाते तेथे कोणत्या प्रकारची विजनिर्मिती केली जाते हे पाहणेही महत्वाचे असते.

सभापती महोदय, आपण सांगली भागातील आहात. कोयना धरण काल भरलेले आहे.

2....

18-07-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) H-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

ता.प्र.क्र.42940....                                   श्री.अजित पवार.....

त्यामुळे त्या धरणातून 10 हजार क्युसेक्स पाणी सोडण्याची सुरुवात केलेली आहे. या संदर्भात मी माननीय जलसंपदा मंत्री श्री.सुनील तटकरे यांनी सांगितले आहे की, धरणातून पाणी सोडत असताना 100 टक्के वीज तयार करु शकतो. त्यातून वीज तयार करावयाची म्हटल्यास आताची राज्यातील विजेची मागणी व पुरवठा याचा विचार करुन कोयना प्रकल्पातून वीज घ्यावयाची असेल तर थर्मल पॉवर प्रोजेक्ट बंद ठेवावे लागतील. आता जर पाऊस चांगला पडला तर कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर व पुणे या पाच जिल्ह्यांमधून 1 हजार मे.वॉ.विजेची मागणी कमी होते. हे लक्षात आल्यानंतर राज्य लोडशेडिंग मुक्त होईपर्यंत वीजनिर्मिती तयार केलेली आहे. काही लोक असेही म्हणतात की, राज्य 80 टक्केच लोडशेडिंग मुक्त झालेले आहे. त्याचे कारण असे आहे की, काही लोक घेतलेल्या विजेचे पैसे पूर्णपणे देत नाहीत. त्यांना वीज दिली जात नाही. वास्तविक वापरलेल्या विजेचे पैसे त्या त्या भागातील लोकांनी दिले तर राज्यातील जनतेला 100 टक्के 24 तास उद्योग व घरगुती ग्राहकाला वीज देण्याची राज्य सरकारची तयारी आहे.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न उपस्थित केला आहे की, वीजनिर्मितीमध्ये घट झालेली आहे. त्याला काही कारणे आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42940.... श्री. अजित पवार...

आपला दाभोळ प्रकल्प हा पूर्वीच्या काळी एन्रॉनच्या नावाने ओळखला जात होता. त्या प्रकल्पातून 1969 मे.वा. वीज निर्मिती होऊ शकते. परंतु गॅस कमी असल्यामुळे ती होऊ शकत नाही. केन्द्र सरकारने असा नियम केलेला आहे की, पहिल्यांदा घरगुती गॅस सिलेंडर वापरणा-या ग्राहकांना गॅस द्यायचा, त्यानंतर फर्टिलायझर तयार करण्यासाठी गॅस द्यायचा आणि तो देऊन जो काही गॅस शिल्लक राहील तो वीज निर्मिती करण्यासाठी द्यायचा. गॅसवर तयार होणारी वीज 5.81 रुपयास पडते. या प्रकल्पास 300 मे.वॉ. वीज निर्मिती होईपर्यंत गॅस मिळतो. आता गॅस देण्याचे बंद झ ालेले आहे.

राज्य सरकारने प्रायव्हेटायझेशनने वीज निर्मिती प्रकल्प सुरु केलेले आहेत. विजेबाबत अडचण निर्माण झाली तर या प्रकल्पातून राज्याला वीज मिळू शकेल. धुळ्याला 125 मे.वॉ. क्षमतेचे सूर्यप्रकाशावर आधारित वीज प्रकल्प उभे केले आहेत. पाणी कमी असल्यामुळे परळीचे वीज केन्द्र बंद ठेवावे लागले आहे. त्याच प्रमाणे कोराडी वीज निर्मिती केन्द्रातील 1 ते 4 संचांचे आयुर्मान 35 वर्षापेक्षा जास्त झाल्याने तो प्रकल्प बंद केलेला आहे. त्यामुळे 480 मे.वा. विजेची घट झालेली आहे. नाशिकमधील 1 आणि 2 संचांचे आयुर्मान 35 वर्षापेक्षा जास्त झाल्यामुळे तो प्रकल्प बंद केलेला आहे. त्यामुळे 280 मे.वॉ. विजेची घट झालेली आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे चंद्रपूर येथील संच 10 व 11 तसेच परळी येथील संच पाण्याच्या कमतरतेमुळे बंद ठेवलेले आहेत. सन 2004मध्ये महानिर्मिती कंपनीला 93 टक्के कोळशाची उपलब्धता होत होती. सन 2012-13मध्ये ही उपलब्धता 73 टक्क्यावर आलेली आहे. केन्द्राने सांगितलेले आहे की, देशातील कोळशाची उपलब्धता कमी होत चालली असल्यामुळे जास्तीत जास्त कोळसा बाहेरच्या देशातून आयात करावा. केवळ महाराष्ट्र राज्यालाच नाही तर देशातील सर्व राज्यांना अशा प्रकारच्या सूचना केन्द्र सरकारने दिलेल्या आहेत. सन 2004-05मध्ये साधारणपणे 3592 कॅलरिजचा कोळसा मिळत होता. आता तो 3150 कॅलरीचा मिळू लागला आहे. त्यामुळे कोळशाच्या कॅलरिजमध्ये 442 इतकी घट आलेली आहे.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी विचारले की महानिर्मिती कंपनी कशामुळे तोटयात आली ? मी सांगू इच्छितो की, सन 2005-06मध्ये महानिर्मिती कंपनी 113 कोटी रुपये नफ्यात होती. सन 2011-12मध्ये ती 647 कोटी रुपये नफ्यात आहे. त्यामुळे घेतलेली वीज ही

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

किफायतशीर दरामध्ये ग्राहकाला देण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत.

श्रीमती शोभा फडणवीस : चंद्रपूर थर्मल पॉवर स्टेशनसाठी जी-9 प्रतीचा कोळसा मागितला होता. त्या ऐवजी जी-16 प्रतीचा कोळसा प्राप्त झाला. या कोळश्याचा उष्मांक कमी आहे. त्यामुळे वीज निर्मितीवर त्याचा परिणाम झालेला आहे हे खरे आहे काय ? दिनांक 28-6-2013ला 7वीज प्रकल्पामधून किती युनिट वीज निर्मिती झाली ? 6980 मे.वा. वीज निर्मितीची क्षमता असताना 2634 मे.वा. वीज निर्मिती झाली. याचा अर्थ आपण फक्त 40 टक्के वीज निर्मिती केली. 60 टक्के वीज निर्मिती केली नाही हे खरे आहे काय ? तिरोड्याचा प्रकल्प पूर्ण झालेला आहे. परंतु शासनाने ठरविलेले दर मान्य नाही म्हणून तिरोडा प्रकल्पातून वीज देण्याचे नाकारले आहे हेही खरे आहे काय ?

श्री. अजित पवार : तिरोड्याच्या बाबतीत हे खरे आहे की तिरोडयाला अदानी ग्रुपने 660 मे.वा.चे 5 युनिट सुरु करण्याचा निर्णय घेतलेला होता. आपण 2.82 पैसे दराप्रमाणे वीज घेण्यासंबंधीचा करार केलेला होता. तिरोडयाचा प्रकल्प गोंदियाला उभा रहात असताना त्याच भागातील कोळशाची खाण त्यांना ॲलॉट झाली होती. नंतरच्या काळामध्ये पर्यावरणाचा, व्याघ्र प्रकल्पाचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे अदानी ग्रुपला ॲलाट झालेली कोळशाची खाण केन्द्र सरकारने बंद केली. त्यामुळे त्यांना दुसरीकडून कोळसा आणावा लागत आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42940....

श्री.अजित पवार...

त्यांनी शासनाला असे सांगितले आहे की, आम्हाला पहिल्यांदा तेथील कोळसा मिळणार होता म्हणून तो दर आम्ही दिलेला होता. कारण कोळशाची वाहतूक आम्हाला जास्त पडत नव्हती. परदेशातून आम्हाला कोळसा आणावा लागत नव्हता. परंतु आम्ही त्यांचे ऐकलेले नाही. देशामधील अनेक वेगवेगळया खाजगी प्रकल्पासंदर्भात माननीय पंतप्रधानापर्यंत तक्रारी गेलेल्या आहेत. काही राज्याच्या मुख्यमंत्र्यांची कॉन्फरन्स असते, त्या कॉन्फरन्समध्ये अनेक राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे की, खाजगी प्रकल्पधारक प्रथम एक दर देतात आणि प्लॉन्ट उभा राहिल्यानंतर तक्रार करतात की, आम्हाला तो दर देता येत नाही. यात गुंतवणूक मोठया प्रमाणात झालेली असते. यामध्ये काय मार्ग काढावयाचा असा विचार पुढे येतो.

आपण या राज्यात एम.ई.आर.सी. संस्था निर्माण केलेली आहे. यासंबंधीची सर्व माहिती ती संस्था आपल्याकडून मागविते. खाजगी कंपनीवाल्यांकडून माहिती मागविते. सगळयांना सुनावणीसाठी बोलाविते आणि त्यानंतर निकाल देते. त्या संस्थेचा निकाल आपल्याला योग्य वाटला नाही तर केंद्रातील सी.आर.सी.कडे आपण अपील करीत असतो आणि या पध्दतीने काम करीत असतो. एक गोष्ट खरी आहे की, आपल्याला त्याच दरामध्ये वीज मिळाली पाहिजे याबद्दल राज्य सरकार आग्रही आहे. ते लोक कोर्टात जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. हायकोर्ट, सुप्रीम कोर्ट हे प्रत्येकाचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय देत असतात. त्यांच्या निर्णय आपल्याला मान्य करावाच लागतो. त्याच्या आधी मात्र एम.ई.आर.सी. आणि सी.आर.सी. यांच्या पुढे आपण आपले मत मांडत असतो. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी जो काही मुद्दा उपस्थित केला. त्या बाबतीत सांगू इच्छितो की, कोळशाची ऑर्डर दिल्यानंतर त्या कोळशाच्या संदर्भात काही तक्रारी आलेल्या आहेत. त्या तक्रारी संदर्भात चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.सदर चौकशीमध्ये त्यांनी जर कमी उष्मांक असणारा कोळसा दिलेला असेल तर संबंधितांविरुध्द कारवाई करण्यात येईल. यामध्ये कोणालाही पाठीशी घालण्याचे कारण नाही. तेथील तिराई धरण आता पाण्याच्या साठयाने पूर्ण भरलेले आहे. तिराई धरणाचे आपण दरवाजे उघडले आणि त्यातून पाणी सोडले आहे. परंतु त्या ठिकाणी पावसाळयात कोळसा मोठया प्रमाणात भिजतो. त्यात जेवढा पीएलएफ मिळाला

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42940....

श्री.अजित पवार...

पाहिजे तेवढा मिळत नाही. गेल्या काही वर्षाची प्रॉडक्शनची सरासरी आपण बघितली तर त्यात पावसाळयाच्या कालावधीत त्या ठिकाणचे प्रॉडक्शन कमी असते. मी महानिर्मितीच्या एम.डी.ना अशा सूचना केल्या आहेत की, आपला एखादा संच प्रायव्हेटकडे देऊ. प्रायव्हेटला संच चालविण्यास दिल्यानंतर ते किती क्षमतेने चालवित आहेत आणि कंपनी किती क्षमतेने संच चालविते हे बघितल्यानंतर आपल्याला त्याची तुलना करता येईल. मी ऊर्जा मंत्री म्हणून अशा प्रकारच्या सूचना महानिर्मितीच्या एम.डी.ना दिलेल्या आहेत.

सभापती महोदय, महानिर्मितीला 2005-06 या वर्षात 113 कोटी रुपये नफा झाला आहे. 2006-07 मध्ये 234 कोटी, 2007-08 मध्ये 300 कोटी, 2008-09 मध्ये 84 कोटी, 2009-10 मध्ये 203 कोटी, 2010-11 मध्ये 309 कोटी, 2011-12 मध्ये 200 कोटी आणि 2012-13 मध्ये 647 कोटी रुपये नफा झालेला आहे. महापारेषण कंपनी देखील चांगल्या प्रकारे काम करीत असून त्या कंपनीस देखील नफा मिळतो आहे. फक्त महावितरणच्या बाबतीत क्रॉस सबसिडी आणि आपणशेतकऱ्यांना फार स्वस्त दरात वीज देतो. त्यांना मोठया प्रमाणात सबसिडी देतो. आपल्याला माहिती आहे की, यंत्रमाग धारकांना देखील सवलतीच्या दरात वीज देण्याचा आपण प्रयत्न करीत असतो. तसेच उद्योगांना मात्र 24 तास वीज देत असलो तरी रात्री 8 तास वीज 2 रुपये 50 पैसे प्रति युनीट दर कमी केलेला आहे. आपल्याला आश्चर्य वाटेल की, आपल्याकडे रात्रीच्या वेळी सरप्लस वीज असल्यामुळे आम्ही आजुबाजूच्या राज्याना विचारणा करतो आहोत की, आमची वीज आपण खरेदी करणार काय ? आज देशामध्ये वीज घेणारी राज्ये आहेत, ते वीज घेतात. परंतु विजेचे पैसे देत नाहीत. उद्योगाना रात्रीच्या वेळी विजेचा दर 2 रुपये 50 पैसे प्रति युनीट देतो आहोत. आम्ही उद्योगांना आवाहन केले आहे की, रात्रीच्या वेळी उद्योग चालविण्याच्या बाबतीत आम्हाला प्रतिसाद द्यावा. जेणे करुन रात्रीच्या वेळेस कमी दराने वीज उपलब्ध करुन देऊ शकतो अशी सध्याची परिस्थिती आहे.

यानंतर श्री. भोगले...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42940.....

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ऊर्जामंत्र्यांनी तपशीलवार निवेदन केलेले आहे. राज्यामध्ये विजेची परिस्थिती चांगली असल्यामुळे इतर राज्यांना रात्रीच्या वेळी वीज देऊ शकतो असेही त्यांनी सांगितले. ग्रामीण भागात 6 ते 8 तास भारनियमन केले जात आहे. याचा अर्थ वेळेवर देयके भरली जात नाहीत म्हणून भारनियमन केले जाते की पुरवठ्यामध्ये काही त्रुटी असल्यामुळे भारनियमन केले जाते? 2012 मध्ये महाराष्ट्र राज्य भारनियमन मुक्त होणार होते. आता राज्य केव्हा भारनियमन मुक्त होणार आहे?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितले की, डिसेंबर 2012 पर्यंत राज्याला भारनियमन मुक्त केले आहे. आपण ए, बी, सी, डी, ई, एफ, जी अशा कॅटेगरी केलेल्या आहेत. ए, बी, सी आणि डी कॅटेगरीमध्ये मोडणारे जे भाग असतील तेथे 24 तास वीज पुरवठा करण्याची व्यवस्था केलेली आहे. उद्योगधंद्यांना 24 तास वीज पुरविली जाते. आता रमजानचा पवित्र महिना सुरु आहे, नंतर येणारे गणेशोत्सव, नवरात्रौत्सव, दिवाळी, ख्रिसमस अशा महत्वाच्या सणाच्या काळात भारनियमन दूर केले जाते. मात्र ज्या भागात भारनियमन सुरु आहे तेथे आपल्याकडे पुरेशी वीज नाही म्हणून भारनियमन केले जात नसून त्यांनी वापरलेल्या विजेचे निम्मे देयक देखील त्या ग्राहकांकडून भरले जात नाही. 100 रुपयापैकी 50 रुपये भरले जातात. 50 टक्क्यापेक्षा जास्त लॉस असल्यामुळे तो तोटा ए, बी, सी आणि डी कॅटेगरीकडून भरुन काढावा लागतो. कारण नसताना त्यांच्यावर भूर्दंड पडतो. त्याकरिता लॉस असलेल्या भागात भारनियमन केले जाते.

आज कोणत्याही परिस्थितीत राज्यामध्ये भारनियमन सुरु ठेवू शकत नाही अशी स्थिती आहे. परंतु ज्या भागात भारनियमन केले जाते त्या भागातून वापरलेल्या विजेचे पैसे भरले जात नाहीत, त्या भागातील लोकांना शिस्त लावावी हा त्यामागील हेतू आहे.

सभापती महोदय, वेळेवर घेतलेल्या कर्जाची परतफेड केली तर शेतकऱ्यांना कमी व्याज दर आकारला जातो. त्याच पध्दतीने महावितरण कंपनीचा, राज्य सरकारच्या ऊर्जा विभागाचा आणि लोकशाही आघाडी सरकारचा प्रयत्न चाललेला आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42940.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाप्रमाणे ज्यांनी दर्जेदार कोळसा पुरविला नाही म्हणून विजेचे उत्पादन कमी झ ाले अशा कंपन्यांची संख्या किती आहे, त्या कंपन्यांची देयके थांबविली आहेत का, त्यांच्यावर कारवाई केली आहे का, त्या कंपन्यांना काळ्या यादीत टाकले आहे का? मंत्री महोदयांनी सांगितले की, अशा कंपन्यांवर कारवाई करणार आहोत. माझ्या माहितीप्रमाणे अशा कंपन्यांवर कारवाई झाली असून त्यांचे पेमेंट थांबविले आहे. त्या कंपन्यांना काळ्या यादीत टाकण्यात येईल काय? को-जनरेशन करणारे कारखाने वर्षाला 160 दिवस चालतात व 160 दिवस बंद असतात. त्यांना 10 ते 15 टक्के कोळसा वापरण्यास अनुमती दिलेली आहे. हे प्रमाण वाढवून 12 महिने कारखाने चालविण्याच्या दृष्टीने राज्य शासन योजना आखणार आहे काय? जेणेकरुन शेतकऱ्यांच्या ऊसाला अधिक दर देता येईल. अशा कारखान्यांकडून अधिक वीज उत्पादन केल्यास त्यांना जास्त दर मिळेल, नफा वाढेल आणि तो शेतकऱ्यांकडे पासऑन होईल. जे को-जनरेशन करणारे साखर कारखाने आहेत ते 12 महिने चालण्यासाठी त्यांना कोळसा वापरण्यास परवानगी दिली जाईल का?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, दुसऱ्या क्रमांकाचा प्रश्न विचारला त्या संदर्भात राज्य सरकार किंवा राज्याच्या ऊर्जा विभागाला अधिकार नाही. अपारंपारिक ऊर्जा जास्तीत जास्त तयार व्हावी म्हणून सातत्याने केंद्र सरकार प्रयत्न करीत आहे. सूर्य प्रकाशापासून वीज तयार होणारा प्रकल्प धुळे येथे सुरु करण्यात आला, त्या ठिकाणी तयार होणाऱ्या विजेकरिता 12 रुपये प्रती युनिट दर देण्यात आला. त्याचा सरासरी खर्च ग्राहकांकडून वसूल केला जातो. को-जनरेशनला 15 टक्क्यापेक्षा जास्त कोळसा वापरण्यास परवानगी दिली तर त्यातून निर्माण होणारी वीज ही अपारंपारिक गटातील असणार नाही. हायड्रो, को-जनरेशन, सोलर या अपारंपारिक ऊर्जा आहेत.

नंतर एल.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.42940**......

श्री. अजित पवार ......

उलट त्यामधून प्रदूषण वाढेल व पर्यायाने अधिक प्रश्न निर्माण होतील. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, यामुळे शेतकऱ्यांना दोन पैसे वाढवून मिळतील. परंतु आमच्या माहिती प्रमाणे शेतकऱ्यांचा फायदा होणार नाही. आपल्या राज्यात जून, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर या महिन्यात पाऊस पडतो व या काळात कोळसा भिजल्यामुळे तेवढया क्षमतेने वीज तयार होत नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नासंदर्भात राज्य सरकारला विचार करता येणार नाही. विजेचा दर एमईआरसी ठरवित असते. फार तर फायदा कसा होईल, या दृष्टीने आपण हिअरिंगमध्ये प्रयत्न करीत असतो. सुरुवातीच्या काळात को-जनचा दर 3.15 रुपये होता, नंतर तो 4.79 रुपये झाला. आता हा दर 5.79 रुपये किंवा 5.89 रुपये या प्रमाणे आहे. दर वाढविण्याचा प्रयत्न सातत्याने होत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्रीमती शोभा फडणवीस आणि सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत मी सांगू इच्छितो की, केंद्रीय कोळसा कंपनीकडून दीर्घ करारावर मोठया प्रमाणात कोळसा घेतला जात असतो. त्यातील काही कोळसा खराब असतो. कोळशात भेसळ करण्याचा प्रश्न नाही. महानिर्मिती कंपनी कोळसा खरेदी करते. कोळशाची प्रत खालावली असेल तर वीज तयार होण्याच्या प्रमाणानुसार देयक अदा केले जाते व उर्वरित रक्कम देयकातून वजा केली जाते. कधी कधी कोळसा आल्याबरोबर प्लँटमध्ये टाकला जातो. परळीचा प्लँट बंद पडल्यानंतर त्या ठिकाणी कोळसा डम्प करण्यात आलेला आहे. बऱ्याच वेळा अधिक कोळसा आणण्याचा प्रयत्न राज्य सरकारकडून केला जातो. परंतु रेल्वे वॅगन्स उपलब्ध नसल्यामुळे जास्त प्रमाणात कोळसा डम्प करुन ठेवता येत नाही. देश पातळीवर रेल्वे वॅगन्सच्या माध्यमातून कोळसा उपलब्ध होत असतो. अमरावती येथील इंडिया बुल्स प्लँटजवळ रेल्वे लाईन नसल्यामुळे तेथे कोळसा ट्रकने उपलब्ध करण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु त्याला तेथील जनतेने तसेच स्थानिक लोकप्रतिनिधीनी विरोध केला आहे. स्थानिक प्रश्नांचा विचार करुन मार्ग काढावा लागतो. खाजगी कंपन्यांकडून किंवा केंद्र सरकारी कंपन्याकडून घेतलेला कोळसा कमी दर्जाचा असेल तर देयकात वजावट केली जाते. देश पातळीवर कोळसा पुरविणाऱ्या बऱ्याच

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 42940**......

श्री. अजित पवार ......

कंपन्या आहेत. या सर्व कंपन्यांची माहिती मी पटलावर ठेवण्यास तयार आहे. सभागृहाला मी पुन्हा सांगू इच्छितो की, काही लोक जाणीवपूर्वक महाराष्ट्रातील जनतेमध्ये संभ्रमावस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतात. परंतु, कोळशाच्या संदर्भात राज्य शासनाने पूर्ण पारदर्शकता ठेवली असून ई-टेंडरिंगची पध्दत स्वीकारली आहे. या माध्यमातून राज्यातील जनतेला कमीत कमी दरात जास्तीत जास्त वीज कशी देता येईल, यासाठी महानिर्मिती व महावितरण कंपनी प्रयत्न करीत असते.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महाराष्ट्रातील महाजनको कंपनीची वीज निर्मिती कमी झाल्याबाबत**

**(१) * ४१६९५ श्री.विनोद तावडे, श्री.चंद्रकांत पाटील, ॲड.आशिष शेलार, श्री.रामनाथ मोते, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष चव्हाण, श्री.जयप्रकाश छाजेड, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.चरणसिंग सप्रा :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील महाजनको कंपनीने सन २००४ ते सन २०१२ दरम्यान १३ औष्णिक ऊर्जा प्रकल्पांवर सुमारे रु.१९,६७२ करोड खर्च करुन सुध्दा ५७३० मेगावॅटची अपेक्षित वाढ करु शकलेले नाहीत तसेच औष्णिक ऊर्जा प्रकल्पातून निर्माण होणारी सन २००४-०५ मधील ४२,९२९ मेगावॅट ऊर्जा सन २०१२-१३ मध्ये ३९,०४८ मेगावॅट पर्यंत कमी झालेली आहे, गत एका वर्षात खाजगी कंपन्यांकडून रु. ४५०० करोडची वीज खरेदी करण्यात आली व त्यातील सुमारे रु. १००० करोडचा भार वीजग्राहकांवर लादण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुपये १९,६७२,७९ कोटी एवढा निधी खर्च होवून देखील गत सहा वर्षात महानिर्मितीची वीजनिर्मिती एकाही दशलक्ष युनिटने न वाढता ती ३,८८१ दशलक्ष युनिटने कमी झाली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, हजारो कोटी रुपये खर्च करुनही वीज निर्मिती ३,८८१ दशलक्ष युनिटने कमी होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, महाजेनको कंपनीच्या या हलगर्जीपणासाठी शासनाने अधिकारी-कर्मचारी वर्गावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार** : (१) हे अंशत: खरे आहे.

महानिर्मिती कंपनीच्या औष्णिक ऊर्जा निर्मिती प्रकल्पातून निर्माण होणारी सन २००४-०५ मधील ४२९२९ मे.वॅ.ऊर्जा सन २०१२-१३ मध्ये ३९,०४८ मे.वॅ.पर्यत कमी झाली हे खरे आहे. मात्र सदर नमुद कालावधीत महानिर्मिती कंपनीने ५७३० मे.वॅ. पैकी २५०० मे.वॅ.चे औष्णिक वीज प्रकल्प कार्यान्वित केले आहेत व ३२३० मे.वॅ.चे औष्णिक वीज प्रकल्प उभारण्याची कार्यवाही युध्दपातळीवर सुरु आहे.

तसेच, सन २०१२-१३ मध्ये महावितरण कंपनीने ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी खाजगी कंपन्यांकडून लघूनिविदेद्वारे रुपये २५०० कोटी रुपयांची वीज सरासरी रुपये ३.८१ प्रती युनिट या दराने खरेदी केली आहे. सदर दर वीज नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या रु.४.५० प्रती युनिट या दरापेक्षा कमी आहे. हा दर व खाजगी कंपन्यांकडून घेतलेली वीज मा. आयोगाने ठरवून दिलेल्या महावितरण कंपनीच्या एकूण वीज खरेदीत समाविष्ट आहे. त्यामुळे त्याचा भार वीज ग्राहकावर लादण्यात आला असे म्हणता येणार नाही.

(२) व (३) प्रामुख्याने वाणिज्यिकरित्या न परवडणारे काही जुने संच बंद करणे, महानिर्मिती कंपनीस कमी झालेला कोळसा पुरवठा व कोळशाची घसरत चाललेली गुणवत्ता आणि पाण्याची कमतरता या कारणांमुळे वीज निर्मितीमध्ये घट झालेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

..४..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. ४१६९५........**

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील पहिल्या क्रमांकाच्या प्रश्नाचा क्रम बदलविण्यास आपण मान्यता दिल्यामुळे मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भातील सर्व माहिती मी घेतली असून प्रत्यक्षात १९,६७२ कोटी रुपये खर्च झाल्यानंतर तरी वीज निर्मिती वाढावयास हवी होती. परंतु, ती वाढलेली नाही. एकुण ३८८१ युनीट वीज कमी निर्माण झालेली आहे. निकृष्ट दर्जाच्या कोळशाची खरेदी, महाग आयात कोळशावर भर, कोळशाची गुणवत्ता तपासण्यामध्ये होणारा भ्रष्टाचार,

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41695....

श्री.विनोद तावडे...

किंवा विद्युत निर्मितीच्या संचाच्या देखभाल दुरूस्तीमधील भ्रष्टाचार आणि वस्तू खरेदीमधील भ्रष्टाचार यामुळे विद्युत निर्मितीमध्ये वाढ होत नाही ही सुद्धा कारणे आहेत. ती कारणे माननीय मंत्री महोदयांनी तपासली आहेत काय ? ही कारणे निर्माण करणाऱ्यांच्या पाठीशी सरकार राहते असा प्रश्न नक्कीच सामान्य माणसांच्या मनामध्ये आहे. सामान्य माणसाच्या मनामध्ये भ्रष्टाचारासंबंधातील चर्चा नेहमी होत असते असे मी आताच म्हणालो आहे. हे सर्व लक्षात घेता सन 2004 ते 2012 या कालावधीत झालेल्या कोळसा खेरदीची गुणवत्ता तपासणाऱ्या अधिकाऱ्यांची व वीज निर्मिती संच व त्यांचे पार्टस् खरेदी करणाऱ्या प्रक्रियेची चौकशी शासन करणार आहे काय ? आताच काही वेळा पूर्वी आदरणीय ऊर्जा मंत्री श्री.अजित पवार म्हणाले की, यात काहीच नाही. असे असेल तर त्यांनी याची चौकशी करावी. चौकशी झाल्यानंतर जनतेचे समाधान होईल. शेतकऱ्यांना असे वाटते की, हे आपल्या नावावर सबसिडी घेतात आणि कंपन्या प्रॉफिटमध्ये येतात. एवढी वीज आमच्या कृषी पंपाना मिळते काय, तर ती मिळत नाही हे आम्ही मागच्या अधिवेशनात आकडेवारीसह दाखवून दिले आहे. शासनाच्या पैशामुळे कंपन्या प्रॉफिटमध्ये जात असतील तर माननीय ऊर्जा मंत्री श्री.अजित पवार यांना विचारू इच्छितो की, या सगळ्या हिशोबाची आपण कालबद्ध चौकशी करणार आहात काय ? सदर चौकशी आम्हाला चितळे आयोगा सारखी नको आहे. त्यासंबंधी आम्ही संध्याकाळी चर्चा करणार आहोत. या सर्व गोष्टींविषयी लोकांच्या मनात सातत्याने चर्चा आहे. त्यासंबंधातील चौकशी आपण लोकांना करून दाखविणार आहात काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षे नेते यांच्यासह विरोधी पक्षातील इतर काही माननीय सदस्य सातत्याने यात भ्रष्टाचार झाला आहे, भ्रष्टाचार झाला आहे अशा प्रकारचे वक्तव्य करत असतात. आज देखील प्रश्न विचारत असताना सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी तोच मुद्दा उपस्थित केला. या प्रश्नाच्या उत्तराच्या निमित्ताने मी राज्यातील जनतेला अतिशय स्पष्टपणे सांगू इच्छितो की, कुठला कोळसा घेत असताना भ्रष्टाचार झाला आहे, कुठली खरेदी करत असताना भ्रष्टाचार झाला आहे, कसा भ्रष्टाचार झाला आहे, हे सांगितले पाहिजे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41695....

श्री.अजित पवार....

भ्रष्टाचार झाला आहे असे नुसते सांगून चालणार नाही, तर त्यांनी त्यासंबंधातील कागदपत्रे द्यावीत. आवश्यकता वाटल्यास मी अतिशय चांगले अधिकारी चौकशी करण्यासाठी देण्यास तयार आहे. राज्यातील चांगल्या रँकचे सेक्रेटरी किंवा ॲडिशनल चीफ सेक्रेटरी रँकचे किंवा प्रिन्सीपल सेक्रेटरी रँकचे अधिकारी चौकशी करण्यासाठी देण्यास तयार आहे. या सर्व चांगल्या अधिकाऱ्यांची नावे मी त्यांना स्वत: देतो आणि त्यातील त्यांना पाहिजे असलेला अधिकारी निवडावा. त्यांनी ह्या अधिकाऱ्या मार्फत चौकशी करण्यास सांगितल्या नंतर मी त्या अधिकाऱ्याला चौकशी करण्यास सांगतो. त्या अधिकाऱ्याला सहा महिन्यांची मुदत देतो. सहा महिन्यात महाराष्ट्रातील जनतेला एकदाचे कळू द्यावे की, विरोधक जो बिनबुडाचा आरोप करीत आहेत तो खरा आहे की, अजित पवार सांगत आहेत ते खरे आहे. हे महाराष्ट्रातील जनतेला कळू द्यावे.

सहा महिन्या नंतर लोकसभेच्या निवडणुकीला सामोरे जाताना जर आम्ही चुकलेलो असेल तर त्यांनी जनतेला सांगावे की, यांनी कशा चुका केल्या आहेत. त्यांनी जर खोटा आरोप केला असेल तर मी जनतेला सांगेन की, त्यांनी खोटा आरोप करून लोकांची दिशाभूल केली. माझी त्याबद्दल तयारी आहे. मला त्यांनी आपल्या मार्फत चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे द्यावीत. त्यांनी कुठे कुठे, काय काय भ्रष्टाचार झाला आहे हे सांगावे. त्याची चौकशी हे अधिवेशन संपण्याच्या आत करण्यास तयार आहे. सदर चौकशी करण्यासाठी लागणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे मी आपल्या देखतच देतो. एवढेच नव्हे तर त्यासाठी मी आपल्या चेंबरमध्ये येऊन बसतो आणि त्या चौकशी अधिकाऱ्याला सहा महिन्यांची मुदत देतो. माझी या प्रकरणाची चौकशी करण्याची तयारी आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी माननीय ऊर्जा मंत्री श्री.अजित पवार यांचे आव्हान स्वीकारण्यास तयार आहे. माझी फक्त एकच मागणी आहे की, आपण याची न्यायालयीन चौकशी करणार आहात काय ? अधिकारी हे आपलेच असून त्यांनाच चौकशीसाठी नेमणार आहात. त्यामुळे आम्हाला उडवाउडवीचे उत्तर नको. या प्रकरणाची आपण न्यायालयीन चौकशी करणार आहात काय ? आपण जर न्यायालयीन चौकशी करणार असाल तर मी सगळी कागदपत्रे देण्यास तयार आहे. हे आव्हान स्वीकारण्यास मंत्री महोदय तयार आहेत काय ?

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार : सभापती महोदय, काही अधिकारी हे चांगले आहेत हे माननीय विरोधी पक्ष नेत्यांना देखील माहीत आहे. मी स्पष्ट उत्तर दिल्यामुळे त्यांच्या अंगलट आल्यामुळे आता त्यांनी न्यायालयीन चौकशीची मागणी केली आहेत. जेव्हा एखादा प्रश्न निर्माण होतो तेव्हा आपण प्रत्येक वेळी न्यायालयीन चौकशीची मागणी करतो काय ? तेव्हा आपण वरिष्ठ पातळीवर चौकशी करावी अशा प्रकारची मागणी करतो. मी माझ्या सर्व आय.ए.एस.अधिकाऱ्यांची यादी आपल्याला देतो. आपण सांगाल त्या अधिकाऱ्या मार्फत चौकशी करण्यास तयार आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.अजित पवार म्हणाले की, विरोधक भ्रष्टाचार झाला आहे असा आरोप करीत आहे. हा प्रश्न आमच्या सह सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त, श्री.सुभाष चव्हाण, श्री.जयप्रकाश छाजेड, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती दीप्ती चवधरी, श्री.भाई जगताप, श्री.चरणसिंग सप्रा यांनी देखील विचारला आहे. म्हणजे सत्तेत बसलेल्या सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, यात भ्रष्टाचार होत आहे. हे म्हणणे केवळ विरोधकांचे नाही तर काँग्रेस पक्षातील सन्माननीय सदस्यांचे व आमचे देखील आहे. तेव्हा माननीय मंत्री श्री.अजित पवार न्यायालयीन चौकशीचे आव्हान स्वीकारणार आहात काय, असा माझा प्रश्न आहे. हे आव्हान आपण स्वीकारले तर मी सगळी कागदपत्रे देण्यास तयार आहे.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 41695....

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या भाषणातील शेवटचा भाग मी कामकाजातून काढून टाकत आहे.

प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत**

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, चंद्रकांत पाटील, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.रणजित पाटील, श्री.रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री भाई गिरकर, नागो पुंडलिक गाणार व भगवान साळुंखे यांनी "महाराष्ट्राचे श्रध्दास्थान व आराध्य दैवत असलेल्या श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या संस्थानाबाबत सन 2002 पासून लेखापरीक्षण अहवालात गंभीर त्रुटी निदर्शनास येऊनही त्यामध्ये कोणत्याही सुधारणा न करणे " या विषयावर नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. हा विषय नियम 289 चा कसा होऊ शकतो याबाबत माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी थोडक्यात त्यांचे म्हणणे मांडावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, उद्या संपूर्ण महाराष्ट्र पंढरीच्या विठुरायाचे नामस्मरण करीत पंढरपूरला पोहोचणार आहे. पंढपूरचा विठुराया हा संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेचे दैवत आहे. महाराष्ट्राच्या आराध्य दैवताच्या संस्थानाबाबत लेखापरीक्षणाच्या अहवालात गंभीर त्रुटी निदर्शनास येऊनही त्या बाबत दुरुस्ती न होणे. या देवस्थानाच्या मालकीची सुमारे 1220 एकर जमीन असून त्यातील 500 एकर जमीन दान स्वरुपात मिळालेली आहे. भाविकांनी श्रध्देने, भक्तीभावाने जमिनी दान केलेल्या आहेत. या जमिनीतून किती उत्पन्न मिळते, जमिनीची सद्य:स्थिती काय आहे, या जमिनीचा सात-बारा उतारा कोणाच्या नावे आहे याची माहिती नसल्याची बाब विधी व न्याय विभागाने केलेल्या चौकशीत आढळून आली. भाविकांनी पांडुरंगाच्या चरणी जे काही श्रध्देने वाहिले ते कुठे गायब होते याची काही माहिती नाही. सन 2002 पासून लेखापरीक्षण अहवालात अनेक गंभीर त्रुटी व आक्षेप नोंदवून सुध्दा त्यामध्ये काही सुधारणा होत नाही म्हणजे जाणीवपूर्वक गडबडी होत आहेत काय ? लेखा परीक्षण अहवालात ज्या बाबी निदर्शनास आल्या त्यामध्ये देणगी पावती पुस्तकांवर क्रमांक टाकलेले नाहीत. मंदिरात जमा होणाऱ्या रकमेचे अचूक तपशील उपलब्ध

..3..

श्री.विनोद तावडे....

नाही. त्या संदर्भात कोणी काही कार्यवाही केल्याचे दिसत नाही. मंदिरात जमा होणारी रक्कम रोज मोजून ती बँकेत जमा करणे आवश्यक असताना दोन-दोन महिने ती रक्कम गोण्यांमध्ये बांधून ठेवली जाते. सोन्याच्या दागिन्यांचे मूल्यांकन झालेले नाही इत्यादी बाबी होत आहेत.

सभापती महोदय,आषाढी एकादशीच्या आदल्या दिवशी अशाप्रकारचे वृत्त सर्व वर्तमानपत्रांतून आले आहे. लोकांचे श्रध्दास्थान असलेल्या देवस्थानामध्ये अशा प्रकारची अनियमितता होत असेल तर या प्रकरणी शासनाने लक्ष घालून काय कार्यवाही केली याची माहिती आषाढीच्या पूर्वसंध्येला वारकऱ्यांपर्यंत पोहोचली पाहिजे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

सन्माननीय सदस्य श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांनी मध्यंतरी वारी मार्गाचा विषय उपस्थित केला होता. माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी या विषयी मुख्य अभियंत्यांना पत्र लिहिले होते. परंतु त्यावर पुढे काहीच कार्यवाही झाली नाही. शिवाय मी लक्षवेधी सूचना दिल्यानंतर सार्वजनिक बांधकाम आणि नियोजन विभागाकडून सांगितले जाते की, या विषयाशी आमचा संबंध नाही. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, पंढरपूरचा पांडुरंग अनाथ झाला आहे काय ? मी दिलेली लक्षवेधी सूचना एका विभागाकडून दुसऱ्या विभागाकडे हस्तांतरित केली जात आहे. या निमित्ताने महाराष्ट्राचा पांडुरंग राज्यातील नेमक्या कोणत्या विभागाचा आहे हे आम्हाला कळू द्या. सार्वजनिक बांधकाम विभाग, महसूल विभाग किंवा नियोजन विभाग या पांडुरंगाची जबाबदारी का घेत नाही ? पांडुरंगाच्या वारीचा मार्ग किंवा त्या देवस्थानातील भ्रष्टाचाराची जबाबदारी नेमकी कोण घेणार आहे या बाबतची चर्चा या ठिकाणी होणे आवश्यक आहे. म्हणूनच मी 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते आणि विरोधी पक्षाच्या अन्य सन्माननीय सदस्यांनी म.वि.प. नियम 289 अन्वये सभागृहाचे कामकाज स्थगित करण्याबाबतची सूचना दिली आहे. महोदय, या विषयामुळे कारण नसताना राज्यातील जनतेमध्ये चुकीचा संदेश जाईल. या निमित्ताने मला सर्वप्रथम सभागृहामार्फत राज्यातील जनतेच्या लक्षात आणून द्यावयाचे आहे की, हे जग जो पर्यंत राहणार आहे तो पर्यंत पांडुरंग अनाथ होणार नाही. लोकशाही आघाडीचे सरकार या देवस्थानाविषयी उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांचे उत्तरे देण्यास मजबूत आणि खंबीर आहे.

महोदय, माननीय केंद्रीय पर्यटन मंत्र्यांनी आज राष्ट्रीय पर्यटन परिषद आयोजित केल्यामुळे राज्याचे माननीय पर्यटन मंत्री श्री.छगन भुजबळ यांना त्या परिषदेला उपस्थित राहण्यासाठी जावे लागले. या बाबत माननीय पर्यटन मंत्र्यांनी आपल्याला आणि विधिमंडळ नेता म्हणून मला सुध्दा पत्र दिले आहे. मी नियोजन विभागाचा मंत्री आहे.

या निमित्ताने मला स्वर्गीय विलासराव देशमुख यांची आठवण आल्याशिवाय राहत नाही. मला आठवते की, संत तुकाराम महाराजांच्या जन्मशताब्दीला 400 वर्षे झाल्यामुळे सर्वांनी मागणी केली होती की, 400 कोटी रुपयांचा कार्यक्रम आखावा. त्यामुळे स्वर्गीय विलासराव देशमुख यांनी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

देहू, आळंदी, भंडारा डोंगर, पंढरपूर या तीर्थक्षेत्रांच्या विकास कामांसाठी 400 कोटी रुपयांचा आराखडा जाहीर केला. त्यानुसार दि.6 जुलै, 2009 रोजी 691 कोटी रुपयांच्या आराखड्यास मान्यता दिली. 450 कोटी रुपये राज्य सरकारच्या माध्यमातून त्या ठिकाणी विभागीय आयुक्तांकडे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. मी पुणे जिल्ह्याचा पालकमंत्री आहे. सोलापूर व सातारा जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री माननीय प्रा.लक्ष्मणराव ढोबळे व माननीय श्री.रामराजे नाईक-निंबाळकर यांनी आणि विद्यमान पालकमंत्री माननीय ॲड.दिलीप सोपल व माननीय श्री.शशिकांत शिंदे यांनी ही कामे वेळेत व्हावीत म्हणून प्रयत्न केलेले आहेत. पालखी मार्ग कोणता असावा, चौपदरी रस्ता कसा व्हावा, कोणत् रस्ते महानगरपालिकेने करावेत आणि कोणते रस्ते या विकास आराखड्यातून करावेत या बाबतचे नियोजन करण्यात आलेले आहे. केवळ तात्पुरते नियोजन न करता, पालखी मार्गावर विसावा, मुक्कामाचे ठिकाण, पालखी मार्गासाठी आरक्षण इ. बाबींकडे लक्ष दिलेले आहे. आता नागरीकरण मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे, पालखी मार्गासाठी आरक्षण ठेवले पाहिजे. कारण वाढत्या नागरिकीकरणामुळे पालखीचा मुक्काम कोठे ठेवावा हा प्रश्न भविष्यात निर्माण होईल. म्हणूनच या सर्व बाबींवर राज्य सरकारने बारकाईने लक्ष ठेवले आहे.

महोदय, काल साईबाबा संस्थानला दान पेटीमध्ये मिळालेले सोने वितळविल्याबद्दल काही आरोप खालच्या सभागृहात करण्यात आले. मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना आपल्यामार्फत सांगू इच्छितो की, त्यांनी या ठिकाणी जे मांडले त्याबाबत राज्य सरकार संपूर्णपणे बारकाईने चौकशी करण्यास तयार आहे. पंढरपूर देवस्थान समितीचे अध्यक्ष आता माननीय श्री.अण्णा डांगे साहेब झाल्यामुळे कदाचित काहींना थोडेसे वाईट वाटत आहे, असे मला वाटते. कारण एके काळी आपल्याजवळ बसणारे श्री.अण्णा डांगे साहेब आता त्या देवस्थानाचे प्रमुख आहेत. वास्तविक पाहता श्री.डांगे साहेब किती सरळ स्वभावाचे आहेत हे माननीय श्री.विनोद तावडे यांना माहीत आहे. माननीय श्री.अण्णा डांगे साहेब हे एके काळी माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांचे नेते म्हणून काम करीत होते. असो.

या 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेच्या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, आज थोड्या वेळाने राज्याचे प्रमुख माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण हे राज्यातील 11.5 कोटी जनतेच्या वतीने पांडुरंगाची पूजा करण्यासाठी आणि त्यांचे दर्शन घेण्यासाठी त्या ठिकाणी जाणार आहेत.

नंतर श्री.बरवड..

अग्रिम प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ...

उद्या आषाढी एकादशी आहे त्यामुळे हे सर्व झाल्यानंतर आपण दोन्ही बाजूच्या सदस्यांबरोबर चर्चा करुन पुढच्या आठवड्यात या संदर्भात वेगळा वेळ ठरवावा. या संदर्भात व्यवस्थितपणे चर्चा करण्याची, उत्तर देण्याची राज्य सरकारची तयारी आहे. जर कोठे चुकले असेल तर ती चूक मान्य करुन त्यावर ॲक्शन घेण्याची सुध्दा राज्य सरकारची तयारी आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझी आपल्याला एवढीच नम्र विनंती आहे की, मी दिलेली लक्षवेधी सूचना किती खात्यामध्ये पुढे टॉस होत गेली हे कृपया आपण सभागृहाला सांगावे. यामध्ये मला कोणतेही राजकारण करावयाचे नाही. वारीमार्गाचा विषय मागच्या वेळी श्री. विजयसिंह मोहिते-पाटील यांनी मांडला होता. आम्ही ज्यावेळी जेजुरी ते वाल्हे गेलो तेव्हा जेजुरीचे तहसीलदार मला भेटले होते. त्यांनी सांगितले की, ज्या ठिकाणी वारीचा मुक्काम होता त्या ठिकाणी प्लॉटींग झाल्यामुळे मुक्कामाला अडचण आली. त्यांनी पुढची जागा पाहिलेली आहे. ती जागा ॲक्वायर केल्याशिवाय पुढच्या वेळी वारीचा मुक्काम करता येणार नाही. नाही तर मुक्काम दुसऱ्या गावामध्ये हलवावा लागणार आहे. अशा अनेक अडचणी आहेत की ज्याची चर्चा करावी लागणार आहे. ही चर्चा करावयाची असेल आणि या निमित्ताने ती चर्चा होणार असेल तर आपण ती करावी. मी वारीमार्गाच्या संदर्भात जी लक्षवेधी सूचना दिली ती पहिल्या दिवशी लागली नाही. पुढच्या दोन दिवसामध्ये आणखी तीन खात्यांनी होय, नाही असे केले. सभापती महोदय, यातील वास्तव काय आहे ते रेकॉर्डवर येऊ द्यावे. मला विरोधी पक्ष नेता म्हणून राजकारण करावयाचे नाही. मी खरोखर वारकऱ्यांविषयी जे अनुभवले, जे जाणले ते मला मांडावयाचे होते. म्हणून आम्ही नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. त्या ठिकाणी श्री. अण्णा डांगे यांना नेमले आहे की आणखी कोणाला हा प्रश्न नाही. यामध्ये आम्हाला राजकारण करावयाचे नाही. किमान पांडुरंगाच्या चरणी तरी आपण राजकारण करु नका एवढेच मला सांगावयाचे आहे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, मी राजकारण करीत नाही त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. यामध्ये त्यांचा स्वच्छ हेतू दिसतो. मी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .....

आपल्यामार्फत त्यांना सांगू इच्छितो की, पुढच्या आठवड्यात ही चर्चा घ्यावी. नियोजन, बांधकाम वगैरे कोणत्याही खात्याकडे न पाठविता एकटा मी या सर्वांची उत्तरे देण्यास तयार आहे आणि मी उत्तर देईन.

**सभापती** : लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याबाबत मी सांगू इच्छितो. सर्वसाधारण नियम असा आहे की, विधिमंडळाने एखादा प्रश्न एखाद्या विभागाकडे पाठविल्यानंतर तो प्रश्न त्या विभागाचा आहे की अन्य विभागाचा आहे हे ठरविण्याचा अधिकार मुख्य सचिवांना दिलेला आहे. मुख्य सचिवांकडून माझ्याकडे काहीही आलेले नाही. त्यामुळे ती लक्षवेधी सूचना नियोजन विभागाकडे गेली की बांधकाम विभागाकडे गेली की अन्य काही झाले याच्याशी माझा तसा संबंध नाही.

आज अत्यंत महत्वाच्या विषयावर नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे ती सूचना मी नाकारलेली नाही. कारण त्या विषयाचे पावित्र्यच खूप मोठे आहे. मी एवढेच सांगेन की, या बाबतीत जी चर्चा करावयाची आहे त्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी आपले विचार मांडलेले आहेत तसेच माननीय सभागृहाचे नेते श्री. अजितदादा पवार यांनीही आपले विचार मांडलेले आहेत. दोन्ही बाजूच्या सदस्यांबरोबर चर्चा करुन येत्या आठ ते दहा दिवसांमध्ये या प्रस्तावावरील चर्चेला मी 3 तासाचा वेळ देईन.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माझी एक विनंती आहे. आपण खूप चांगला निर्णय दिलेला आहे आणि त्यामुळे या अतिशय ज्वलंत प्रश्नाला न्याय मिळेल. कारण लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून दहा पंधरा मिनिटे चर्चा झाली असती परंतु आपण तीन तासाचा वेळ देणार आहात. या ठिकाणी आपला विषय मांडताना माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी 'पांडुरंग अनाथ झाला का' अशी जी काही वक्तव्ये केलेली आहेत ती कामकाजातून काढण्यात यावीत अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : मी फक्त ते तपासून घेईन.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली आहे त्याबद्दल मी आपली आभारी आहे. वारकऱ्यांच्या गाड्यांकडून टोलची आकारणी केली जाणार नाही असे शासनाने जाहीर केले होते. त्याबाबत शासनाने तातडीने पावले उचलावीत अशी मी विनंती करीत आहे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरला जाणाऱ्या पालख्या निघतात त्यामध्ये असलेल्या गाड्यांकडून टोल घेतला जात नाही. आता शासनाकडे या संदर्भात तक्रारी आल्या आहेत की, दर्शनाला जाणारे भाविकही आम्ही टोल भरणार नाही असे म्हणत आहेत. पंढरपूरला माऊलींची, ज्ञानेश्वर महाराजांची, सोपान काकांची पालखी जाते. त्या पालख्यांमध्ये ट्रक असतात, लाईट वेट मोटर व्हईकल असतात अशा गाड्यांना त्या दिवशी पालखीसोबत जाण्यापुरता टोल माफ केलेला आहे. उद्या आषाढी एकादशी आहे. परंतु आज काही लोक एक्सप्रेस हाय-वे वरुन जात असताना आम्ही टोल भरणार नाही असे म्हणत असतील तर ते चालणार नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सोलापूरकडून शेटफळकडून प्रवेश दिला जातो किंवा सोलापूरकडून प्रवेश दिला जातो तेथील टोल नाक्यांचा प्रश्न आहे. सोलापूरच्या जवळ यवतच्या टोल नाक्यावर टोलची माफी मिळावी असे कोणी म्हणणार नाही.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, पुणे जिल्ह्यातील जेजुरी किंवा सासवड येथून पालखी पास होत असते, त्यावेळी त्यांच्यासोबत असलेल्या गाड्यांना त्या दिवशी टोल माफच केलेला आहे.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

**सभापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"राज्यातील मागासवर्गीय दलित वंचित समाजाची आर्थिक आणि सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी 1970 च्या दशकात अनुसूचित जाती, जमाती, नवबौध्द, भटके-विमुक्त आदि प्रवर्गातील विद्यार्थ्यांना विना अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये फ्रीशिप देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला होता. त्याचप्रमाणे मंडल आयोगाचा अहवाल लागू झाल्यापासून ओबीसी/एसबीसी प्रवर्गानांही हा निर्णय लागू करण्यात आला. मात्र ही योजना शासनाने 2007 सालापासून बंद केल्यामुळे खासगी शाळांनी मागासवर्गीय विद्यार्थी-पालक यांचा शुल्कासाठी छळ सुरु केल्याच्या विरोधात ह्युमन राईटस् नेटवर्क या संस्थेने केलेल्या तक्रारीनुसार राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या सन 2010-11 या शैक्षणिक वर्षातील शुल्क परतावा मे, 2013 पर्यंत घ्यावा व सन 2011-12 या वर्षातील थकित शुल्क 15 जुलै, 2013 पर्यंत घ्यावा असा आदेश काढण्यात येऊन ही मुदत दि.15.7.2013 रोजी संपली असूनही कोणतीही अद्याप कार्यवाही करण्यात आली नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत आहे. यामुळे या विद्यार्थ्यांना शुल्क परतावा त्वरित परत मिळण्याबाबत शासनाने त्वरित कार्यवाही करावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करीत आहे.

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"बिहारमधील विषबाधेच्या घटनेमुळे देशात हळहळ व्यक्त होत असतानाच धुळे जिल्ह्यातील सिंदखेडा तालुक्यातील तावखेडा येथे कस्तुराबाई आदिवासी आश्रमशाळेतील 34 विद्यार्थ्यांना बुधवार, दि.17.7.2013 रोजी उलट्या व जुलाब होऊ लागल्याने खळबळ उडाली आहे, यापैकी 10 विद्यार्थ्यांना सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून त्यांनी प्रकृती गंभीर आहे शाळेत दिल्या जाणाऱ्या मध्यान्ह भोजनामुळे अन्नातून विषबाधा झाली असल्याचा दावा पालकांकडून करण्यात येत आहे. राज्यात शाळेमध्ये मध्यान्ह भोजन देण्याचा हेतू कौतुकास्पद असला तरी राज्यात शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या मध्यान्ह भोजनामध्ये अनेक त्रुटी असल्याने राज्यात शाळेतून दिल्या जाणाऱ्या खिचडीतून विषबाधा झाल्याचे प्रकार घडले आहेत. बिहार राज्यात घडलेली घटना राज्यात घडू नये याकरिता राज्य सरकारने शाळेत दिलेल्या जाणाऱ्या मध्यान्ह भोजनाची ऑडिट करुन शाळेतून दिल्या जाणाऱ्या जेवणातून विषबाधा होण्याच्या घटनेला आळा बसण्यासाठी कार्यवाही करावी.

सभापती महोदय, कंत्राटदार लॉबी ज्या पध्दतीने काम करीत आहे ते पाहता कंत्राटदार पुरवित असलेल्या अन्नाच्या दर्जाबाबत मला शंका वाटत आहे. त्या ठिकाणच्या विद्यार्थ्यांना अभ्यास सोडून प्लेटस् धुण्याचे काम दिले जाते. त्या राज्यात घडले आहे ते या राज्यात घडू नये यासाठी शासनाने मध्यान्ह भोजनाचा ऑडिट रिव्ह्यू घेऊन अशा प्रकारच्या घटनांना आळा बसण्यासाठी कार्यवाही करावी अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला करीत आहे.

----

**<u>लक्षवेधी सूचना क्रमांक- 1 बाबत</u>**

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे. विधानसभेमध्ये आणि या सभागृहात आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविलेली क्रमांक 1 वरील लक्षवेधी सूचना ह्या एकाच विषयाच्या असल्यामुळे आपण क्रमांक 1 वरील लक्षवेधी सूचना आता घेतली तर मला विधानसभेच्या लक्षवेधी सूचनेच्या वेळी उपस्थित राहता येईल.

**उप सभापती** : ठीक आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नाशिक शहरात सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याची आवश्यकता

**मु. शी.** : नाशिक शहरात सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याची आवश्यकता यासंबंधी श्री. जयवंतराव जाधव वि.प.स. यांनी दिलेली दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संसथा ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नाशिक शहर हे अतिरेक्यांचे लक्ष्य असून देखील तेथे सीसीटीव्ही बसविण्याचा प्रस्ताव दोन वर्षापासून प्रलंबित असणे, हैद्राबाद मधील बॉम्बस्फोट हे संबंधित ठिकाणची रेकी करून घडविल्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमधील अतिरेकी कारवायांचा धोका लक्षात घेवून तातडीने सीसीटीव्ही बसविणे गरजेचे असणे, तसेच, आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी होणारी गर्दी विचारात घेऊन धोक्याच्या ठिकाणी वायफाय तंत्रज्ञानावर आधारित सीसीटीव्हीची आवश्यकता असणे, तसेच नाशिक पोलीस आयुक्तालयासाठी शासन निकषाप्रमाणे ३५२८ पदे, नवीन दोन विभागीय सहाय्यक पोलीस आयुक्त, सात पोलीस ठाणी व एक पोलीस चौकी निर्माण करण्याबाबतचा आयुक्तालयाचा प्रस्ताव देखील प्रलंबित असणे, शहर आयुक्तालयासाठी पुरेसे पोलीस अधिकारी, कर्मचारी, वाहने व साधन सामुग्रीचा अभाव असल्याने शहरामधील गुन्हेगारीला आळा घालणेसाठी पोलीस यंत्रणेवर पडत असलेला प्रचंड ताण, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव : दर 12 वर्षांनी होणारा कुंभमेळा यावेळी नाशिकमध्ये होणार आहे. कुंभमेळया व्यतिरिक्त नाशिकमध्ये इंडिया सिक्युरिटी प्रेस, करन्सी नोट प्रेस, एकलहरे औष्णिक विद्युत केन्द्र, स्कूल ऑफ आर्टलरी, सेण्ट्रल जेल, पोलीस ॲकॅडमी यासारख्या विविध संस्था नाशिकमध्ये कार्यरत असताना तसेच कुंभमेळा जवळ आलेला असताना या ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा दोन वर्षे होऊन गेले तरी बसविण्यात आलेली नाही. ही यंत्रणा नाशिकमध्ये तातडीने कार्यान्वित करण्यासाठी पोलीस यंत्रणेमार्फत राज्य शासनाकडे मागणी केली होती. माझा प्रश्न असा आहे की, एवढा महत्वाचा विषय असताना आणि दोन वर्षे उलटलेली असताना सीसीटीव्ही बसविण्याच्या प्रस्तावास का मंजुरी मिळू शकलेली नाही ? अर्थखात्याची अंतिम मंजुरी मिळून नाशिक शहरामध्ये सीसीटीव्ही यंत्रणा केव्हा बसविली जाणार आहे ? गुन्हेगार हे आपल्यापेक्षा 10 पावले पुढे असतात त्यामुळे सीसीटीव्ही यंत्रणा बसविताना त्यामध्ये आयडेण्टिफिकेशनचे सॉफ्टवेअर बसविले जाईल काय ? दिनांक 20 ऑगस्ट 2011 रोजी पोलीस आयुक्तानी पोलीस ठाण्याचे विभाजन करुन 7 नवीन पोलीस ठाणी निर्माण केली. या पोलीस ठाण्यासाठी लागणारे अधिकारी व पोलीस कर्मचारी या संबंधीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविलेला आहे. आता नाशिकमध्ये होणारा कुंभमेळा आणि त्या ठिकाणी कार्यरत असणा-या विविध संस्था या सर्वांचा विचार करुन एक खास अधिका-याची नेमणूक करुन सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्याच्या संदर्भात शासन कालबद्ध कार्यक्रम आखील काय ?

श्री. आर.आर.पाटील : नाशिकमध्ये होणारा कुंभमेळा आणि आतापर्यंत आतंकवाद्यांनी नाशिकमधील पोलीस ॲकॅडमीवर हल्ला करण्याच्या दिलेल्या धमक्या यासर्व गोष्टी लक्षात घेऊन सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय राज्य सरकारने तत्वत: घेतलेला आहे. आपण मुंबईला सीसीटीव्ही कॅमेरे बसविणार आहोत आणि त्याच पध्दतीने पुणे, नाशिक या ठिकाणी देखील सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत असा सरकारचा प्रस्ताव आहे. मुंबईच्या प्रस्तावास वेळ लागलेला आहे. मुंबईसाठी आपण पहिल्यांदा टेंडर काढले त्यावेळी एकच टेंडर आले. दुस-यांदा टेंडर काढले त्यावेळी त्यातील जो लोएस्ट होता त्याने देखील आता माघार घेतलेली आहे. 627 कोटी रुपयाचे टेंडर होते. आता जे दुसरे टेंडर आहे ते 950 कोटी रुपयाचे आहे. दोन टेंडरमध्ये खूप मोठा

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

फरक आहे. हे काम करण्यासाठी कुठेही वेळ लागू नये, मंत्रीस्तरावर वेळ लागू नये, फाईल्स फिरत राहू नयेत म्हणून मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाने एक कमिटी गठीत केलेली आहे. या कमिटीला कामाना मान्यता देण्याचे अधिकार दिलेले आहेत. मुंबईचा प्रोजेक्ट कॉण्ट्रॅक्टर नेमण्याच्या बाबतीत लांबलेला आहे. परंतु त्याही बाबतीत लवकर निर्णय घ्यावा अशा सूचना सरकारने दिलेल्या आहेत. सेकंड लोएस्ट टेंडर 950 कोटी रु.चे आहे. त्यांच्या बरोबर चर्चा करुन लवकर निर्णय घेण्यात येईल.

पुण्यामध्ये देखील 338 कोटी रुपयाच्या सीसीटीव्ही कॅमेरॅच्या प्रोजेक्टला सरकारने मान्यता दिलेली आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम 12:30

श्री.आर.आर.पाटील...

आता ते टेंडर अंतिम होण्याच्या टप्प्यावर आहे. नाशिकचा 51 कोटी रुपयांचा प्रस्ताव आलेला आहे. नाशिक येथे होणारा सिंहस्थ मेळावा लक्षात घेऊन लवकरात लवकर हा प्रोजेक्ट पूर्ण झाला पाहिजे अशी गृह विभागाची भूमिका आहे. सी.पी.नाशिक यांनी 51 कोटी रुपयांचा प्रस्ताव पाठविला आहे. या वर्षी संपूर्ण महाराष्ट्रातील वेगवेगळया शहरात सी.सी.टी.व्ही.बसविण्यासाठी 149 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. नाशिकचा प्रोजेक्ट अजून शासनाकडे आलेला नाही. तो डी.जी.स्तरावर आहे. तो प्रोजेक्ट येत्या दोन दिवसात शासनाकडे येईल. या प्रोजेक्टचे काम लवकरात लवकर सुरु व्हावे म्हणून या वर्षी विभागाला एकूण तरतूद प्राप्त आहे, त्यामधून 2 कोटी रुपयांचे प्रावधान तातडीने कामाला सुरुवात करावी, टेंडर प्रक्रिया सुरु करावी अशी सरकारची भूमिका आहे. नाशिक शहरासाठी सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविण्याचा उल्लेख केला गेला. ते सी.सी.टी.व्ही.कॅमेरे सिंहस्थ मेळाव्यापूर्वी बसवावेत असा सरकारचा निश्चितपणे प्रयत्न आहे आणि पोलीस विभागाने तशी मागणी केलेली आहे.

सभापती महोदय, नाशिक शहरात औद्योगिकीकरण होत आहे, त्याचप्रमाणे त्या शहरात वेगवेगळया शिक्षण संस्थेत बाहेरील राज्यातील तसेच राज्यातील इतर जिल्हयातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यामुळे नाशिक शहराची लोकसंख्या वाढत आहे. पर्यायाने नाशिक शहराची वाढलेली व्याप्ती वाढली आहे, मोठया प्रमाणात औद्योगिकीरण होत आहे. त्यामुळे पोलीस दलात फार मोठया प्रमाणात वाढ करण्यात यावी अशा प्रकारची सन्माननीय सदस्यांनी मागणी केलेली आहे.या शहराची वाढलेली व्याप्ती बघता सी.पी.नाशिक यांनी 3528 पदे ही अतिरिक्त मागितलेली आहे. चांगल्या प्रकारचे पोलिसींग करण्यासाठी एवढया पदांची आवश्यकता आहे असे नाशिक सी.पी.यांना वाटते आहे. सगळया घटक प्रमुखांची मागणी लक्षात घेतली तर पोलीस खात्यात पोलिसांच्या संख्येत फार मोठी वाढ करावी लागेल. इतकी मोठी वाढ करावयाची असल्यास राज्यातील साधन-सुविधा लक्षात घेऊन, तसेच राज्य शासनाकडील निधीची उपलब्धता लक्षात घेऊन वित्त विभागाची मान्यता मिळत असते. त्यानुसार सरकारचे धोरण ठरत असते. या वर्षी वेगवेगळया जिल्हयांनी अतिरिक्त किती पोलिसांची आवश्यकता आहे यासंबंधी मागणी केलेली आहे. डी.जी.ऑफिसने अजून 61 हजार पोलिसांची पदे नव्याने निर्माण केली पाहिजेत अशा पध्दतीची मागणी केलेली आहे. किती पदे वाढवावयाची याचा शासन स्तरावर विचार सुरु आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

नाशिक पोलीस मुख्यालयातील रिक्त पदांच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला. पोलीस शिपायांची 1287 पदे नाशिक शहरात होती, त्यातील 1285 पदे भरण्यात आलेली असून फक्त 2 पदे रिक्त आहेत. पोलीस नाईकांची 590 पदे आहेत. त्यात 588 पदे भरलेली आहेत. तेथेही केवळ 2 पदे रिक्त आहेत. पोलीस हवालदार या संवर्गातील 493 पदे आहेत. त्यातील 474 पदे भरलेली आहेत. 19 पदे रिक्त आहेत. सहायक उप निरीक्षक 179 पदे मंजूर आहेत. ती सगळी पदे भरलेली आहेत. या ठिकाणी थोडया रिक्त जागा आहेत. पोलीस निरीक्षकांची एकूण संख्या 49 एवढी आहे.त्यापैकी 48 पदे भरलेली असून 1 पद रिक्त आहे. सहायक पोलीस निरीक्षकांची 62 पदे मंजूर आहेत त्यापैकी 12 पदे रिक्त आहेत. राज्यात पी.एस.आय.ची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. मध्यंतरीच्या काळात एम.पी.एस.सी.चे कामकाज बंद होते. या कालावधीत राज्यात बरेच पी.एस.आय.सेवानिवृत्त झाले म्हणून त्यांची बरीच पदे रिक्त आहेत. गेल्या तीन वर्षापासून एम.पी.एस.सी.ने चांगल्या संख्येने उमेदवार उपलब्ध करुन दिल्यामुळे पी.एस.आय.यांना प्रशिक्षण देण्याचे काम सुरु आहे. पी.एस.आय.च्या दोन बॅचेस बाहेर पडलेल्या आहेत.

आता नाशिक आणि तासगाव येथे 1594 पोलीस उप निरीक्षकांचे मूलभूत प्रशिक्षण सुरु आहे. ते प्रशिक्षण संपत आले आहे. ते उमेदवार प्रशिक्षण घेऊन बाहेर पडल्यानंतर नाशिक येथील रिक्त जागा प्राधान्याने भरण्यात येतील. तसेच राज्यातील सुध्दा या संवर्गातील रिक्त पदे भरण्यात येतील. नजिकच्या काळात रिक्त पदांची संख्या मोठया प्रमाणात कमी होईल. नाशिक शहरात सी.सी.टी.व्ही.कॅमेरे सिंहस्थापूर्वी बसविणे तसेच पोलीस दलात वाढ करणे या दोन्ही गोष्टी प्राधान्याने केल्या जातील.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माननीय गृहमंत्र्यांनी उत्तरात स्पष्ट केले की, डी.जी.यांनी 61 हजार पोलिसांची पदे नव्याने निर्माण करावीत अशी मागणी शासनाकडे केलेली आहे. नाशिक पोलीस आयुक्तालयासाठी शासन निकषाप्रमाणे 3528 पदे रिक्त आहेत, ती भरली पाहिजेत अशी लक्षवेधी सूचनेत मागणी केलेली आहे. लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात विविध संवर्गातील एकूण 317 पदे निर्माण करण्याचे प्रस्तावित केले आहे. रिक्त पदांच्या संख्येत प्रचंड तफावत दिसून येते आहे. जिल्हयातील पोलीस प्रमुखांकडून मागणी केली जाते की, आमच्या जिल्हयातील पोलीस यंत्रणेत एवढे मनुष्यबळ पाहिजे आहे.

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले..... लक्षवेधी सूचना क्र.1....

याची योग्य विचार करुन त्या संदर्भात मार्गदर्शक सूचना तयार करणार आहात का? ज्यावेळेला नाशिकच्या सिंहस्थ मेळ्यासाठी आम्ही मागणी करतो त्यामागील हेतू असा आहे की, सिंहस्थाच्या निमित्ताने नाशिक शहराला आणि जिल्हयाला जे जे मिळेल त्याचा आम्हाला दीर्घकालीन उपयोग करता येईल. महाराष्ट्रातील नाशिक हे असे ठिकाण आहे जे अनेकविध प्रगतीच्या मार्गाने खूप वेगाने पुढे निघाले आहे. शहरे मोठी होतात त्यावेळी गुन्हेगारी वाढते.

सभापती महोदय, सीसीटीव्ही यंत्रणा सिंहस्थापूर्वी नक्की बसविली जाईल असे मंत्री महोदयांनी सांगितले. सिंहस्थाच्या तोंडावर ही यंत्रणा बसविली तर त्याच्या वापरासंबंधीचे प्रशिक्षण द्यायला वेळ कधी मिळणार? गृह विभागामार्फत नाशिकच्या सिंहस्थाकरिता नियोजन कसे असावे यादृष्टीने अलाहाबादला यावर्षी झालेल्या कुंभमेळ्यामध्ये जिल्हयातील होमगार्डची टीम जाऊन आली. त्यांनी उत्तरप्रदेशातील कुंभमेळ्यामध्ये कोणकोणत्या सोयी सुविधा निर्माण केल्या, कशा पध्दतीने नियंत्रण केले, ट्रफिक रुल्स कसे केले याची पाहणी करुन अहवाल सादर केलेला आहे. 2015 मध्ये नाशिक येथे कुंभमेळा भरणार आहे. त्याची पूर्वतयारी 2014 अखेरपर्यंत निश्चितपणे करावी लागेल. सीसीटीव्ही यंत्रणा शहरामध्ये किंवा त्र्यंबक परिसरात बसविली जाणार आहे त्याची कनेक्टिव्हीटी आणि कॅमेऱ्यातून दिसणारी दृश्ये केंद्रीय ठिकाणी एकत्रित करुन त्याबाबत मॉनिटरिंग करुन त्यावर उपाययोजना करण्याची फेररचना केली पाहिजे.

सभापती महोदय, कुंभमेळ्याची रंगीत तालिम पोलीस खात्यामार्फत होण्याची नितांत आवश्यकता आहे. गृह खात्यातील वरिष्ठ अधिकारी आणि ज्यांना कुंभमेळ्याचा अनुभव आहे अशा निवृत्त अधिकाऱ्यांसह एकत्रित बसून आराखडा तयार करुन घेतला आणि त्याप्रमाणे अंमलबजावणी केली तर कुंभमेळ्याची विशेष बाब म्हणून केंद्र सरकारकडून आपल्याला अधिकचा निधी मिळू शकेल. त्यामुळे नाशिक भविष्यात कुंभमेळ्यासह प्रगतीपथावर जाईल, सुरक्षित असे ठिकाण निर्माण होईल यादृष्टीने प्रयत्न करणार आहात का?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, नाशिक येथील कुंभमेळा शांततेच्या वातावरणामध्ये व्हावा आणि तेथे कायदा व सुव्यवस्था रहावी, सुरक्षितता रहावी याकरिता ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या सर्व उपाययोजना केल्या जातील. या संदर्भात स्वत: पोलीस महासंचालक जातीने लक्ष घालून सर्व गोष्टी पहात आहेत. सभापती महोदय, हे खरे आहे की, आज नाशिक

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील......

शहराच्या लोकसंख्येच्या प्रमाणात पोलिसांची संख्या कमी आहे. कायमच्या दृष्टीने ही संख्या वाढविण्याबरोबर सिंहस्थाच्या वेळेला बाहेरुन खूप मोठया प्रमाणात पोलीस मनुष्यबळ आणावे लागेल. ते मनुष्यबळ आणण्याच्या कामाला प्राधान्य देऊ.

सभापती महोदय, होमगार्डची टीम उत्तरप्रदेशमधील कुंभमेळ्याच्या ठिकाणी गेली होती त्याप्रमाणे पोलीस विभागाचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सुध्दा तेथे जाऊन मॅनेजमेंटची पाहणी केली आहे. या संदर्भात आपलेही काही पोलीस अनुभवी आहेत. मोठमोठे कार्यक्रम त्यांनी यशस्वीपणे हाताळले आहेत. म्हणून सिंहस्थ कुंभमेळावा सुरक्षिततेच्या वातावरणामध्ये होईल, त्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा कुंभमेळ्याच्या अगोदर बसवून कॅमेरे हाताळण्याचे, ॲनालिसीस करण्याचे प्रशिक्षण कर्मचाऱ्यांना अगोदर मिळेल. त्या ठिकाणी प्रशिक्षण देणे आणि आवश्यक असलेले मनुष्यबळ वाढविणे या कामाला प्राधान्य दिले जाईल. नाशिकचा कुंभमेळा सुरक्षिततेच्या आणि शांततेच्या वातावरणामध्ये होईल या दृष्टीने सरकार सर्व उपाययोजना करेल.

नंतर यु.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, गृह मंत्री महोदयांनी संपूर्ण राज्यात बसविण्यात येणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेरांच्या नियोजना संदर्भातील माहिती दिली आहे. पुणे शहर अतिरेक्यांचे केंद्र असल्याचे सिध्द झाले आहे. पुणे शहरात एक वर्षापूर्वी बालगंधर्व चौकात झालेल्या बॉम्बस्फोटानंतर पुण्याच्या पालक मंत्री महोदयांनी व मुख्यमंत्री महोदयांनी बैठक घेऊन पुणे शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा प्रस्ताव तयार केला होता. त्यासाठी आमदार निधी व पुणे महानगरपालिकेचा एकत्रित निधी तयार करण्याचा निर्णय झाला होता. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना आम्ही पत्र दिले होते. आता गणेशोत्सव तोंडावर आला आहे. 338 कोटी रुपयांचा निधी पुणे शहरासाठी आहे की, सर्व राज्यासाठी आहे ? पुणे शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी किती निधी दिला जाणार आहे ? येणाऱ्या गणेशोत्सवाच्या अगोदर पुण्यामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जातील का ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, 338 कोटी रुपयांच्या ज्या प्रकल्पाचा मी उल्लेख केला आहे, तो मेन्टेनंस आणि ॲनालिसीसचा पुढील पाच वर्षाचा प्रकल्प आहे. सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी 338 कोटी रुपये लागणार नाहीत. गणेशोत्सवापूर्वी सीसीटीव्ही कॅमेरे बसविले गेले पाहिजेत, अशी पोलीस दलाची सुध्दा मागणी आहे. परंतु, सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम कार्यपध्दती पूर्ण न करता, टेंडर प्रक्रिया पूर्ण न करता केले तर राज्यात मापे काढणारे मोजणीदार खूप आहेत.

**उप सभापती** : सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम महानगरपालिकेकडे दिले तर योग्य होईल.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, महानगरपालिका सीसीटीव्ही कॅमेरे बसविणार असतील तर त्याला आमची डोळे झाकून परवानगी राहील. परंतु, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी काही वेळ लागणार आहे. सीसीटीव्ही कॅमेरे लवकरात लवकर बसविले जावेत, यासाठी आमचे प्रयत्न सुरु आहेत.

--------------------

...2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे**

**(पुढे सुरु.....**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"शिक्षण हक्क विधेयकाच्या अनुषंगाने राज्यातील शासनमान्य शाळांमध्ये दुर्बल घटकातील व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश क्षमतेच्या 25 टक्के प्रमाणात प्रवेश राखून ठेवले आहेत. मागासवर्गीय व दुर्बल घटकातील मुलांना प्रवेश देणे संबंधित शाळांवर बंधनकारक आहे. अनेक शाळांमध्ये याची अंमलबजावणी होत नाही व गोरगरिबांच्या मुलांना प्रवेशापासून वंचित ठेवले जात आहे. संबंधित शाळांवर शासन कोणतीही कारवाई करीत नाही. मुंबईत 12 हजार जागा असतांना फक्त 2399 प्रवेश झाले आहेत. सध्या प्रवेशासाठी शासनाने दिनांक 31 जुलै, 2013 पर्यंत मुदत दिली आहे. स्टॅन नॉलेज कॅम्पस शाळा, नालासोपारा या शाळेने पालकांना अपमानित करुन 25 टक्के प्रवेश देण्यास नकार दिला असल्याचे आम्हाला समजले आहे. शासनाकडे तक्रारी करुन देखील दखल घेतली जात नाही. 25 टक्के प्रवेश न देणाऱ्या शाळांवर व व्यवस्थापनावर फौजदारी गुन्हे दाखल करुन गोरगरीब व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवल्याबद्दल कडक कारवाई करावी, अशी माझी विनंती आहे."

धन्यवाद.

---------------

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. "मागील काही महिन्यात महाराष्ट्र राज्यात बऱ्याच ठिकाणी दुष्काळाची परिस्थिती असतांना या दुष्काळात राज्यातील जनता व जनावरे होरपळत असणे, भारतीय जैन संघटना, दिनदयाळ चॅरिटेबल ट्रस्ट, जनकल्याण समिती व लोकमंगल समूह, अनेक बँका व अनेक सामाजिक संस्थांनी 10 हजार ते 10-20 कोटी पर्यंत निधी उभारणे, या बरोबर मौल्यवान वेळही दिलेला असणे, या सर्व संस्था वेगवेगळया प्रकारे सर्वतोपरी मदत करीत असणे, त्यामुळे याबाबत त्या सर्व संस्था, समूह यांच्या अभिनंदनाचा ठराव करण्याबाबत मी औचित्याच्या मुद्दा उपस्थित करीत आहे."

------------

...4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी तालुक्यातील गुंठेवारी प्रकरणात कोटयावधींचा घोटाळा होणे, 2009 ला झालेल्या सार्वजनिक निवडणूकीपूर्वीही ले-आऊट धारक, भूमिग्रहण करणे व प्लॉट पाडून विकणारे अस्तित्वात निर्माण करणे,

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

दिनांक 10 जुलै 2012 च्या ठरावात मात्र बिल्डरांच्या हिताचा निर्णय घेण्यात आल्याचे स्पष्ट होणे, यासाठी धनदांडगे, बिल्डर व नगरसेवकांनी शासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरून ले-आऊट निर्माण करून प्लॉट विक्रीचा सपाटा सुरू करणे, त्यामुळे नवीन रस्ते, पक्क्या नाल्या, पाण्याची व्यवस्था, वीज खांबाची निर्मिती न करणे, याकरिता बनावट व खोटे दस्तावेज वापरून शासनाची व प्लॉट धारकांची फसवणूक करणे, या प्रकरणाची विविध स्तरावरून वरिष्ठांकडे तक्रारी केल्यानंतर त्रीसदस्यीय समिती स्थापन करून चौकशी करणे, बिल्डरांवर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होणे, गुंठेवारी प्रकरणात एका बिल्डरला अटक होणे, पोलिसांच्या हलगर्जीपणामुळे काही बिल्डर्स निसटणे, अशा प्रद्धतीची गुंठेवारीची प्रकरणे प्रत्येक जिल्ह्यात आहेत. अशी प्रकरणे चंद्रपूर जिल्ह्यात असल्यामुळे त्याची चौकशी करण्यात यावी अशी मी मागणी करीत आहे. याकडे शासनाचे दुर्लक्ष झ ाल्यामुळे शासनाने ताबडतोब कारवाई करावी याकरिता मी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला आहे.

.......

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

मुंबई शहरातील फेरीवाल्यांची संख्या वाढत असल्याने पुनर्वसन धोरणाच्या अंमलबजावणीकरता नियमानुसार फेरीवाल्यांच्या पुनर्वसनाचा अभ्यास करण्यासाठी टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्स (टीआयएसएस) आणि रचना संसद या दोन संस्थांची नियुक्ती केली आहे. राष्ट्रीय फेरीवाला धोरणानुसार फेरीवाल्यांच्या व्यवसायाचा प्रकार, त्यांचे ठिकाण, वेळ याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. या समितीची नियुक्ती केल्यानंतर या समितीने आपला अहवाल माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे सादर केला आहे. असे असताना फेरीवाल्यांच्या धोरणासंबंधी कोणताही निर्णय

झालेला नाही. त्यामुळे मुंबईतील नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला आहे. यासंबंधी शासनाने तातडीने कारवाई करणे आवश्यक असल्याने मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

.......

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

वसई, जिल्हा ठाणे येथील सर्व्हे क्रमांक 114 ए व बी हे भूखंड श्री.शंकर मिश्रा व श्री.दिनेश मिश्रा यांनी विकत घेतले असून या भूखंडाच्या शेजारच्या सर्व्हे क्र.152 ही सुमारे 423 एकर जागा मिठागरची असून सदरची जागा शासनाच्या मालकीची असणे, सदर बिल्डरांनी आपल्या भूखंडाचे मोजमाप करताना सरकारी अधिकाऱ्यांशी संगनमत करून क्षेत्रफळ चार हजार चौरस मीटर वाढवून घेण्यात येऊन सदरचा मिठागराचा भूखंड सर्व्हे क्रमांक 114 ए व बी मध्ये दाखविण्यात येणे, या जमिनीची किंमत 50 कोटी असून मिठागराच्या जमिनीवर कोणतेही विकासकाम होत नसतानाही या बिल्डरांनी कोट्यवधी रूपयांचे बांधलेले बंगले, याबाबत वसईच्या तहसीलदारांनी माणिकपूर पोलीस ठाण्यात सप्टेंबर 2011 मध्ये गुन्हा नोंदविण्यात येऊनही आज पर्यंत कोणतीच कारवाई करण्यात आली नाही. यामुळे शासनाचे कोट्यवधी रूपयांचे नुकसान झाले असून या जमिनीवर बंगले बांधून या बिल्डरांनी कोट्यवधी रूपये कमविले आहेत. तरी याबाबत शासनाने सविस्तर चौकशी करून संबंधित बिल्डरांवर व संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता असल्याने सदरचा मुद्दा मी औचित्याच्या मुद्याद्वारे उपस्थित करीत आहे.

........

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

ऑल इंडिया स्टुडंटस् फेडरेशन या विद्यार्थी संघटने तर्फे गेल्या अनेक महिन्यांपासून आयुर्वेदिक विद्यार्थ्यांच्या न्याय मागण्यासाठी आंदोलन सुरू केले आहे. दिनांक 10 जुलै 2013 रोजी हे विद्यार्थी आपल्या मागण्या घेऊन महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून आझाद मैदान येथे बेमुदत धरणे आंदोलनास बसले आहेत.

सन 2011-12 या शैक्षणिक वर्षासाठी 1019 विद्यार्थ्यांना गुणवत्ता यादी द्वारे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील 22 महाविद्यालयात प्रवेश दिला. परीक्षा फॉर्म भरला परंतु ऐन परीक्षांच्या तोंडावर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेले महाविद्यालय हे आयुष तसेच सी.सी.आय. या राष्ट्रीय पातळीवरील सरकारी समितीने परवानगी नाकारलेले महाविद्यालय असल्याचे कळविले. त्या संदर्भात माननीय उच्च न्यायालयात वाद सुरू होता. रिट याचिका क्रमांक 7593/2011 आणि इतर याचिका अंतर्गत दिनांक 10.10.2011 रोजीच्या उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याचे समजले.

ऐन परीक्षेच्या तोंडावर याचिका निकाली निघाली व फेटाळण्यात आली.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

परिणामी विद्यार्थ्यांनी वर्षभर घेतलेले परिश्रम, भरलेले डोनेशन, फी वाया जाऊन त्यांना परीक्षा हॉल तिकिट नाकारण्यात आले. संस्थाचालकांकडून विद्यार्थ्यांची खुलेआम आर्थिक, मानसिक लूट झ ाालेली आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य अंधारात आहे.

सभापती महोदय, एप्रिल 2013 मध्ये विद्यार्थी-पालक व ए.आय.एस.एफ., ए.आय.एस.ए. या विद्यार्थी संघटनेने आंदोलन केल्यानंतर माननीय मुख्यमंत्री महोदयांबरोबर चार वेळा भेटी होऊन, शिष्टमंडळाबरोबर सकारात्मक चर्चा करुन विद्यार्थ्यांना न्याय देऊन त्यांची परीक्षा घेण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन दिलेले होते. परंतु अद्यापपर्यंत यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झ ाालेली नाही.

सभापती महोदय, माननीय सर्वोच्च न्यायालयानेच राज्यातील 22 महाविद्यालयांना सन 2011-2012 साठी अवैध घोषित केल्याने सदर विद्यार्थ्यांना दुसऱ्या वैध महाविद्यालयात वर्ग करण्यात यावे असे निर्देश दिलेले आहेत. तेव्हा दिनांक 23 जुलै, 2013 रोजी होणाऱ्या परीक्षेस या विद्यार्थ्यांना बसू देण्यात यावे अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे आपणास करीत आहे.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, आज संपूर्ण राज्यामध्ये ऑटो रिक्षा चालक मालक कृती समितीने प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जागर आंदोलन केलेले आहे. महाराष्ट्रामध्ये जवळपास सहा ते सात लाख रिक्षाचालक आहेत. या रिक्षाचालकांच्या मागण्यां संदर्भात मी सभागृहात अनेक वेळा प्रश्न उपस्थित केले होते. त्यावेळी या संघटनेच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेण्याचे आश्वासन सरकारकडून देण्यात आले होते. परंतु आजपर्यंत अशी बैठक झालेली नाही. आज रिक्षाचालकांचे राज्यभर आंदोलन होत आहे. रिक्षाचालकांच्या प्रामुख्याने पुढील मागण्या आहेत प्राथमिक शाळेतील 10 विद्यार्थ्यांना एका रिक्षातून नेण्याची परवानगी द्यावी. लहान शहरांतून मीटरची सक्ती रद्द करावी. लोकसंख्येच्या प्रमाणात रिक्षा परवाने नसल्यास नवे परवाने द्यावेत. परवाना हस्तांतरणाची भरमसाठ फी कमी करावी. बेकायदा वाहतुकीवर कठोर कारवाई करावी. सीएनजीचा पुरवठा व मीटर दरवाढ करावी. या मागण्यांच्या संदर्भात शासनाने त्वरित दखल घ्यावी.

सभापती महोदय, रिक्षाचालकांनी आपल्या मागण्यांच्या संदर्भात 30 जुलै, 2013 रोजी प्रचंड मोर्चा काढण्याचे जाहीर केलेले आहे. माझी मागणी आहे की, दिनांक 30 जुलै पूर्वी परिवहन विभागाने रिक्षाचालक संघटनेच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेऊन त्यांना न्याय देण्याची भूमिका घ्यावी. आपण शासनाला निर्देश दिले तर 30 जुलै पूर्वी ही बैठक होऊ शकेल.

**उप सभापती** : शासनाने रिक्षाचालकांच्या मागण्यांच्या संदर्भात दिनांक 30 जुलै, 2013 पूर्वी शासन स्तरावर बैठक बोलावून हा प्रश्न निकालात काढावा.

ॲड.पद्माकर वळवी : सभापती महोदय, होय.

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, शिक्षण हक्क अधिनियम 2009 ची अधिसूचना जारी झाली. त्यानुसार आयसीएसई आणि सीबीएसई शाळांमध्ये 25 टक्के गरीब विद्यार्थ्यांना प्रवेश देणे बंधनकारक आहे. एक धक्कादायक बाब समोर आली आहे की, उप संचालक श्री.चव्हाण यांनी गरीब विद्यार्थ्यांसाठी आरक्षित असलेल्या जागा अन्य लोकांकडून पैसे घेऊन भरल्या असल्याचे वृत्त अनेक वर्तमानपत्रांतून प्रसिध्द झाले आहे. तेव्हा याबाबत शिक्षण विभागाकडून स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. गरीब विद्यार्थ्यांच्या 25 टक्के जागा लाटल्या असतील तर त्या जागा गरीब विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. या संदर्भात शिक्षण विभागाने स्पष्टीकरण करावे व गरीब विद्यार्थ्यांसाठी राखीव असलेल्या 25 टक्के जागा संरक्षित कराव्यात अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विधानमंडळ सचिवालयाने प्रकाशित केलेल्या "संसदीय विशेषाधिकार" या पुस्तकात "जसलोक रुग्णातील मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.मसंद यांच्या विरोधात दिलेल्या" विशेषाधिकार भंगाच्या प्रकरणाचा उल्लेख नसल्याबाबत पॉईन्ट ऑफ इर्न्फेशन**

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातर्फे "संसदीय विशेषाधिकार : एक दृष्टीक्षेप" नावाचे पुस्तक प्रकाशित केले आहे. विधानमंडळ सचिवालयाचे प्रधान सचिव डॉ.अनंत कळसे यांनी ते पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकामध्ये विशेषाधिकारासंबंधीची माहिती दिलेली आहे तसेच विशेषाधिकार भंगाच्या प्रकरणांची माहिती देखील दिली आहे.

सभापती महोदय, या सदनातील सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील आणि तत्कालीन सन्माननीय सदस्य श्री.मधु चव्हाण यांनी जसलोक रुग्णालयातील मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.मसंद यांच्या विरोधात विशेषाधिकारभंगाची सूचना दिली होती. त्या प्रकरणाचा उल्लेख या पुस्तकात दिसत नाही. ते प्रकरण का वगळण्यात आले ? ते प्रकरण कमी महत्वाचे वाटले काय हे माझ्या आकलना पलिकडील आहे. तेव्हा याबाबत खुलासा व्हावा असा माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : असे झाले असेल तर या पुस्तकाच्या आणखी ज्या प्रती छापण्यात येतील त्यामध्ये या प्रकरणाचा अंतर्भात करण्यास मी सांगतो. या प्रकरणाचा अंतर्भाव करेपर्यंत या पुस्तकाच्या पुढच्या प्रती छापू नयेत असा आदेश देतो.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

(पुढे सुरु.....)

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, मुंबई शहरातील धारावी पुनर्वसन प्रकल्पाच्या संदर्भात मी औचित्याचा मुद्दा मांडत आहे. या प्रकल्पामध्ये 55 हजार झोपडीधारकांना अपात्र ठरविण्यात आले आहे. या रहिवाशांच्या मागण्यांसाठी धारावीतील सर्व पक्षांनी एकत्र येऊन धारावी बचाव पुनर्वसन समिती स्थापन केली आहे. शिवसेना पक्षाचे माजी आमदार श्री.बाबूराव माने आणि अन्य संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी या विषयी वारंवार माननीय मुख्यमंत्र्यांच्या भेटी घेतल्या आहेत. शिवाय आंदोलन केले, मोर्चे काढले. प्रेम नगर, आझाद नगर, डी वॉर्ड, टाटा पॉवर या झोपड्यांमध्ये राहणाऱ्या रहिवाशांचे धारावीतच पुनर्वसन करावे, प्रत्येक घर मालकाला 10 लाख रुपये कॉर्पस फंड द्यावा, माटुंगा लेबर कॅम्प येथील रहिवाशांना 650 चौ.फू. ची घरे द्यावीत, छोट्या दुकानदारांचे आणि व्यापाऱ्यांच्या गाळ्याचे पुनर्वसन रस्त्याच्या कडेलाच करावे इत्यादी त्यांच्या मागण्या आहेत. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे हा प्रकल्प अनेक वर्षांपासून रखडला आहे.

महोदय, पुनर्वसन प्रकल्पाच्या बाबतीत धारावीतील जनतेच्या सूचना व हरकती मागवून सुध्दा या प्रकल्पाची नेमकी सद्य:स्थिती काय आहे हे त्यांना कळत नाही. दिवसेंदिवस मुंबईमध्ये जागेचे भाव वाढतच आहेत. त्यामुळे सर्वसामान्य माणूस त्यात भरडला जात आहे. धारावीकरांच्या रास्त मागण्यांच्या अनुषंगाने मी मागणी करते की, या अधिवेशनात सरकारने या विषयी बैठक घेऊन धारावीकरांच्या मागण्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने सकारात्मक पाऊले उचलावीत.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, पावसाळ्याच्या चार महिन्यांकडे हमखास नैसर्गिक आपत्तीचा ऋतू म्हणून पाहिले जाते. पूर, इमारतीची पडझड, कोसळणाऱ्या विजा या सर्व संकटांच्या वेळी सर्व मदतकार्याचे नियंत्रण आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून केले जाते. राज्य, विभाग, जिल्हा आणि तालुका स्तरावर आपत्ती व्यवस्थापन विभाग कार्यरत ठेवण्याबाबत शासनाच्या सूचना आहेत. या विभागासाठी शासनाने निधी सुध्दा उपलब्ध करुन दिलेला आहे. मात्र ऐन संकटाच्या काळात राज्यातील 35 जिल्ह्यांतील कंत्राटी स्वरुपात कार्यरत असणाऱ्या आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांचा कार्यकाळ संपुष्टात आला आहे. विशेष म्हणजे उत्तराखंड येथील नैसर्गिक आपत्तीच्या काळातच या अधिकाऱ्यांच्या नियुक्तीची मुदत संपल्याने उत्तराखंड येथील नैसर्गिक आपत्तीला हवालदिल नागरिक तोंड देत असतानाच हे अधिकारी कार्यमुक्त झाले. राज्यातील या आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांच्या नेमणुकांबाबत तत्काळ कार्यवाही करुन शासनाने नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाला अडचणीतून बाहेर काढावे, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

----------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MMP/ D/ KTG पूर्वी श्री.अजित.... 12:55

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार यांनी "विना अनुदानित संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीयांच्या शिक्षण शुल्काच्या प्रतिपूर्ती योजनेची अंमलबजावणी न केल्याने विद्यार्थी, पालक, संस्था चालकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, नितीन गडकरी, भगवान साळुंखे, रामनाथ मोते, डॉ.रणजित पाटील यांनी "नागपूर येथील शिशु विकास माध्यमिक शाळा, महाल या शाळेतील गैरप्रकाराबाबत प्रशासक नेमण्याचा प्रस्ताव शिक्षण संचालकांनी प्रलंबित ठेवून शाळेची मान्यता रद्द करण्याचा दिलेला आदेश" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "महाराष्ट्र राज्य जात प्रमाणपत्र पडताळणी विनियमन अधिनियम, 2000 ची अंमलबजावणी पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात आल्याने महाराष्ट्रातील शासकीय आणि निमशासकीय सेवेतील 1 लाखाहून अधिक कर्मचारी, शिक्षक आणि अधिकारी यांच्या नोकऱ्या संपुष्टात येण्याची शक्यता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "धुळे-नंदुरबार रस्त्यावर दोंडाईचा येथे एका अवैध वाहतूक ट्रकने दिलीप सैंदाणे या पोलिसाचा अपघात करुन बळी घेणे, राज्यातील वाळू माफियांविरुध्द ठोस कारवाई करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती....**

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया, डॉ.रणजित पाटील यांनी "अकोला जिल्ह्यातील पूर्णा बॅरेज-2 (नेरधामणा) प्रकल्प संथ गतीने सुरु असल्याचे निदर्शनास येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी "गाडगीळ समितीच्या अहवालानुसार कोकणातील गौण खनिज व्यवसायावर बंदी आल्याने अनेकांचे संसार उघड्यावर पडल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार, सर्वश्री विनोद तावडे, विजय गिरकर, चंद्रकांत पाटील यांनी "मौजे मालाड (ता.बोरीवली) येथील न.भू.क्र.698 बी व 680 या अतिरिक्त जमिनीवर दुर्बल घटक घरबांधणी योजनेला सन 1988 मध्ये श्री.पवनकुमार जैन (विवेक बिल्डर्स) यांना मंजुरी दिली असून त्यातील शासनासाठी राखीव सदनिकांचा विकासकांनी स्वत:साठी केलेला वापर" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे, ॲड.आशिष शेलार, डॉ.रणजित पाटील, श्री.चंद्रकांत पाटील यांनी "राज्यभरातील 60 हजार होमिओपॅथिक डॉक्टरांनी दिनांक 15 जुलै, 2013 पासून मागण्यांच्या पूर्ततेसाठी आझाद मैदानावर सुरु केलेले बेमुदत उपोषण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.नागो पुंडलिक गाणार यांनी "क्रीडा विभागांतर्गत राज्यात 11 ठिकाणी कार्यरत असलेल्या क्रीडा प्रबोधिनीमध्ये शालेय स्तरावरील खेळाडूंची 'बॅटरी ऑफ टेस्ट' या चाचणी प्रकारातून करण्यात येत असलेली निवड, मात्र आयुक्त, क्रीडा यांनी जाणीवपूर्वक या विद्यार्थ्यांना अत्यंत गैरसोयीच्या ठिकाणी (उदा.साताऱ्यातील विद्यार्थी अमरावती व औरंगाबाद येथे तर कोल्हापूर, सांगली येथील विद्यार्थी गडचिरोली येथे) पाठविण्याचे आदेश देणे" या विषयावर

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SJB/ MMP/ D/ KTG पूर्वी श्री.अजित.... 12:55

**उप सभापती**....

नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

--------

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नॅशनल एन्ट्रन्स कम एलिजिबिलिटी टेस्ट (नीट) या प्रवेश परीक्षेत महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचा पात्रतेचा क्रम घसरणे

**मु. शी.** : नॅशनल एन्ट्रन्स कम एलिजिबिलिटी टेस्ट (नीट) या प्रवेश परीक्षेत महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचा पात्रतेचा क्रम घसरणे यासंबंधी डॉ. दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्रात वैद्यकीय प्रवेशासाठी "नॅशनल एन्ट्रन्स कम एलिजिबिलीटी टेस्ट" (नीट) या प्रवेश परीक्षेत महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचा पात्रतेचा क्रम यावर्षी घसरणे, त्यामुळे केवळ 33,964 विद्यार्थी एम.बी.बी.एस. साठी पात्र होणे, पर्यायाने पुढील काळातील वैद्यकीय शिक्षण घेतलेले व राज्यासाठी वैद्यकीय सेवा देणारे डॉक्टर्सची संख्या कमी होणे, इतर राज्यातून विद्यार्थी महाराष्ट्रातील शासकीय वैद्यकीय कॉलेज व रुग्णालयात शिक्षणासाठी येणे, त्यामुळे वैद्यकीय सेवेतील राज्यासाठी असलेला आपलेपणा कमी होणे, हा महत्वाचा मुद्दा शासनाकडून दुर्लक्षित होणे, कर्नाटक, तामिळनाडू राज्यांनी या विरोधात न्यायालयात धाव घेऊन स्टे घेणे, परंतु महाराष्ट्रात या "नीट" परीक्षेला वैद्यकीय शिक्षण मंत्री व वैद्यकीय शिक्षण संचालनालय यांच्याकडून वेळीच "नीट" विरोधी याचिका न्यायालयात दाखल न करणे, पर्यायाने राज्यातील वैद्यकीय शिक्षण पध्दत धोक्यात येणे, त्यामुळे पालक व विद्यार्थ्यांमध्ये पसरलेली नाराजी, या संदर्भात शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

डॉ. विजयकुमार गावित ( वैद्यकीय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना एमबीबीएस आणि एमडी प्रवेशासाठी जी नॅशनल एन्ट्रन्स कम एलिजिबिलिटी टेस्ट (नीट) घेतली जाते त्यासंबंधी आहे. ही लक्षवेधी सूचना सुस्पष्ट आहे परंतु या ठिकाणी शासनाने दिलेल्या निवेदनामध्ये अनेक मुद्यांची उत्तरे सापडत नाहीत. नीट सुरु झाल्यानंतर दक्षिणेकडील काही राज्यांनी कोर्टामध्ये धाव घेतली आणि कोर्टात जाऊन आपल्याकडे नीट नको म्हणून त्यांनी स्टे घेतला. आपल्या महाराष्ट्र शासनाने तशा प्रकारची कोणतीही हालचाल केलेली नाही हे अनाकलनीय आहे. ही हालचाल का केली नाही ? आपल्या आकडेवारीप्रमाणे एमएचटी-सीईटी परीक्षेला 2010 मध्ये 1 लाख 76 हजार, 2011 मध्ये 1 लाख 92 हजार, 2012 मध्ये 2 लाख 15 हजार इतके विद्यार्थी बसत होते परंतु यावेळी मात्र नीट परीक्षेमध्ये फक्त 96 हजार 546 विद्यार्थी बसले. या आकडेवारीमध्ये ही घसरण का झाली ? यामध्ये केवळ एकतृतीयांश उमेदवार पात्र झाले. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, पात्र विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढलेले आहे. तरी देखील केवळ एकतृतीयांश विद्यार्थीच पात्र का झाले ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, केंद्र शासनाने विचारपूर्वक हा निर्णय घेतला. वेगवेगळ्या एन्ट्रन्स परीक्षा वेगवेगळ्या स्तरावर होतात आणि विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या परीक्षांना सामोरे जावे लागते, त्यांचा वेळ जातो. या सर्व गोष्टींचा विचार करुन केंद्र शासनाने संपूर्ण देशामध्ये एकच नीट परीक्षा घेण्याचे ठरविले. हे ठरविल्यानंतर त्यांनी 2011-2012 मध्ये ही परीक्षा घेण्याचे ठरविले होते त्यावेळी आपण केंद्र शासनाला सांगितले की, या नीट परीक्षेला आम्ही तयार आहोत परंतु अकरावी, बारावीला सीबीएसईचे जे सिलॅबस आहे त्यानुसार आपण ही परीक्षा घेणार असल्यामुळे जोपर्यंत अकरावी पासून सीबीएसईचे सिलॅबस सुरु होत नाही तोपर्यंत नीट परीक्षा घेऊ नये. तशा पध्दतीचे पत्र मी स्वत: केंद्रीय मंत्र्यांना लिहिले होते. त्याचबरोबर सिलॅबस सारखे होईपर्यंत परीक्षा घेऊ नये यासाठी आम्ही सुप्रीम कोर्टात सुध्दा गेलो होतो. अकरावी, बारावीला सीबीएसईचे सिलॅबस सुरु झाल्यानंतर आपण 2013-2014 ला या नीट परीक्षेला जाण्याबाबत आम्ही स्वत:हून मान्यता दिलेली आहे. 2013-2014 पासून नीटची परीक्षा सुरु झाली आणि त्यानंतर त्या ठिकाणी प्रवेश देण्यास सुरुवात झाली.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित .....

सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सांगितले की, यावेळी सुमारे 96 हजार विद्यार्थी परीक्षेला बसले. त्यातील 33 हजार विद्यार्थीच पास झाले. अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या 1 लाखाच्या वर होती. सुमारे 1 लाख 10 हजार पात्र होते आणि परीक्षेला 96 हजार विद्यार्थी बसले. त्यापैकी 35 टक्के विद्यार्थी पास झालेले आहेत. जर आपण आपल्या एमएचटी-सीईटीची आकडेवारी पाहिली तर त्या परीक्षेला 2010 मध्ये 1 लाख 76 हजार विद्यार्थी बसले होते आणि त्यापैकी 26 हजार विद्यार्थी पास झाले होते. 2011 मध्ये 1 लाख 92 हजार विद्यार्थी परीक्षेला बसले. त्यापैकी 23 हजार विद्यार्थी पास झाले होते आणि 2012 मध्ये 2 लाख 15 हजार विद्यार्थी परीक्षेला बसले. त्यापैकी 28 हजार विद्यार्थी पास झाले होते. त्यामुळे यामध्ये घसरण झाली असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे ते बरोबर नाही. यामध्ये घसरण झालेली नाही. उलट ही संख्या वाढलेली आहे. जे मेरीट आहे त्यामध्ये फार तफावत नाही. त्यामध्ये फक्त 4-5 गुणांची तफावत आहे. त्यामुळे आपल्या विद्यार्थ्यांचे नुकसान झाले असे आपल्याला म्हणता येणार नाही. या ठिकाणी आपण विद्यार्थ्यांना जे प्रवेश देणार आहोत त्यापैकी 15 टक्के पूर्वी आपण केंद्राला देत होतो आणि ते 15 टक्के जाणारच आहेत. पूर्वी ते नीटची परीक्षा घेत होते त्या परीक्षेमध्ये ज्यांना जायचे होते ते जातच होते. आता सीबीएसईप्रमाणे सिलॅबस झाल्यामुळे आपले जास्त विद्यार्थी जाऊ शकतात. आपल्या विद्यार्थ्यांना तिकडे स्कोप आहे. उर्वरित जे 85 टक्के प्रवेश आहेत ते रेग्युलर जसे भरतो तसेच भरत आहोत. त्यामुळे मला असे वाटते की, नीट परीक्षा सुरु झाली हे चांगले झाले. विद्यार्थ्यांना पुन्हा पुन्हा वेगवेगळ्या परीक्षांना सामोरे जावे लागत नाही. एक परीक्षा देऊन त्यामध्ये उत्तीर्ण व्हावयाचे आहे. त्यामुळे नीट परीक्षा योग्य आहे असे मला वाटते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित.....

सन्माननीय सदस्यांनी तामिळनाडू व कर्नाटक राज्यांचा उल्लेख केलेला आहे. त्या राज्यांच्या उच्च न्यायालयामध्ये ते गेले होते. तामिळनाडू राज्याबाबत मी सांगतो की, तेथे सीईटी घेतली जात नाही. बारावीच्या गुणांच्या आधारे ते प्रवेश देतात. त्यामुळे त्यांनी हायकोर्टात असे सांगितले आहे की, आम्ही बारावीच्या गुणांच्या आधारे विद्यार्थी घेतो. त्यामुळे तामिळनाडू येथील उच्च न्यायालयाने नीटच्या परीक्षेला स्थगिती दिलेली आहे. कर्नाटक राज्याने सुध्दा ही परीक्षा शासनाकडून घेतली जाईल. त्यामुळे कर्नाटक उच्च न्यायालयानेही या परीक्षेला स्थगिती दिलेली आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, कधीही तरी जगाच्या स्पर्धेला तोंड द्यावे लागेल, त्यामुळे मी ही गोष्ट मान्य करतो. संपूर्ण देशात एक युनिफॉर्म सिस्टिम येण्यासाठी ही परीक्षा आवश्यक आहे असे मला वाटते. या परीक्षेचे आव्हान कधी ना कधी तरी लोकांनी स्वीकारले पाहिजे. त्याबद्दल वाद नाही. परंतु राज्यामध्ये नीटची परीक्षा घेतली त्यावेळी सर्व जिल्ह्यात इन्फ्रास्ट्रक्चर नसल्याचे दिसून आले आहे. मेटॅमार्फासीज असेल, त्यातील ते ट्रान्झिशन असेल पण ते आव्हान स्वीकारताना बऱ्याच जिल्ह्यांचे हाल झालेले आहे. सांगली, सोलापूर, रायगड व इत्यादी जिल्ह्यांमध्ये या परीक्षांची केंद्रेच नव्हती. त्यामुळे पुढील काळामध्ये याबाबत काम करीत असताना आपले होम वर्क चांगले केले पाहिजे. हे वर्ष म्हणजे मुलांचा करिअर पॉईन्ट असतो. आपले होम वर्क बरोबर नसेल तर तेथे धांदल होते. पुढील वर्षी सर्व जिल्ह्यातील इन्फ्रास्ट्रक्चर तपासून सर्व जिल्ह्यांमध्ये परीक्षा केंद्र चालू करणार काय ?

डॉ.विजयकुमार गावित : माझ्याकडे सांगली, सातारा जिल्ह्याची आकडेवारी नाही. परंतु काही ठिकाणी निश्चितपणे गैरसोय झाली होती हे मी मान्य करतो. ही गैरसोय पुढील काळात होणार नाही, ज्या त्रुटी आहेत त्या राहू नयेत असे त्या केंद्रांना कळविण्यात येईल, जेणे करुन पुढील काळामध्ये विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या परीक्षेला 96 हजार विद्यार्थी बसले होते असे सांगितले आहे. ही वस्तुस्थिती नाही. या संख्येमध्ये खाजगी संस्थांमधून परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही समाविष्ट आहे. शासनाने असा नियम सुरु केला आहे की, खाजगी संस्थांमधून दुसऱ्या फेरीद्वारे सीट भरल्या नाही तर त्या सीट शासन आपल्याकडील घेईल.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

यामध्ये पारदर्शकता पाहिजे म्हणून शासनाने ते केले आहे. गेल्या वर्षी खाजगी संस्थांनी गुणवत्ता डावलून 240 विद्यार्थ्यांना प्रवेश दिले होते. त्यांचा निर्णय अद्याप लागलेला नाही. त्यांचे काय झाले आहे असा प्रश्न आहे. गुजरात पॅटर्नप्रमाणे महाराष्ट्र मेडिकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च सोसायटी स्थापन करण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे आपले विद्यार्थी आपल्याकडेच राहावेत असा त्याच्या पाठीमागचा दृष्टीकोन आहे. त्यामुळे गुजरात पॅटर्नप्रमाणे महाराष्ट्र मेडिकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च सोसायटी स्थापन केली जाणार आहे का ?

डॉ.विजयकुमार गावित : 240 मुलांचा प्रश्न कोर्टात प्रलंबित आहे. कोर्टाचा अंतिम निर्णय होईपर्यंत त्यांना त्या ठिकाणी प्रवेश देण्यात यावा असे सांगितलेले आहे. राज्याच्या हिताच्या दृष्टीने एक ट्रस्ट स्थापन करण्याचा शासन विचार करीत आहे. हा ट्रस्ट स्थापन करीत असताना नवीन कॉलेजपुरता करावयाचा की, राज्यातील सर्व कॉलेजचा त्यात समावेश करावयाचा ही बाब कायदेशीरदृष्ट्या तपासून पाहत आहोत. सर्वच कॉलेजना त्यात घेता आले तर ते चांगले होऊ शकेल. याबाबतची प्रक्रिया चालू असून ती तपासून पाहू. अन्यथा सर्वच कॉलेज त्यामध्ये समाविष्ट करु. त्यामुळे 15 टक्के जागा द्याव्या लागतात त्या द्याव्या लागणार नाहीत आणि आपली परीक्षा त्या ट्रस्टच्या माध्यमातून घेता येईल. यादृष्टीने शासन प्रयत्न करीत आहे. दुसऱ्या फेरीबाबत सांगेन की, ज्यांनी नीटची परीक्षा दिलेली असेल त्यातून त्या जागा भरल्या जाणार आहेत.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

**पृ. शी.** : खारभूमी बांधाच्या बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या गाळासाठी पेंढ मातीची स्वामित्व धनातून सूट मिळण्याबाबत स्थानिकांची होत असलेली मागणी

**मु. शी.** : खारभूमी बांधाच्या बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या गाळासाठी पेंढ मातीची स्वामित्व धनातून सूट मिळण्याबाबत स्थानिकांची होत असलेली मागणी यासंबंधी श्री.जयंत प्र.पाटील,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयंत प्र.पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय खार जमीन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"रायगड जिल्हयातील खारेपाट विभागामध्ये खारभूमी बांधाचे बांधकाम करताना त्यामधील (Hearting) गाभा भरण्यासाठी वापरण्यात येणारी पेंढ माती ही खाडीलगतच्या साठलेल्या गाळामधून काढण्यात येणे, खारभूमी बंधारे हे खाडी लगतच्या काठावर असल्यामुळे भरती ओहटीच्या वेळेस बांधाची धूप होऊन ही पेंढ माती गाळ स्वरुपात बांधा जवळ साचून राहणे, बांधाची डागडुजी करताना हा खाडी लगतच्या गाळ गाभ्यामध्ये (Hearting) वापरला जाणे, सदरच्या (Hearting) गाभामध्ये वापरण्यात येणाऱ्या गाळासाठी पेंढ मातीची स्वामीत्व धनातून सूट मिळण्याबाबत स्थानिकांची अनेक वर्षे होत असलेली आग्रही मागणी, कार्यकारी अभियंता खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, पेण जि.रायगड यांनी दिनांक २९ जून, २०१३ रोजीच्या पत्राद्वारे जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांना गाळासाठी पेंढा मातीस स्वामीत्व धनातून सूट मिळण्याबाबत विनंती करणे, याबाबत शासनाने तातडीने केलेली कार्यवाही व करावयाची उपाययोजना."

श्री.उदय सामंत ( खार जमीन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, कोकणामध्ये खार जमिनीची दुरुस्ती तातडीने करावी लागते. हे करीत असताना त्याचे स्वामित्व भरले नाही तर त्या ठिकाणी काम करु दिले जात नाही.

यानंतर श्री.शिगम....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

हे स्वामित्व अगदी नगण्य आहे. हे स्वामित्व माफ करावे जेणेकरुन खारेपाट भागामध्ये तातडीने बांधबंदिस्तीची कामे करता येतील. पूर्वी स्वामित्व भरण्याच्या बाबतीत सवलत देण्यात येत होती ती सवलत शासन पुन्हा देईल काय ?

श्री. उदय सामंत : कोकणामध्ये खारभूमी बंधारे हे अतिशय दुर्गम भागामध्ये आहेत ही वस्तुस्थिती आहे. 2001 पर्यन्त शासकीय कामासाठी रॉयल्टी घेतली जात नव्हती हे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. परंतु केन्द्र शासनाच्या नियमाप्रमाणे राज्य शासनाने काही निर्णय घेतलेले आहेत. त्यानुसार 2001 पासून सर्व शासकीय कामावर देखील रॉयल्टी भरण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. महसूल व वन खात्याचा देखील खारभूमीच्या बाबतीत निर्णय झालेला आहे. खारभूमी बंधारा बांधत असताना तीच माती वापरली जात असली तरी शासनाने जो जी.आर.काढलेला आहे त्याप्रमाणे स्वामित्व घेतले जाते. हा निर्णय खारभूमीच्या बाबतीत घेतला तर त्याचा परिणाम राज्यातील इतर विभागाच्या कामांच्या बाबतीत होईल. म्हणून आहे त्या परिस्थितीमध्ये ही कामे चालू ठेवून ती तातडीने पूर्ण होण्याच्या बाबतीत कारवाई केली जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : या ठिकाणी माननीय महसूल मंत्री उपस्थित आहेत. खारभूमीची कामे कोणी करीत नाही. माझी मंत्री महोदयांना कळकळीची विनंती आहे की, हा केवळ महाराष्ट्रातील 4 जिल्ह्यातीलच प्रश्न आहे. या कामामुळे शासनाने मोठे स्वामित्व बुडते अशातला भाग नाही. दुसरे असे की, कोकणातील चार जिल्ह्यातील विविध उपक्रमातून शासनाला मोठ्या प्रमाणावर महसूल मिळतो. विशेषत रायगड जिल्ह्यातून शासनाला जास्त महसूल मिळतो. ज्या शेतक-यांच्या जीवावर शासनाला महसूल मिळतो त्या शेतक-यांची जी राहिलेली जमीन आहे ती तरी व्यवस्थित राहाण्यासाठी शासन स्वामित्वामध्ये सवलत देईल काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सन्माननीय सदस्यांनी खारबंधा-यांच्या दुरुस्तीचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. हे खारबंधारे दुरुस्त करण्यासाठी जी माती उचलली जाते त्यावर रॉयल्टी भरावी लागते. नॉन प्लॅनच्या कार्यक्रमामध्ये दुरुस्तीचा कार्यक्रम असतो. लाटांमुळे किंवा पावसामुळे जी माती खाली ओघळून राहते त्या मातीची रॉयल्टी का घेतली जाते असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात....

आहे. राज्याच्या दृष्टीने हा प्रश्न मला थोडा वेगळया स्वरुपाचा वाटलेला आहे. यासंबंधीचा प्रस्ताव संबंधित विभागाकडून जिल्हाधिका-यामार्फत प्राप्त करुन घेण्यात येईल आणि सकारात्मक दृष्टीकोन ठेवून निर्णय घेण्यात येईल.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अवयवदान करण्यासाठी जनजागृती करण्याची आवश्यकता

**मु. शी.** : अवयवदान करण्यासाठी जनजागृती करण्याची आवश्यकता यासंबंधी श्री. मोहन जोशी,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मोहन जोशी (नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अवयवदानासाठी विभागीय प्रत्यारोपण समन्वय समिती (झेडटीसीसी) मोठ्या प्रमाणावर जनजागृती करीत असताना शासन मात्र आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत उदासीन असणे, दरवर्षी झेडटीसीसीच्या माध्यमातून महाविद्यालये आणि खाजगी कंपन्यांमध्ये अवयवदानासाठी सातत्याने होत असलेले प्रयत्न, परंतु अवयवदान करू इच्छिणाऱ्यांची पूर्वनोंदणी करण्यासाठी कोणतीही यंत्रणा उपलब्ध नसणे, झेडटीसीसीकडून माहे ऑगस्ट, २०१२ ते माहे जून, २०१३ पर्यंत मुंबई शहरात सुमारे ३,५०० डोनर कार्डचे वाटप करण्यात येऊनही सन २०१३ च्या सहामाहीत केवळ २२ किडनी आणि ११ लिव्हरचेच दान केल्याचे माहीत होणे, वाटप करण्यात आलेल्या कार्डच्या तुलनेमध्ये अवयवदानाची संख्या अतिशय अल्प असून अवयवदान करण्यासाठी जनजागृती करण्याची निर्माण झालेली आवश्यकता, अवयवदान करण्याची इच्छा असलेल्या व्यक्तींना माहिती उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कोणतीही 'हेल्पलाईन' अस्तित्वात नसणे, मोठ्या खाजगी हॉस्पिटल तसेच शासकीय रूग्णालयांमध्ये शासकीय पातळीवर 'समन्वयक' नेमण्याची निर्माण झालेली आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची भूमिका."

श्री. सुरेश शेट्टी ( सार्वजनिक आरोग्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी :राज्याच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. अवयवदाना संबंधी जनजागृती करण्याचे काम सरकारने सुरु केलेले आहे. या कामाला गती मिळण्यासाठी पावले उचलण्याची गरज आहे. एका व्यक्तीने अवयवदान केले तर 9 व्यक्तींना त्याचा लाभ मिळून त्यांना जीवनदान मिळू शकते. अवयवदान करणारी व्यक्ती ब्रेनडेड झाल्याचे घोषित करणे बंधनकारक केलेले आहे. मागील 9 महिन्यामध्ये अशा प्रकारे 103 मृत्यू घोषित करण्यात आले. याचा अर्थ आदेशाची अंमलबजावणी अधिक परिणामकारक करणे आवश्यक आहे. याबाबतीत शासन या पुढच्या काळामध्ये कोणती कारवाई करणार आहे ? आपण समन्वय समित्या नेमलेल्या आहेत. परंतु औरंगाबाद मधील समिती अस्तित्वात आहे की नाही असा प्रश्न निर्माण झालेला आहे. राज्यातील जी नोंदणीकृत हॉस्पिटल्स आहेत त्यामध्ये ब्रेनडेड घोषित करणे बंधनकारक करण्यात येणार आहे काय काय ?

नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही.

श्री.मोहन जोशी...

या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात अवयवदानासाठी इच्छूक व्यक्तींसाठी जे दूरध्वनी नंबर दिलेले आहेत, ते नंबर मुंबई शहराचे आहे. सर्व राज्यासाठी टोल फ्री नंबर अशी यंत्रणा राज्य शासन उभी करील काय ? विद्यार्थी आणि नागरिक हे वाहन चालविण्याचे लायसन्स काढण्यासाठी जातात, त्यात अवयवदान करण्याची इच्छा असलेल्या व्यक्तींच्या लायसन्सवर तशी नोंद करण्यात येईल अशा प्रकारची बातमी वृत्तपत्रात आली होती. या बाबतीत शासनाने कोणत्या प्रकारची योजना आखलेली आहे, त्याची माहिती लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने राज्यातील जनतेला उपलब्ध करुन दिली तर भविष्यात या चळवळीला अधिक उत्तेजन मिळेल. मानवी अवयव प्रत्यारोपणाच्या अनुषंगाने शासनाने मागील दोन वर्षात काही निर्णय घेतले आहेत काय, विशेषत: हॉस्पिटलचे रजिस्ट्रेशन करताना याचा काय परिणाम दिसून आला आहे ? कॉलेजमधील तरुण विद्यार्थी त्यांना या मोहिमेमध्ये कसे सहभागी करुन घेता येईल या बाबतीत लक्षवेधी सूचनेच्या उत्तराच्या अनुषंगाने माहिती दिली तर ही चळवळ राज्यात मोठ्या प्रमाणात लोकांपर्यंत पोहचेल. माणसाला जीवनदान देण्याचे काम अवयवदानाच्या माध्यमातून करता येईल.

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी मानवी अवयव प्रत्यारोपण संदर्भातील प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, 13 सप्टेंबर 2012 मध्ये नवीन चार जी.आर.काढलेले आहेत. त्यात सर्व रुग्णालयांसाठी ब्रेनस्टेम डेथ केसेस मॅडेंटरी केल्या आहेत. ज्या रुग्णालयात ओ.टी. आणि आय.सी.यू.युनीट असेल तर त्यांना "Non-organ Transplant Centers" म्हणून रजिस्ट्रेशन देण्याची परवानगी या जी.आर.व्दारे दिली आहे. ब्रेनस्टेम डेथमध्ये सर्टिफिकेशनसाठी सहा तास अगोदर इंडिपेंडट स्पेशालिस्ट, न्यूरोसर्जन, आणि डॉक्टर्स यांनी सर्टिफाय करावे अशा प्रकारचा नवीन जी.आर.काढलेला आहे. तसेच यासंदर्भात "Accountibility and Trasparency" बाबत देखील जी.आर.काढलेला आहे. असे चार जी. आर.शासनाने नव्याने काढलेले आहेत. 1995 ते 2012 हा 17 वर्षाचा रेशो बघितला तर किडनी, लिव्हर, लंग्ज अये टोटल 6738 लाईफ ट्रान्सप्लाट आपण केलेले आहेत. 1995 ते 2012 या कालावधीत कॅडेव्हर 470 झाले आहेत. फार कमी प्रमाणात कॅडेव्हर ट्रान्सप्लॅन्ट झाले होते. सप्टेंबर 2012 रोजी नव्याने चार जी.आर.काढल्यानंतर 9 महिन्यात 84 केसेस आपल्या राज्यात झाल्या.

..2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ MMP/

श्री.सुरेश शेट्टी...

सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी ऑथरायझेशन कमिटी संदर्भात प्रश्न विचारला. त्या बाबतीत सांगू इच्छितो की, मुंबई,पुणे आणि नागपूर येथे ही कमिटी कार्यान्वित आहे. शासनाने औरंगाबाद येथील सदर समिती संदर्भात जी.आर.काढलेला आहे. परंतु औरंगाबाद आणि नाशिक या ठिकाणी आपण ऑथरायझेशन कमिटी तीन महिन्यात कार्यान्वित करु. नाशिक येथे अशा प्रकारची कमिटी कार्यान्वित करण्यासंदर्भात नवीन जी.आर.काढावा लागेल पण औरंगाबादच्या बाबतीत मला अधिकाऱ्यांकडून माहिती दिली गेली की, या बाबतीत जी.आर.काढलेला आहे. याबाबतीत अवेअरनेस क्रिएट करण्यासाठी दोन-तीन कामे हाती घेतली आहेत. आम्ही एन.जी.ओ. सोबत घेऊन परिवहन मंत्र्यांबरोबर चर्चा केली आहे. मुंबई आणि पुणे आर.टी.ओ.कार्यालयात वाहन चालविण्याचे लायसन्स घेण्यासाठी लोक येतात. तेथे त्या व्यक्तींना कौन्सीलींग करुन अवयवदानाचा फॉर्म भरुन घेतो. त्यांना वाहन चालविण्याचे लायसन्स देताना त्या लायसन्सच्या पाठीमागे "I am Organ donor." असे एक छोटेसे स्टीकर लावतो अशी मोहिम हाती घेतली आहे. मुंबई आणि पुणे येथील आर.टी.ओ.कार्यालयाच्या माध्यमातून ही मोहिम हाती घेतलेली आहे. दुसरा महत्वाचा महत्वपूर्ण कार्यक्रम शासनाने हाती घेतलेला आहे. त्या बाबतीत सांगू इच्छितो की, कॉलेजचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात ब्लड डोनर करीत असतात.

श्री.दिवाकर रावते : आर.टी.ओ.कार्यालयाचा काय संबंध आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : वाहन चालविण्याचे लायसन्स घेण्यासाठी येतात. त्यात अवयवदान करु इच्छिणाऱ्या व्यक्तीच्या लायसन्सच्या पाठीमागे छोटेसे स्टिकर्स लावले जाते. त्या स्टीकरवर "I am Organ donor" असा मजकूर नमूद केलेला आहे. वाहन चालविताना अपघात झाला तर त्याच्या लायसन्सच्या पाठीमागे "I am Organ donor" असा मजूकर वाचल्या नंतर पोलीस त्या व्यक्तीस इमिजेटली रुग्णालयात घेऊन जातात. सदर मजकुरामुळे त्या व्यक्तीचे "organ harvest" करण्याचे काम सोपे होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. भोगले...

लक्षवेधी सूचना क्रमांक-4..... श्री.सुरेश शेट्टी.....

ऑर्गन डोनेट केले आहे याची लोकांना माहिती नसते. याच पध्दतीने कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी सुध्दा मोहीम राबविणार आहोत. राज्यात जास्तीत जास्त ब्लड डोनर हे कॉलेज विद्यार्थी आहेत. मी स्वत: सन्माननीय राज्यपालांना पत्र लिहिले होते. माननीय राज्यपाल हे सर्व विद्यापीठांचे चॅन्सलर आहेत. त्यांनी आम्हाला परवानगी दिली असल्यामुळे आम्ही सर्व विद्यापीठांना कळवित आहोत. राज्यातील प्रत्येक कॉलेजमध्ये ही मोहीम हाती धेणार आहोत. विद्यार्थ्यांच्या ओळखपत्रावर I am organ donor असा स्टीकर लावणार आहोत. यामुळे यासंबंधी अवेरनेस क्रिएट होईल. डॉक्टर्स डे समारंभामध्ये आम्ही भाषण करतो, लोकांना ऑर्गन डोनेट करण्याबद्दल आवाहन करतो. आता लोक आम्हाला विचारत आहेत की, लोकप्रतिनिधी म्हणून तुम्ही इतरांसाठी कार्यक्रम करता, परंतु निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचे काय? मी स्वत: निर्णय घेतला आहे. I am going to donate all my organs. आणि मी सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनाही विनंती करतो. ही मोहीम आपण विधानपरिषद आणि विधानसभेच्या सदस्यांसाठी सुध्दा राबविली पाहिजे. मागच्या काळात सन्माननीय श्री.अशोक चव्हाण हे मुख्यमंत्री होते आणि सन्माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ उप मुख्यमंत्री होते त्यावेळी आय डोनेशन कॅम्प आयोजित केला होता. त्या ठिकाणी सुध्दा चांगला प्रतिसाद मिळाला.

सभापती महोदय, मी आपली परवानगी मागतो. विधानभवनामध्ये एक दिवस निश्चित करावा. ऑर्गन डोनेट करणे हा स्वेच्छा निर्णय आहे. त्यासाठी सक्ती नाही. फॉर्म भरुन दिला तर आपल्या ओळखपत्रावर I am organ donor चा स्टीकर लावला जाईल. आपण वेळ ठरवून दिली तर पुढील आठवड्यात विधानभवनात मोहीम राबविण्यात येईल. हे अतिशय चांगले काम आहे. मला खात्री आहे, सर्व सन्माननीय आमदार ऑर्गन डोनेट करण्यासाठी पुढे येतील.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी टोल फ्री नंबरचा मुद्दा मांडला होता. आरोग्य विभागामध्ये 102, 104 व 106 क्रमांकाचे हेल्पलाईन नंबर आहेत. हे सर्व नंबर कम्बाईन करुन एकच टोल फ्री नंबर निश्चित करणार आहोत आणि त्यात हे पण इन्क्लूड करु.

..2..

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, आपल्या देशामध्ये अनेक लोक अवयव दान करायला तयार आहेत. देहदान करण्यास तयार आहेत. शासकीय आणि महापालिकेच्या रुग्णालयामध्ये मोठया प्रमाणात शस्त्रक्रियेची व्यवस्था उपलब्ध झाली पाहिजे. परवा माझ्याकडे एक केस आली होती. यकृताचे ऑपरेशन करावयाचे होते. मुलगा आपल्या बापाला यकृत दान करण्यास तयार होता, परंतु या शस्त्रक्रियेचा खर्च 35 लाख रुपये इतका न परवडणारा आहे. अवयव दान होऊ शकते परंतु शस्त्रक्रियेचा खर्च परवडणारा नाही. त्यामुळे शासकीय आणि महापालिका रुग्णालयात या सुविधा लवकरात लवकर आणि सुसज्ज करण्यासाठी काय प्रयत्न करणार आहात?

श्री.सुरेश शेट्टी : किडनी ट्रान्सप्लान्टची केस राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये सामावून घेऊ आणि इतर अवयव ट्रान्सप्लान्टबाबत विचार करुन योग्य ती कारवाई करणार आहोत.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : क्रीडा प्रशिक्षक घडविण्यासाठी राज्यात प्रशिक्षण केंद्र निर्माण करणे

**मु. शी.** : क्रीडा प्रशिक्षक घडविण्यासाठी राज्यात प्रशिक्षण केंद्र निर्माण करणे यासंबंधी सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय क्रीडा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात २० पारंपारिक खेळांसाठी किमान साडेसहाशे प्रशिक्षकांची गरज असताना जेमतेम १२५ क्रीडा प्रशिक्षकांवर खेळाडू घडविण्याची जबाबदारी देण्यात येणे, राज्यात गेल्या अनेक वर्षापासून प्रशिक्षकांचा प्रश्न भेडसावत असणे, राज्यात प्रशिक्षण केंद्र उपलब्ध नसल्याने पुरेसे प्रशिक्षक निर्माण होत नसणे, राज्याच्या नवीन क्रीडा धोरणात प्रशिक्षक तयार करण्यासाठी कोणतीही योजना नसणे, खेळाडूला प्रशिक्षक म्हणून स्वत:ला तयार करावयाचे असल्यास थेट पतियाळा येथील नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ स्पोर्टस किंवा बेंगळूर येथील स्पोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडियाकडे जावे लागत असणे, प्रशिक्षक झाल्यानंतरही नोकरीची हमी नसणे, त्यामुळे क्रीडा प्रशिक्षक घडविण्यासाठी राज्यात प्रशिक्षण केंद्र निर्माण करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.पद्माकर वळवी ( क्रीडा मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

नंतर 2डी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, आपण महाराष्ट्रातील खेळाकडे अधिक लक्ष देत असल्यामुळे दिवसेंदिवस राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर, वेगवेगळया स्पर्धामध्ये आपल्याला खूप चांगली पारितोषिके मिळू लागली आहेत ही वस्तुस्थिती आहे. परंतु महाराष्ट्राची मेडल मिळविण्याची आपली जी परंपरा आहे ती वाढविण्यासाठी आपल्याला मोठया प्रमाणात क्रीडा प्रशिक्षकांची आवश्यकता आहे. क्रीडा प्रशिक्षक महाराष्ट्रामध्ये तयार होत नाहीत त्यामुळे अन्य राज्यात क्रीडा प्रशिक्षण घ्यावे लागते. त्यामुळे या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून माझा पहिला प्रश्न असा आहे की, क्रीडा प्रशिक्षक तयार होण्यासाठी भारतीय क्रीडा प्राधिकरणाचा एनआयएस कोर्स देशात 5 ठिकाणी आहे तो आपल्या राज्यात का नाही ? या प्रश्नाच्या संदर्भात माननीय क्रीडा मंत्री म्हणतील की, "क्रीडा विद्यापीठ प्रस्तावित आहे". परंतु क्रीडा विद्यापीठ होईल तेव्हा होईल. क्रीडा प्रशिक्षकाचा जो एक वर्षाचा अभ्यासक्रम आहे तो महाराष्ट्रात त्वरित सुरु केला जाणार आहे काय ? उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, मानधनावरची 153 पदे निर्माण केलेली आहेत. त्यामध्ये 83 पदावर क्रीडा मार्गदर्शक आहेत." जर आपण 153 पदे मानधनाच्या निमित्ताने निर्माण केली आहे तर आपल्याकडे 83 क्रीडा प्रशिक्षक का ? क्रीडा विद्यापीठाच्या संदर्भात नेमकी काय स्थिती आहे ? क्रीडा विद्यापीठ कधी सुरु होणार आहे ?

श्री. पद्‌माकर वळवी : सभापती महोदय, खेळाचे सक्षमीकरण करण्यासाठी क्रीडा प्रशिक्षक हा फार महत्वाचा घटक आहे. क्रीडा मार्गदर्शकाची कायमस्वरुपी 123 पदे भरण्यात आलेली आहेत. क्रीडा प्रशिक्षकांची 83 पदे मानधनावर भरलेली आहेत. एनआयएसच्या धर्तीवर क्रीडा मार्गदर्शकाचा अभ्यासक्रम पटियाला येथे आहे. महाराष्ट्रात अशा प्रकारचे एकही केंद्र नाही. परंतु अशा प्रकारचे केंद्र सुरु करण्याचे शासनाने ठरवले आहे. मानधनावर आपण जे 83 कोच घेतलेले आहेत ते एनआयएस कोच घेतलेले असल्यामुळेच 70 पदे रिक्त राहिली आहेत. अशा प्रकारचा अभ्यासक्रम क्रीडा विद्यापीठामध्ये अपेक्षितच आहे. परंतु क्रीडा विद्यापीठ सुरु होण्याच्या अगोदर म्हाळुंगे बालेवाडी येथे एक वर्षाचा कार्यक्रम येत्या दोन महिन्यात सुरु करण्याचे ठरविण्यात आलेले आहे. क्रीडा विद्यापीठ सुरु करण्याचा निर्णय क्रीडा धोरणात आहे. परंतु इतर राज्यामध्ये क्रीडा विद्यापीठ कशा प्रकारे चालतात याचाही अभ्यास केला जाणार आहे. देशामध्ये क्रीडा विद्यापीठांची

...2...

श्री.पद्‌माकर वळवी....

संख्या फार कमी आहे. त्यामुळे यासंदर्भात सर्वंकष अभ्यास करुन लवकरच कार्यवाही सुरु केली जाईल. जमीन संपादनाचा विषय महत्वाचा असून त्यासाठी आपण ठाणे जिल्हयातील कळवा येथे जमीन संपादित केलेली आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, राज्याच्या क्रीडा धोरणाच्या निगडित आणि राज्यातील खेळाडूंच्या संदर्भातील ही लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आलेली आहे. आपल्याकडे 650 प्रशिक्षकांची गरज असतांना 123 प्रशिक्षकांची पदे भरण्यात आलेली आहे. 650 आणि 123 या पदांमध्ये फार मोठी दरी आहे. ही दरी टेंपररी पदाच्या माध्यमातून भरुन निघू शकणार नाही. महाराष्ट्राचा संपूर्ण देशात खेळामध्ये वरचा नंबर आहे. त्यामुळे प्रशिक्षकांच्या जागा तत्काळ भरण्यासाठी शासन काय करणार आहे ? देशामध्ये क्रीडा विद्यापीठांची संख्या कमी आहे ही वस्तुस्थिती आहे. खेळांच्या संदर्भात जे एक्सपर्ट आहेत त्यांची कमिटी बनवण्याची आवश्यकता आहे. आपल्याला केवळ विद्यापीठाकडे बघून चालणार नाही.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

विद्यापीठ म्हटले की,अभ्यासक्रम आला. अभ्यासक्रम म्हटला की, अनेक गोष्टी आल्या. या विद्यापीठाकडे इतर विद्यापीठांसारखे बघून चालणार नाही. एक ढाचा म्हणून आपल्याला हे स्वीकारता येईल. महाराष्ट्रामध्ये जे पारंपरिक खेळ आहेत ते इतर राज्यात खेळले जात असतील असे नाही. विद्यापीठाची निर्मिती करत असताना खेळांमध्ये प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूंची मिळून तज्ज्ञ समिती गठित करण्यात येणार आहे काय, या समितीमध्ये राजकीय लोक असण्यापेक्षा खेळाशी संबंधित असलेल्या लोकांना सामावून घेणार काय, असे माझे स्पेसिफिक प्रश्न आहेत.

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, क्रीडा मार्गदर्शक कायमस्वरूपी उपलब्ध करण्यासाठी क्रीडा धोरणामध्ये तरतूद करण्यात आली आहे. सर्वसाधारणपणे राज्यामध्ये तालुका स्तरावर 2, जिल्हा स्तरावर 2 आणि संचालक स्तरावर 11 क्रीडा मार्गदर्शक गृहीत धरले तर 816 क्रीडा मार्गदर्शकांची गरज आहे हे लक्षात येईल. 123 क्रीडा मार्गदर्शक हे कायमस्वरूपी आहेत. 83 क्रीडा मार्गदर्शक मानधनावर आहेत. त्यांना रूपये 25 हजार, 20 हजार, 15 हजार असे मानधन देण्यात येते. तालुका क्रीडा संकुलात रूपये 1500 वर 152 क्रीडा मार्गदर्शक काम करीत आहेत. जिल्हा व तालुका क्रीडा संकुल समितीने तात्पुरत्या स्वरूपात 152 क्रीडा मार्गदर्शक नियुक्त केले आहेत. आज राज्याला 816 क्रीडा मार्गदर्शकांची गरज आहे. ती गरज पूर्ण करण्यासाठी सर्व उपाययोजना केल्या जातील. पतियाळाच्या धर्तीवरील एनआयएस अभ्यासक्रम महाराष्ट्रात क्रीडा नगरी, बालेवाडी येथे सुरू करणार आहोत. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सूचना केली आहे की,क्रीडा विद्यापीठातील समितीमध्ये तज्ज्ञांची नियुक्ती करण्यात यावी. क्रीडा विद्यापीठ हा महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे खेळांशी संबंधित असलेल्या तज्ज्ञांची समिती लवकरच गठित केली जाईल व क्रीडा विद्यापीठ लवकरात लवकर सुरू करण्यात येईल.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, शासनाला 70 पदे मानधनावरदेखील भरता येत नाहीत. 153 पदांपैकी आपण 83 पदे भरली आहेत. सन 2005 पासून आपल्याला 4000 पदके मिळाली आहेत असे लेखी उत्तरात नमूद केले असून त्याची वर्गवारी देखील केली आहे. 8 वर्षात चार हजार पदे म्हणजे वर्षाला 500 पदे मिळाल्यामुळे मला आश्चर्य वाटले. मी नीट पाहिले तर ही सर्व पदे शालेय स्तरावर मिळालेली आहेत असे माझ्या लक्षात आले. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर....

एशियाड, ऑलिंपिक या स्पर्धांमध्ये आपल्याला पदके मिळावीत असे आपले स्वप्न आहे. त्यात आपल्याला पदके मिळाली आहेत काय याची वर्गवारी दिलेली नाही. शालेय स्तरावर मिळालेल्या पदकांचीच वर्गवारी आपण दिलेली आहे. शेवटी आपले स्वप्न शालेय स्तरावरील पदके मिळण्यापुरता मर्यादित राहणार आहे की, आंतरराष्ट्रीय पातळीवर पदके मिळण्यावर राहणार आहे याचा खुलासा झाला पाहिजे. क्रीडा विद्यापीठाचा आराखडा आपण तयार करणार आहात असे म्हटले आहे. तो कधी करणार आहात तसेच, आंतरराष्ट्रीय पातळीवरील क्रीडा स्पर्धांमध्ये पदके मिळविण्यासंबंधी महाराष्ट्राने काय प्रगती केली आहे याचा देखील खुलासा करण्यात यावा.

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मानधनाची 70 पदे रिक्त असल्यासंबंधीचा प्रश्न उपस्थित केला आहे. आपण एनआयएस झालेल्यांना कोच म्हणून भरती करण्याचे ठरविले होते. एनआयएसच्या धर्तीवर आपणाला 83 पदे भरता आली. जे एनआयएसधारक होते ते अन्य कुठल्या तरी संस्थांमध्ये कार्यरत आहेत. त्यामुळे ही पदे रिक्त आहेत. ही उणीव भरून काढण्यासाठी आपण अभ्यासक्रम सुरू करीत आहोत जेणे करून ही पदे आपल्याला भरता येतील. यात विभागाने असा पर्याय ठेवला आहे. प्रशिक्षिक एनआयएस धारक नसतील तर ज्या क्रीडा प्रशिक्षकाने आंतरराष्ट्रीय खेळाडू घडविले असतील अशा क्रीडा मार्गदर्शकांना भरती करण्याचा शासनाचा मनोदय आहे. तशी फाईल देखील आम्ही पुट-अप केली आहे. 4000 मेडल्स ही शालेय स्तरावर तसेच संघटनात्मक पातळीवर मिळालेली आहेत. ऑलिंपिक, एशियाड, राष्ट्रकूल क्रीडा स्पर्धांची तयारी आपण खेळाडूंकडून निश्चितपणे करून घेत आहोत. आपण क्रीडा प्रबोधिनी तयार केली आहे. त्याप्रमाणे अनिवासी क्रीडा प्रबोधिनी स्थापन करून म्हाळुंगे बालेवाडी क्रीडा संकुलाच्या माध्यमातून त्या खेळाडूंना प्रवेश दिला जाईल. म्हणजे तो खेळाडून राज्यात असो किंवा राज्या बाहेर असो तो प्रशिक्षण घेऊ शकेल. त्याचा संपूर्ण खर्च राज्य शासन करणार आहे, असा मनोदय मी व्यक्त करीत आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, सन 2004-2005 ते 2012-2013 या कालावधीत आपणास जवळपास चार हजार पदके मिळाली. शासनाने क्रीडा प्रशिक्षकाचे महत्व मान्य केलेले आहे. परंतु असे असताना क्रीडा प्रशिक्षकांना मिळणारे मानधन अत्यंत तुटपुंजे आहे. शासन या मानधनात वाढ करण्याचा धोरणात्मक निर्णय घेणार काय ? आमचे विद्यार्थी चार-चार हजार पदके मिळवित आहेत. अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना 25 गुण देण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतलेला आहे. क्रीडा अधिकाऱ्याकडून विद्यार्थ्यांना वेळेवर प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे आणि बोर्डाकडे वेळेवर माहिती न गेल्यामुळे जवळपास 400 विद्यार्थी 25 गुणांच्या लाभापासून वंचित राहिले आहेत. ज्या अधिकाऱ्यांनी किंवा क्रीडा अधिकाऱ्यांनी वेळेवर प्रमाणात्र पाठविले नाही त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात ? खेळाडुंची माहिती विलंबाने गेली असेल तर त्या विद्यार्थ्यांना 25 गुणांचा लाभ देण्यासाठी शासन काय प्रयत्न करणार आहे ?

ॲड.पद्माकर वळवी : सभापती महोदय, क्रीडाक्षेत्रामध्ये क्रीडा मार्गदर्शकाला महत्व आहे. तालुका स्तरावरील क्रीडा मार्गदर्शक अत्यल्प मानधनावर काम करीत आहेत तेव्हा त्यांच्या मानधनात वाढ करण्यात येईल. जे खेळाडू राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर चांगली कामगिरी करतात अशा दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना 25 गुण देण्याचे शासनाचे धोरण आहे. यापूर्वी उत्तीर्ण झालेल्या तसेच अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना 25 गुण देण्यात येत होते. परंतु आता आपण फक्त अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना हे गुण देतो. या वर्षी बोर्डाच्या परीक्षेला जे विद्यार्थी बसले होते त्या खेळाडुंचे प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांमार्फत बोर्डाकडे पाठविले आहेत. परंतु काही विद्यार्थ्यांना गुण मिळाले नसल्याचे मला समजले. राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर चांगली कामगिरी केलेले आणि शासन निर्णयानुसार पात्र ठरुनही विद्यार्थ्यांना गुण मिळाले नसतील तर संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

सभापती महोदय, हा जी.आर.शालेय शिक्षण विभागाचा आहे. तेव्हा शालेय शिक्षण मंत्री आणि बोर्डाचे अधिकारी यांच्या बरोबर चर्चा करुन त्या खेळाडूंना गुण देण्याचा निश्चितपणे प्रयत्न करण्यात येईल.

--------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यामध्ये गुटखा, पानमसाला व तत्सम पदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वितरण आणि विक्रीवर बंदी

**मु.शी.**: राज्यामध्ये गुटखा, पानमसाला व तत्सम पदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वितरण आणि विक्रीवर बंदी संबंधी माननीय अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे निवेदन

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील (अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे. )

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

**उप सभापती** : मी माननीय राज्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देतो की, गेल्या वर्षी राज्यात गुटखा बंदी जाहीर करुन सुध्दा ठाणे जिल्ह्यातील जोशी नावाच्या व्यापाऱ्याकडून गुटख्याची मोठ्या प्रमाणावर विक्री केली जाते. मला वाटते आपण या विषयी संबंधितांना सूचना देऊन त्या ठिकाणी छापा टाकावा व आवश्यक ती कारवाई करावी. वास्तविक पाहता शासनाने घालून दिलेले नियम व्यापारी पाळत नसतील तर त्यांच्यावर कठोर कारवाई केली पाहिजे.

तसेच दुसरी बाब अशी की, राज्य सरकारकडून दरवर्षी एका-एका वर्षाने गुटखा बंदीची मुदत वाढविली जाते. या निमित्ताने मी जाणून घेऊन इच्छितो की, गुटखा बंदी कायमस्वरुपी का केली जात नाही ? गुटख्याचे दुष्परिणाम माणसांच्या जीवनावर होत असतात. त्यामुळे एक वर्षासाठी गुटखा बंदी न करता कायमस्वरुपी करावी, असे मला वाटते.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : महोदय, मागच्या वर्षभराच्या काळात विभागाने 20 कोटी 73 लाख रुपयांचा बेकायदेशीर गुटखा जप्त केला. जवळजवळ 12 कोटी रुपयांचा गुटखा न्यायालयाची परवानगी घेऊन नष्ट केला. माननीय उप सभापती महोदय, आपण जे निदर्शनास आणून दिले आहे त्या अनुषंगाने संबंधित व्यापाऱ्यावर निश्चितपणे कारवाई करण्याबाबत ताबडतोब सूचना देण्यात येतील.

अन्न सुरक्षा व मानके हा कायदा केंद्र सरकारने केला आहे. केंद्र सरकारने केलेल्या कायद्यातील नियमांमध्ये एक वर्षाची मुदत घालून दिलेली आहे. गुटखा हा मानवी जीवनास हानीकारक असल्यामुळे त्याचे उत्पादन, विक्री व साठवणुकीवर कायमस्वरुपी बंदी घातली जाते. ही बंदी एक वर्षासाठी न घालता कायमस्वरुपी घालण्यासाठी केंद्र सरकारने भविष्यात नियमांमध्ये बदल करावेत, अशी राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्र सरकारला विनंती करण्यात येईल. यापूर्वी गुटखा बंदीवर घातलेली एक वर्षाची मुदत संपत होती, त्यामुळे ती मुदत पुन्हा एक वर्षाने वाढविण्यात आली आहे.

श्री.विनोद तावडे : महोदय, गुटखा बंदीबाबत शासनाची भूमिका स्वागतार्ह आहे. विभागाकडून टाकलेल्या छाप्यामध्ये मोठ्या प्रमाणावर गुटख्याचा साठा सापडत असतो. जो साठा सापडतो त्यावर कंपनीचा बॅच असतो. त्या बॅचवरुन गुटख्याचे उत्पादन कोणत्या कंपनीने केले हे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

समजते. परंतु त्या कंपनीवर कारवाई न करता, छोट्याछोट्या पान टपरी चालकांवर कारवाई केली जाते. विभागाने टाकलेल्या छाप्यामध्ये अमूक कंपनीचा बॅच आढळून आल्यास त्या कंपनीचा माल आपल्या राज्यात कसा आला याची शहानिशा केल्यावर त्या कंपनीवर केस टाकली तरच हे प्रकार बंद होतील. परंतु आपल्या विभागाच्या अधिकाऱ्यांचे अशा कंपनी चालकांशी व्यवस्थित सुरु असल्यामुळे त्या कंपन्यांवर कारवाई होत नाही. विभागाने टाकलेल्या छाप्यात सापडलेल्या मालावर कोणत्या कंपनीचा बॅच आहे, ते कोणाला डिस्पॅच झाले, ते कधी डिस्पॅच केले, तो माल आपल्या राज्यात कसा आला या प्रश्नांच्या मुळाशी जाऊन आपण कारवाई केली तरच हा सर्व प्रकार थांबू शकेल. आपल्याला खरोखरच गुटखा बंदी करावयाची असेल तर केवळ परिपत्रक काढून होणार नाही. विभागाने प्रामाणिकपणे काम केले तरच राज्यात खऱ्या अर्थाने गुटखा बंदी होऊ शकेल.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

दुसरी बाब अशी की, गुटख्याचा बराच व्यापार रेल्वेमधून होतो. रेल्वे पोलीस आपल्या अधिकाऱ्यांबरोबर सहकार्य करीत नाहीत. त्या ठिकाणी आपले अधिकारी हतबल होतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर गुटखा पुढे पास होतो. त्यामुळे रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर बसून जर आपण यामध्ये पुढाकार घेतला तर हे खरोखर थांबविता येईल. अन्यथा छुप्या पध्दतीने हे चालूच राहणार आहे.

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मांडलेला मुद्दा बरोबर आहे. काही प्रकरणे आमच्या समोर आली. परंतु ज्यावेळी या घटना घडल्या त्यावेळी कर्नाटक आणि गुजरात या दोन राज्यांमध्ये मधल्या काळात बंदी नव्हती. आपण निर्णय घेतल्यानंतर सहा महिन्यांनी परवा कर्नाटकमध्ये यावर बंदी घालण्यात आली. सीमेवर आम्हाला हा प्रश्न अडचणीचा ठरत होता आणि काही ठिकाणी या गोष्टी येत होत्या. परंतु आता चारही बाजूंनी आणि देशातील जवळजवळ 26 राज्यांनी यावर बंदी घातल्यामुळे आणि आता उत्पादनावरच बंदी असल्यामुळे ही अडचण येणार नाही. परंतु रेल्वेच्या बाबतीत निश्चितपणे या पध्दतीने देखील कार्यवाही करण्याचा भविष्य काळात आमचा प्रामाणिक प्रयत्न असेल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आपण पहिल्यांदा या सभागृहामध्ये गुटखा खाण्यावर बंदी घालावी. आम्ही या सभागृहामध्ये आणि सभागृहाच्या बाहेर जेव्हा फिरतो तेव्हा या ठिकाणी आम्हाला गुटखा खाणाऱ्या बऱ्याच व्यक्ती दिसतात. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण आपल्या खात्यापासून सुरुवात करावी.

**उप सभापती** : हे सभागृह आपल्या अखत्यारित येते. त्यामुळे असे जे कोणी असतील त्यांना या ठिकाणी आणून उभे करावे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, हे सभागृह आणि ही वास्तू आपल्या अधिकारात आहे. त्यामुळे त्याची अंमलबजावणी विधान भवनापासून झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

...2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. सन्माननीय सदस्य अर्धवट माहिती देत आहेत. ही सभागृहाची प्रॉपर्टी आहे त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी नावे सांगितली पाहिजेत. एक तर नावे सांगावीत किंवा त्यांचे म्हणणे मागे घ्यावे.

श्री. रामदास कदम :, सन्माननीय सदस्य नावे सांगत नसतील तर त्यांचे म्हणणे रेकॉर्डवरुन काढून टाकावे. सभापती महोदय, शासनाने एक चांगला विषय हाती घेऊन पुन्हा एक वर्ष गुटखा बंदी वाढविलेली आहे त्याबद्दल मी शासनाचे आभार मानतो. केंद्र शासनाची जी भूमिका आहे त्याची आपण अंमलबजावणी करीत आहात. या अगोदर मी तीन-चार वेळा हा विषय सभागृहामध्ये उपस्थित केलेला आहे. दाऊदला गुटखा बनविण्यासाठी दुबईमध्ये जी यंत्रणा महाराष्ट्रातून पाठविली जात होती त्या गुटखा किंग जोशीला मोक्का लावू नये म्हणून ज्या अधिकाऱ्याने ती यंत्रणा पकडली त्याच्यावर दबाव आणला होता ही गोष्ट खरी आहे का ? मंत्री महोदयांनी याबाबत चौकशी करावी. त्यांना कोणी सोडले, शहीद साळसकर यांची एके-47 कोणी काढून घेतली व का काढून घेतली ? गुटखा बनविण्यासाठी जी सर्व यंत्रणा दुबईला चालली होती ती साळसकर यांनी पकडली. त्यांना सांगितले की, जर तू जोशीला मोक्का लावला तर तुझी एके-47 काढून घेईन. असे ज्यांनी सांगितले त्या महिला अधिकारी कोण आहेत आणि त्यांच्यावर काय कारवाई केली ? म्हणजे आपण एका बाजूला दाऊदसाठी काम करता आणि दुसऱ्या बाजूला आम्ही गुटख्यावर बंदी घालत आहोत असा अविर्भाव दाखवित आहात.

शहीद साळसकर यांचा खून झाला, तुम्ही त्यांचा खून पाडला, त्यांची एके-47 तुम्ही काढून घेतली. त्यांची एके-47 काढून घेतली नसती तर साळसकर मेला नसता. त्याने समोरच्याला यमसदनी पाठविले असते. ही महिला पोलीस अधिकारी कोण आहे, तिच्यावर कोणी दबाव आणला, त्यांची एके-47 कोणी काढून घेतली या सर्व बाबींची चौकशी केली पाहिजे. ज्या महिला पोलीस अधिकाऱ्यानी त्यांची एके-47 काढून घेतली त्यांच्यावर शासन किती दिवसात कारवाई करणार ? नाही तर तुमची ही नुसती नौटंकी आहे, नाटक आहे, तुम्ही दाऊदलाच मदत करीत आहात, अशी माझी स्पष्ट भूमिका आहे. याबाबत शासनाची नेमकी काय भूमिका आहे ?

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, हा स्वतंत्र प्रश्न आहे परंतु या देशामध्ये गुटखा बंदी करण्यामध्ये महाराष्ट्राने पहिला पुढाकार घेतला होता.

**उप सभापती** : पहिल्यांदा त्या जोशीवर कारवाई करा.

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, यामध्ये ज्या ज्या कारवाया झालेल्या आहेत त्यामध्ये कंपन्यांवर देखील एफआयआर नोंदविले आहेत. अगदी मालकांवर देखील एफआयआर नोंदविण्याची भूमिका घेतलेली आहे.

श्री. रामदास कदम : या जोशींना मोक्का लावण्याची भूमिका साळसकर यांनी घेतली होती. त्यांच्यावर दबाव आणला.

**उप सभापती** : त्या जोशीला राजकीय संरक्षण आहे का ?

श्री. रामदास कदम : हे जोशी कोण आहेत ? जो दाऊदशी पार्टनरशीप करतो तो जोशी तुमचा कोण आहे ? तो शासनाचा जावई आहे का ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांकडे आलेल्या माहितीच्या ते आधारावर सभागृहात देत असलेली माहिती सत्य आहे असे आपण मानतो. ठाणे जिल्ह्यामध्येही प्रचंड प्रमाणामध्ये या जोशींच्या हस्ते गुटख्याचा व्यापार जोरात चालू आहे असे मी देखील या आसनावरुन सांगितलेले आहे. गुटख्याचा व्यापार अजूनही बंद झालेला नाही, तो चालूच आहे. त्या जोशींना पकडण्यात येईल, नंतर सोडण्यात येईल असे सातत्याने होत राहिले तर गुटख्याचा व्यापार चालूच राहील. हे होऊ नये. या बंदीमागील जो उदात्त हेतू आहे तो साध्य व्हावा म्हणून जेथे गुटखा उत्पादित होतो ते ठिकाणच नष्ट करावे असे मी सुचविलेले आहे.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, गुटखा उत्पादन करणारी कोणतीही फॅक्टरी आपल्या महाराष्ट्रात नाही. आपल्या सरकारने निर्णय घेतला आहे त्यापूर्वी गुजरात, कर्नाटक राज्य असेल त्या राज्यात गुटख्याचे उत्पादन करुन त्याची महाराष्ट्रात तस्करी केली जात होती. परंतु आता या सर्वच राज्यांनी गुटख्यावर बंदी घातल्यामुळे आता हा प्रश्न भविष्य काळात येऊ शकणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी मांडलेला प्रश्न वेगळ्या मार्गाने उपस्थित केला तर त्याचे मला सविस्तर उत्तर देता येईल.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, आपणच हे जोशी कोण आहेत त्याचा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे ही बाब निश्चितपणे गंभीर आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनीही त्या जोशीचा उल्लेख केलेला आहे. मी मंत्री महोदयांना आपल्यावतीने विनंती करतो. हा एवढा मोठा गुन्हेगार असेल आणि शासनाला आव्हान देऊन तो महाराष्ट्रात गुटखा आणत असेल तर त्या जोशी बुवाला पकडून त्याच्याविरुध्द मोक्का कायदा लावण्यात येईल काय ?

**उप सभापती** : मी या संदर्भात सांगितल्यानंतर मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

**पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी**

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, आताच टी.व्ही.वर एक बातमी प्रसिध्द झालेली आहे. आंबेजोगाई येथील सोनाली नावाच्या एका विद्यार्थीनीने अकरावीमध्ये प्रवेश मिळाला नसल्यामुळे आत्महत्या केली आहे. त्या मुलीची आई धुण्याभांड्याचे काम करुन उदरनिर्वाह करीत आहे. सोनालीला अकरावीत प्रवेश घ्यावयाचा असल्यामुळे ती आंबेजोगाईतील 3-4 महाविद्यालयात जाऊन आली होती. या सर्व महाविद्यालयांनी प्रवेश देण्यासाठी तिच्याकडे पैसे मागितले होते. पण तिच्याजवळ पैसे नसल्यामुळे ती हताश झाली, नाराज होऊन त्या मुलीने शेवटी आत्महत्या केली आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे. याबाबत चौकशी करुन संबंधितांविरुध्द कडक कारवाई करावी अशी मी शासनाला विनंती करीत आहे.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या विषयाबाबत सभागृहात निवेदन केले जाईल.

**उप सभापती** : यानंतर श्री.रामदास कदम यांनी विशेष उल्लेखाची सूचना मांडावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी उपस्थित केलेला मुद्दा महत्वाचा आहे.

**उप सभापती** : सन्माननीय गृह राज्यमंत्री श्री.पाटील यांनी सभागृहात निवेदन करण्यात येईल असे सांगितलेले आहे.

(अडथळा)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, खरे तर त्या मुलीला अकरावीत प्रवेश मिळाला नाही याची तुम्हाला लाज वाटली पाहिजे. उलट खाली बसून या विषयाबाबत कॉमेन्टस् करता का ? याबाबत काय घडले आहे त्याची चौकशी करुन मंत्री महोदयांनी एका तासात सभागृहात निवेदन केले पाहिजे. कारण सन्माननीय सदस्यांनी खूप महत्वाचा विषय उपस्थित केलेला आहे.

**उप सभापती** : मंत्री महोदयांनी उभे राहून मी या मुद्याबाबत निवेदन करतो असे सांगितलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशनद्वारे सभागृहाला माहिती दिली आहे ती माहिती पडताळून पाहिल्यानंतरच मंत्री महोदय सभागृहात निवेदन करतील. (अडथळा)

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना या विषयाचे गांभीर्य वाटत नाही असे मला वाटते. (अडथळा) एरवी महिलांवरील अन्याय व अत्याचाराबाबत समोरच्या बाजूचे सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. परंतु सत्ताधारी पक्ष अडचणीत आल्यावर बरेचजण बोलत नाहीत. याविषयीचे वास्तव आज संध्याकाळपर्यंत सभागृहासमोर आले आणि ही बातमी जर चुकीची असेल तर ती सगळीकडे पसरणार नाही. त्यातील वस्तुस्थिती समोर येईल. त्या काळजीपोटी आम्ही बोलत आहोत. आपण संवेदशनीलपणे हा विषय हाताळलेला आहे. शासनाने देखील तो तसाच घ्यावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

--------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : पाण्यासाठी समन्वय राखण्याकरिता कोकण वैधानिक विकास महामंडळ स्थापण्याची आवश्यकता याबाबत श्री.रामदास कदम,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"पाण्यासाठी समन्वय राखण्यासाठी राज्यपालांनी दिलेले आदेश तसेच चितळे समितीची शासनाने अनावश्यकपणे केलेली नियुक्ती, विशेषत: कोकणामध्ये यापूर्वी समित्या नेमून त्याचा अहवाल आला असताना व सतत कोकण वैधानिक विकास महामंडळाची मागणी होत असतानाही शासनाकडून सतत अन्याय होत असणे, महाराष्ट्रात 18 टक्के सिंचन असताना कोकणामध्ये केवळ 1.5 टक्के सिंचन होणे, कोकणामध्ये युती शासनाच्या वेळी 35 पाटबंधा-यांना शासनाने मंजुरी दिलेली असणे, मात्र मागील 15 वर्षात कामे पूर्ण झालेली नसणे व निधीचीही तरतूद केलेली नसणे, मात्र याबाबत नवीन नवीन समित्या नियुक्त करुन वेळकाढू धोरण आखले जात आहे. माझी माननीय मुख्यमंत्र्यांना कळकळीची विनंती आहे की, अनेक समित्यांचे अहवाल आलेले असताना पुन्हा पुन्हा समित्या नेमून वेळकाढूपण न करता वैधानिक विकास महामंडळाची मागणी तातडीने पूर्ण करावी."

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : राज्य व्यवस्थेमध्ये दरमहिन्याच्या पहिल्या सोमवारी पाळण्यात येणा-या लोकशाही दिनाचा संपर्क अधिक सक्षम करण्याची गरज याबाबत श्री. हेमंत टकले,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"जनसामान्यांना आपल्या अडचणी थेट मुख्यमंत्र्यांसमोर मांडण्यासाठी दरमहिन्याच्या पहिल्या सोमवारी 'लोकशाही दिन' पाळण्यात येतो. परंतु सध्या राज्याचे मुख्यमंत्री, मुख्य सचिव, पोलीस महानिरीक्षक यांच्यासह वरिष्ठ मंडळी उपस्थित राहून सुध्दा निराशाजनक प्रतिसाद जनतेकडून मिळू लागला आहे. मागच्या लोकशाही दिनी तर केवळ तीनच नागरिक उपस्थित होते. खरे पाहता हा जनतेसाठी फार महत्वाचा उपक्रम आहे. पण त्याच्या मांडणीमध्येच मुळात काही दोष असतील तर ते तातडीने दूर करणे आवश्यक आहे व लोकाभिमुख कल्याणकारी राज्य व्यवस्थेमध्ये हा संपर्क अधिक सक्षम करण्याची गरज आहे, यासंबंधी तातडीने फेरविचार करुन बदल करावा अशी माझी शासनाला विनंती आहे."

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : जात प्रमाणपत्र पडताळणीचे दि. 18 मे 2013चे परिपत्रक मागे न घेतल्यास रेल रोको आंदोलन करण्याचा दिलेला इशारा याबाबत श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यातील महादेव कोळी व तत्सम जमातीच्या समाजबांधवांवर गेल्या 25 ते 30 वर्षापासून सातत्याने अन्याय होत असणे, समाजावर होणा-या अन्यायाबाबत व त्यांच्या मागण्यांबाबत कोळी समाजाच्या संघटनेद्वारे अनेकवेळा माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री व माननीय सामाजिक न्याय मंत्री यांच्याकडे लेखी निवेदने पाठविण्यात येणे, तरी देखील कोळी समाजाच्या कोणत्याही मागण्या मान्य न होणे, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक 18 मे 2013 रोजीच्या परिपत्रकान्वये पडताळणी समितीकडे जात प्रमाणपत्र दिनांक 31 जुलै 2013 पर्यंत सादर करणे आवश्यक असणे, इतक्या कमी कालावधीत जात प्रमाणपत्र सादर करणे कोळी बांधवांना अशक्य असणे, त्यामुळे 18 मे 2013चे शासन परिपत्रक रद्द करण्याची तसेच 15 जून 1995 च्या शासन निर्णयाची व्याप्ती 2001 पर्यंत वाढविण्याची व जातीच्या दाखल्यासाठी 1950 पूर्वीची अट शिथिल करण्याची मागणी महाराष्ट्र कोळी समाज संघाच्या अध्यक्षांनी त्यांच्या दिनांक 18/6/2013 रोजीच्या निवेदनाद्वारे माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, माननीय सामाजिक न्याय मंत्री यांच्याकडे करणे व सदर मागणीकडे राज्य शासनाने दुर्लक्ष करणे, सबब दिनांक 18 मे 2013चे शासन परिपत्रक मागे न घेतल्यास किंवा रद्द न केल्यास राज्यातील सर्व कोळी समाज, कोष्टी इत्यादी समाजांनी राज्यभर रेल रोको आंदोलन करण्याचा इशारा देणे, कोळी समाजामध्ये परिपत्रकाविरोधात असंतोष पसरणे, म्हणून परिपत्रक रद्द करण्याकरिता मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...4..

18-07-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) JJ-4

MSS/ D/ D/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 13:55

**पृ. शी./मु. शी.** : महिला पोलीस कर्मचा-यांच्या गणवेशात बदल

करण्याची केलेली मागणी याबाबत श्री.प्रकाश
बिनसाळे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची
सूचना.

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच□ मांडतो.

"महाराष्ट्र पोलीस दलामध्ये मोठ्या प्रमाणात महिला पोलीस कर्मचारी व अधिका-यांची होत असलेली वाढ, परंतु महिला आणि पुरुष पोलीस कर्मचारी व अधिकारी यांचा गणवेश सारखाच असणे, या गणवेशात महिला पोलीस कर्मचा-यांची काम करताना होत असलेली कुचंबणा तसेच त्यांना होत असलेला मानसिक त्रास, त्यामुळे महिला पोलीस कर्मचारी यांच्या गणवेशात बदल करण्यात यावा अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

--

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.**:बंद पडलेल्या कापड गिरण्या,साखर कारखाने इत्यादीमधील कामगारांना पिवळया शिधापत्रिकेचा लाभ मिळत नसल्याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जयंत प्र.पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"राज्यात बंद पडलेल्या सूत कापड गिरण्या, साखर कारखाने इत्यादी संस्थांमधील कामगारांना पिवळया शिधापत्रिका देण्यासाठी शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांनी दिनांक 17 मार्च, 2003 रोजी आदेश निर्गमित करणे, या आदेशानुसार बंद पडलेल्या सूत कापड गिरण्या आणि साखर कारखाने यामधील कामगारांना बी.पी.एल.कार्ड धारकाप्रमाणे सवलतीने धान्य आणि तद्नुषंगीक जीवनावश्यक वस्तू स्वस्त व रास्तभाव दुकानातून देण्यात येणे, परंतु गेली 2 वर्षापासून सदरचे फायदे देण्याचे कमी करण्यात येणे व सद्य:स्थितीत या सवलती बंद करण्यात येणे, तरी या बंद पडलेल्या सूत कापड गिरण्या, साखर कारखाने यामधील कामगारांना सवलतींचा लाभ मिळण्यासाठी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे.

--------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** :सातारा शहरातील करंजपेठ भागातील कन्या शाळेत शिक्षक श्री.सानप यांना मुख्याध्यापिका यांचे पती व संस्थेचे पदाधिकारी यांनी केलेली मारहाण याबाबत श्री.भगवान साळुंखे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.भगवान साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

" सातारा शहरातील करंजपेठ भागात कन्याशाळा नावाच्या अनुदानित माध्यमिक शाळेत गुरुवार,दिनांक 11 जुलै, 2013 रोजी दुपारी 4.30 वाजता चंद्रकांत सानप नावाचे शिक्षक इयत्ता 5 वी च्या वर्गात "नंदीबैल" नावाची कविता शिकवत असताना मुख्याध्यापिका सौ.नंदिनी यादव यांनी शिपायाकरवी त्यांना कार्यालयात बोलावून घेतले. कार्यालयामध्ये त्यांचे पती व संस्थेचे पदाधिकारी प्रा. अरुण यादव व त्यांचे चिरंजिवासह दोन-तीन इतर गुंड यांनी " तू मासिक हप्त्याचे पैसे का देत नाहीस?" अशी विचारणा करीत ते श्री.सानपांवर तुटून पडले, श्री.सानप बचावासाठी बाहेर धावत सुटले. या गुंडानी त्यांचा पाठलाग करुन रस्त्यावर गाठले व त्यांना शिवीगाळ करीत बेदम मारले. श्री.सानप यांची सुटका करण्यासाठी शाळेतील शिक्षक व विद्यार्थी वर्गास मज्जाव करण्यात आला, तसेच रस्त्यावर जमलेल्या वाटसरुंना देखील दम देण्यात आला. जखमी झालेल्या सानपाना एका रिक्षामध्ये बसून तेथून हाकलून देण्यात आले. श्री.सानपानी त्या रिक्षा चालकास पोलीस स्टेशनला घेऊन जाण्यास सांगितले. पोलिसांनी श्री.सानप यांना सर्वोपचार रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले असून ते उपचार घेत आहेत. मात्र पोलिसांनी अद्याप संबंधित गुंडावर कोणतीही कारवाई केलेली नाही. या विशेष उल्लेखाव्दारे मी शासनास अशी विनंती करतो की, शासनाने संबंधित गुंडांना ताबडतोब अटक करावी व त्यांचेवर गुन्हे दाखल करावेत."

-------

3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.**:पुणे शहराच्या शासकीय मध्यवर्ती इमारतीच्या दुरुस्तीकरिता रुपये 1 कोटी निधी मंजूर करण्याचा प्रस्ताव याबाबत श्री.मोहन जोशी, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. मोहन जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

" पुणे शहराचे वैभव आणि ऐतिहासिक वारसा सांगणाऱ्या तसेच हेरिटेज वास्तू म्हणून मान्यता असलेल्या शासकीय मध्यवर्ती इमारतीच्या दुरुस्तीसाठी एक वर्षापासून निधी मंजूर करण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे. मंत्रालयाला लागलेल्या आगीच्या पार्श्वभूमीवर मध्यवर्ती इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन पाठविलेला अहवाल शासनाच्या मंजुरीसाठी एक वर्षापासून प्रलंबित आहे. मंत्रालय दुर्घटनेनंतर बांधकाम विभागाने पुण्यातील 16 इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट केले यामध्ये तातडीने काही दुरुस्तीची आवश्यकता असल्याचे आढळून आले आहे. या तीन मजली इमारतीमध्येबसून शासनाच्या विविध विभागांचे प्रमुख राज्याचा निर्णय घेतात. लोड बेरींग वॉल्स पध्दतीने बांधलेली इमारत शंभर वर्षे झाली असून त्यांच्या बीमना,भिंतींना तडे गेले आहेत. पाण्याची गळती होत आहे. खिडक्या मोडल्या असून विजेच्या व दूरध्वनीच्या वायर लोंबकळत असलेल्या या इमारतीची तातडीने दुरुस्ती केली नाही तर गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता या अहवालात वर्तविली आहे. तरी या इमारतीच्या दुरुस्तीकरिता रुपये 1 कोटी निधी मंजूर करण्याचा प्रस्ताव तातडीने मंजूर करावा, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेव्दारे शासनास करीत आहे."

--------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.**:राज्यभरातील शासकीय आयटीआयमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी प्रवेश प्रक्रियेची मुदत वाढविण्याची मागणी याबाबत श्री.निरंजन डावखरे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. निरंजन डावखरे ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

" राज्यभरातील शासकीय आयटीआयमध्ये (इंडस्ट्रीयल ट्रेनिंग इन्स्टिटयूट) प्रवेशासाठी ऑनलाईनव्दारे प्रवेशप्रक्रिया राबविण्यात येणे, ऑनलाईन प्रवेश प्रक्रिये दरम्यान "सर्व्हर" च्या संथपणामुळे हजारो विद्यार्थ्यांना दिनांक 8 जुलै, 2013 रोजीपर्यंत म्हणजेच अखेरच्या दिवसापर्यंत अर्ज दाखल करता न येणे, परिणामी बहुसंख्य विद्यार्थ्यांना शासकीय संस्थांमध्ये प्रवेशापासून वंचित राहण्याची आलेली पाळी, त्यामुळे दिनांक 26 जून,2013 पासून सुरु झालेल्या या प्रवेश प्रक्रियेत अर्ज दाखल करण्याची मुदत दिनांक 15 जुलै, 2013 पर्यंत वाढविण्यात येणे, परंतु त्याही मुदतीत सर्व्हरच्या संथपणामुळे प्रवेशासाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांना अर्जच दाखल करता आले नाहीत इतकेच नव्हे तर ठाणे येथे तर संकेतस्थळच वारंवार खंडीत झाल्याने तेथील विद्यार्थ्यांना देखील आपले अर्ज दाखल करता आले नाही. त्यामुळे बहुसंख्य विद्यार्थ्यांची कोणतीही चूक नसताना या विद्यार्थ्यांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने आयटीआयमध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रवेशप्रक्रियेची मुदत वाढविण्यात यावी, एवढीच मागणी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाकडे करीत आहे."

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, आय.टी.आय.प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने सुरु करण्याचे हे पहिलेच वर्ष आहे. सुरुवातीला काही अडचणी आलेल्या आहेत. त्यामुळे 15 जुलै, 2013 पर्यंत मुदत वाढविली होती. पुन्हा मुदत वाढविण्याची आवश्यकता असेल तर जरुर विचार करता येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आय.टी.आय.प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया या वर्षापासून सुरु झाली आहे. ज्यांना प्रवेश घ्यायचा आहे, जे प्रवेशासाठी पात्र आहेत त्यांना ऑनलाईन प्रक्रियेतील अडचणीमुळे प्रवेश घेता आला नाही. जे विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊ शकत नाहीत, ज्यांची आर्थिक स्थिती नाही असे विद्यार्थी तंत्रशिक्षणाकडे वळतात. तेव्हा 15 दिवसाची मुदत वाढवून देण्यास हरकत नाही.

श्री.डी.पी.सावंत : यावर नक्की निर्णय केला जाईल.

श्री.निरंजन डावखरे : सर्व्हरमध्ये अडचण आल्यामुळे अनेक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिले आहेत.

श्री.डी.पी.सावंत : मुदत वाढवून दिली जाईल.

**उप सभापती** : यासाठी 15 दिवसांची मुदत वाढवून द्यावी व त्या काळात सर्व्हर नीट चालतील एवढी दक्षता घ्यावी.

श्री.डी.पी.सावंत : होय.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : महाविद्यालयातील विद्यार्थी संसदेच्या खुल्या निवडणुका पुन्हा सुरु करणे याबाबत श्री.संजय दत्त, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

राज्यात 1993 साली महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यात दुरुस्ती करुन महाविद्यालयात व विद्यापीठात होणाऱ्या विद्यार्थी संसदेच्या खुल्या निवडणुकांवर बंदी आणली होती व मेरिटनुसार विद्यार्थी संसदेत विद्यार्थ्यांची निवड करण्याची पध्दत सुरु झाली. या अनुषंगाने मागील 20 वर्षात राज्यातील विद्यार्थी चळवळ संपूर्णपणे कमकुवत झाली असून विद्यार्थी राजकारणातून राजकीय कार्यकर्ता मिळविण्याच्या प्रक्रियेवर त्याचा परिणाम झालेला आहे. त्याचप्रमाणे लोकशाही मूल्य सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याकरिता व प्रत्येक महाविद्यालयात विद्यार्थ्यांला मतदानाचा अधिकार मिळण्याकरिता महाविद्यालयीन निवडणुका पुन्हा एकदा खुल्या वातावरणात घेणे गरजेचे बनले आहे. या निमित्ताने सर्वसामान्य विद्यार्थ्यांना राजकारणाच्या प्रक्रियेत येण्याची मोठी संधी उपलब्ध होणे याकरिता महाविद्यालयीन निवडणुका जे.एम.लिंगडोह समितीच्या शिफारशीनुसार पुन्हा लवकरात लवकर सुरु करण्यात याव्यात अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

-------------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : ठाणे जिल्हयातील वसई पूर्व येथील शाळांमध्ये अंगणवाडी व बालवाडीकरिता वर्ग खोली उपलब्ध करुन देणे याबाबत श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

ठाणे जिल्हयातील वसई पूर्वेतील उपलब्ध शाळांमध्ये अंगणवाडी व बालवाडी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र जागाच उपलब्ध नसल्याने येथील बाल विद्यार्थ्यांबरोबर शाळेतील विद्यार्थ्यांचीही वेळेच्या चुकीच्या नियोजनामुळे कुचंबणा होत असणे, येथील शाळांमध्ये उपलब्ध खोल्यांपैकी एकच खोली बालवाडीसाठी उपलब्ध असणे, या बाल विद्यार्थ्यांना जागेअभावी अंगणवाडीच्या विद्यार्थ्यांना बसण्यासाठी, खेळण्या-बागडण्यासाठी व त्यांना शासनामार्फत पुरविल्या जाणाऱ्या खाऊची व खेळण्याची साधने ठेवण्यासाठी अडचणी येणे, अशा अडचणी येऊ नयेत म्हणून अंगणवाडी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र जागेवर खोलीची उभारणी करुन अंगणवाडी सुरु करण्यात यावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे. सभापती महोदय, अंगणवाड्याना खूप अडचणी येत आहेत. त्यामुळे त्यांच्याकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे.

---

नंतर 2एम.1..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: शेगाव, जि.बुलढाणा येथील खामगाव रस्त्यावर विद्यार्थ्यांच्या रिक्षाला अपघात होऊन त्यामध्ये एका विद्यार्थिनीचा मुत्यू होणे याबाबत डॉ.रणजित पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ.रणजित पाटील (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"शेगाव, जि.बुलढाणा येथील भरधाव जाणाऱ्या स्कॉर्पिओ गाडीने विद्यार्थी घेऊन जात असतांना ऑटोला दि. 12 जुलै,2012 रोजी शेगाव खामगाव रस्त्यावरील जगदंबा नगर जवळील टी पॉईंटवर धडक बसणे, अपघातानंतर नागरिकांच्या भावना उद्रेक झालेला असणे, अनेक वेळा अपघात घडल्यानंतरही सार्वजनिक प्रशासन झोपेत असणे त्यांना जागविण्यासाठी अपघातानंतर रस्ता रोको केला असणे, काही जणांनी अपघातग्रस्त स्कॉर्पिओला नुकसान पोहचण्याचा प्रयत्न केल्याने दगडफेक झाल्याने पोलिसांना नागरिकांवर सौम्य लाठीमार करावा लागणे, यामध्ये 15 नागरिक जखमी झाले होणे, या अपघातामध्ये एका शालेय विद्यार्थिनीचा मृत्यू होणे, तसेच तेथील नागरिकांवर गुन्हे दाखल केलेले असणे, गुन्हे मागे घेण्याबाबत तेथील नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी मागणी करणे, त्याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, या विशेष उल्लेखाद्वारे ही बाब मी सदनाच्या निदर्शनास आणत आहे.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. VIII OF 2013

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHATRA UNIVERSITIES ACT,1994)**

**AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE.**

श्री. डी.पी.सावंत (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.प.वि.क्रमांक-8, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, सोशल सोसायटी, मोरबा, ता. माणगाव, जि. रायगड या संस्थेने नवीन महाविद्यालय मंजूर करण्याच्या अनुषंगाने माननीय उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.10424 सन 2010 मध्ये दाखल केली होती. यामध्ये उच्च न्यायालयाने निर्णय दिला की, कायम विनाअनुदानित कॉलेजेस जेवढे चालतात त्या कॉलेजेसला सरकारकडून कोणत्याही प्रकारची मदत मिळत नसल्यामुळे सरकारचे यावर नियंत्रण नसावे. या निर्णयाच्या विरोधात सरकारने सुप्रीम कोर्टात धाव घेतली.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, उच्च न्यायालयाच्या निर्णयामध्ये "नियंत्रण" हा शब्द नाही. त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी हे विधेयक व्यवस्थित मांडावे अशी विनंती आहे.

श्री. डी.पी.सावंत : सभापती महोदय, सोशल सोसायटी, मोरबा, ता. माणगाव, जि. रायगड या संस्थेने नवीन कायम विनाअनुदानित महाविद्यालय मंजूर करण्यासाठी प्रस्ताव दाखल केला होता. परंतु शासनाने या कॉलेजला मान्यता न दिल्यामुळे ही संस्था उच्च न्यायालयात गेल्यावर न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे तो मी थोडक्यात सांगतो. कायम विनाअनुदानित असल्यामुळे तसेच कॉलेजला शासनाकडून काहीही मिळत नसल्यामुळे कॉलेज देण्याचा अधिकार विद्यापीठाला असावा, विद्यापीठानेच ही बाब विद्यापीठ स्तरावर फायनल करावी अशा प्रकारचा निर्णय दिला होता. उच्च न्यायालयाच्या निर्णया विरुध्द राज्य सरकार सुप्रीम कोर्टात गेले. सुप्रीम कोर्टानेही उच्च न्यायालयाचा निर्णय कायम केल्यामुळे राज्य शासनाला नियमात बदल करणे गरजेचे ठरले. अशा प्रकारचे विना अनुदानित कॉलेजेस सगळीकडे आले तर ते योग्य होणार नाही.

...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी.पी.सावंत .....

बृहत आराखडयानुसार कॉलेजेस दिले जातात की, नाही हे राज्य शासनाला पहावे लागतs. यावर शासनाचs निर्बंध असणे गरजेचे आहे. त्यामुळे आपण कायम विना अनुदानितसाठी ऑर्डीनन्स काढला असून यासंदर्भात 15 जूनच्या कायद्यामध्ये तरतूद असल्यामुळे 15 जुलै पर्यंत मुदत वाढवून देण्याचा निर्णय घेतला असून त्या प्रमाणे आपण या बिलामध्ये सुधारणा करीत आहोत. त्यामुळे सभागृहाने या विधेयकाला मान्यता द्यावी अशी विनंती आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**उप सभापती** : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांचा आहे. तो त्यांनी मांडावा.

श्री.रामदास कदम (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2013 चे वि.प.वि.क्रमांक-8, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक, विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 47 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**उप सभापती** : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांचा आहे. तो त्यांनी मांडावा.

(सन्माननीय सदस्या अनुपस्थित)

**उप सभापती** : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा तिसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांचा आहे. तो त्यांनी मांडावा.

(सन्माननीय सदस्या अनुपस्थित)

**उप सभापती** : आता विधेयक विचारात घेण्यासंबधीचा प्रश्न आणि विधेयक संयुक्त

...4...





**उप सभापती** ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव या दोन्ही प्रस्तावांवर एकत्रित चर्चा होईल. माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर सर्वप्रथम विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकला जाईल. तो असंमत झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

नंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

श्री.रामदास कदम (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या जनतेच्या हिताकरिता आपण कायदा करतो. आपल्या माध्यमातून एक गोष्ट मला शासनाच्या निदर्शनास आणावयाची आहे. शैक्षणिकदृष्ट्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांवर अन्याय करणारा कायदा आपण आणत आहात असे माझे ठाम मत आहे.

सभापती महोदय, मोरब्यातील एक संस्था न्यायालयात गेली. त्या संस्थेला न्यायालयात का जावे लागले ? कोकणामध्ये अशा किती संस्था आहेत, पश्चिम महाराष्ट्रामध्ये किती संस्था आहेत, मराठवाड्यामध्ये किती संस्था आहेत, खानदेशमध्ये किती संस्था आहेत, विदर्भामध्ये किती संस्था आहेत. माननीय मंत्री महोदयांनी येथे बृहत आराखड्याचा उल्लेख केला आहे. त्यामुळे त्यांनी कुठे कुठे कसा कसा अनुशेष आहे हे आम्हाला सांगावे.

सभापती महोदय, कोकणात एकही मेडिकल कॉलेज नाही. याला कोण जबाबदार आहे ? अनेक मंत्री कोकणातून होऊन गेले. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना मंत्री केले असते तर ही वेळ आली नसती. आमची सत्ता असताना कोकणातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न आम्ही प्रामाणिकपणे केला. पण हा प्रश्न आपण अडचणीत टाकला. आम्ही कोकणातील 35 पाटबंधाऱ्यांच्या प्रकल्पाला मान्यता दिली, कामे सुरू केली. आमचे शासन गेल्यानंतर आपण सत्तेवर आल्यानंतर सर्व कामे ठप्प झालीत. एकही काम अद्याप पर्यंत झालेले नाही. अशा प्रकारे कोकणावर सतत अन्याय करण्याचे काम, ग्रामीण भागातील लोकांवर अन्याय करण्याचे काम हे शासन सातत्याने करत आहे. कोकणामध्ये मेडिकल कॉलेज नाही. कोकणामध्ये पहिले डेंटल कॉलेज मी काढले. हे कॉलेज काढण्याची हिंमत मी केली. हे कॉलेज मी जिद्दीने काढले. मी पश्चिम महाराष्ट्रातील एका मोठ्या नेत्याला फोन केला. त्याला सांगितले की, माझ्या एका मित्राच्या मुलाला ॲडमिशन पाहिजे आहे. त्यांनी मला सांगितले की, आम्ही सर्वांकडून 15 लाख रूपये डोनेशन घेतो. आपल्याकडून आम्ही रूपये 10.00 लाख डोनेशन घेऊ. मी नाव घेत नाही. खरे म्हणजे हे बोलता कामा नये. हे सर्व वाईट आहे. हा आता धंदा झाला आहे, व्यवसाय झाला आहे. म्हणून मी जिद्दीला पेटलो. माझ्या कोकणातील लंगोटी लावणारा शेतकरी आपल्या मुलासाठी रूपये 10.00 लाख कुठून देणार ? एवढे मोठे डोनेशन घेतले तर कोकणातील माणूस कधीच डॉक्टर होऊ शकणार नाही. त्यामुळेच त्या जिद्दीने मी कॉलेज काढले. मी काय केले ते माझ्या जीवाला माहीत आहे. मी कॉलेज काढले हे अभिमानाने सांगतो आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

मला या कॉलेजमध्ये पोस्ट ग्रॅज्युएशनचा अभ्यासक्रम सुरू करावयाचा होता. त्यासाठी शासनाकडे सहा प्रस्ताव दिले. आपण पोस्ट ग्रॅज्युएशनचा अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी परवानगी का दिली आहे याचा खुलासा आपल्या उत्तरामध्ये करावा. माझ्या डोळ्यातून पाणी येत आहे. आपण माझ्या कॉलेजला का परवानगी दिली नाही ? मी शासनाला प्रस्ताव दिले एवढेच नव्हे तर स्मरणपत्रेही पाठविली. आपण प्रस्तावांना मंजुरी देत नाही, आम्ही न्यायालयात जायचे नाही ? हे कशासाठी चालवले आहे. आपणाला बॅगा हव्या आहेत काय ?

यानंतर श्री.अजित....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

आपणास पैसे कमी पडतात काय ? महाविद्यालय सुरु करण्यासाठी देखील आपणास बॅगा द्याव्या लागतात काय ?

सभापती महोदय, डेन्टल कॉलेज सुरु करण्यासाठी मी विद्यापीठाकडे प्रस्ताव पाठविला. विद्यापीठाने मला सांगितले की, डेन्टल कौन्सिलची परवानगी नसल्यामुळे आपला प्रस्ताव नाकारण्यात येत आहे. त्यानंतर मी स्वत: दिल्ली येथे जाऊन डेन्टल कौन्सिलची परवानगी आणली आणि त्याची कॉपी माझ्या प्रस्तावासोबत जोडली. माझ्यासारख्या लोकप्रतिनिधींची ही अवस्था असेल तर सर्वसामान्य लोकांची काय परिस्थिती असेल याची कल्पना करवत नाही. मी विद्यापीठाकडे 12 लाख रुपये भरले होते त्यातील 50 टक्के रक्कम कापण्यात आली म्हणजे माझे सहा लाख रुपये गेले. यास कोण जबाबदार आहे ? माझ्या मेहनतीचे, कष्टाचे ते पैसे आहेत.

सभापती महोदय, हॉस्पीटलमध्ये कायम 100 डॉक्टर्स असले पाहिजेत जर कमी डॉक्टर्स असतील तर हॉस्पीटलची मान्यता रद्द असा एक नियम आहे. कोकणातील डोंगरी भागामध्ये एकाचवेळी 100 डॉक्टर्स हॉस्पीटलमध्ये मिळतील काय ?

सभापती महोदय, मी दिल्लीमध्ये जाऊन केंद्रीय आरोग्य मंत्री महोदयांना भेटलो. काँग्रेस पक्षाचे सन्माननीय सदस्य मला त्यांच्याकडे घेऊन गेले होते. माझी तळमळ एवढीच आहे की, माझ्या भागातील मुलांसाठी मी काही तरी केल्याचे समाधान मला मिळेल. काही लोकांनी शिक्षणाचा व्यापार केलेला आहे ही बाब निश्चितपणे बदनामकारक आहे. परंतु त्याच्यापेक्षा दहा पटींनी तुम्ही बदनाम आहात. तुम्ही शिक्षण हा व्यवसाय सुरु केला, शिक्षणाचे धंदे सुरु केले. ज्यांना काविळ झ ाली असते त्यांना सर्व दुनिया पिवळी दिसते. माझा या विधेयकाला प्रखर विरोध आहे. आपण संख्याबळावर हे विधेयक मंजूर करुन घ्याल. परंतु मी शेवटपर्यंत विरोध करुन येथे खाली बसेन. शासन म्हणून आपण अन्याय करीत आहात. तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, आपण हे विधेयक 47 सदस्यांच्या संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावे.

सभापती महोदय, या विधेयकान्वये शासनाने सर्व अधिकार मागितलेले आहेत. सरकारला सर्व अधिकार पाहिजे असतील तर सरकारने आपले कर्तव्य देखील पार पाडले पाहिजे. सरकारने नि:स्वार्थीपणे कर्तव्य बजावल्यास त्यांना असे अधिकार मागण्याचा अधिकार आहे.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

सभापती महोदय, योगिता डेन्टल कॉलेजमध्ये पोस्ट ग्रॅज्युएशनसाठी मी परवानगी मागितलेली आहे आणि तसा प्रस्ताव दिलेला आहे. माननीय मंत्री महोदयांनी तो प्रस्ताव पहावा. मी त्या संदर्भात सहा स्मरण पत्रे दिलेली आहेत. काल मी माननीय मंत्री महोदयांना त्याबाबत विचारले असता त्यांनी मला सांगितले की, मला हे माहीतच नाही. आमदारांनी पाठविलेली पत्रे मंत्री महोदयांना मिळत नसतील तर मग ती पत्रे कुठे गेली ? मी नव्याने निवडून आलेलो आमदार नाही. माझ्या सारख्या आमदाराच्या पत्राला केराची टोपली दाखविली जात असेल तर सर्वसामान्य लोकांची काय परिस्थिती असेल ?

सभापती महोदय, खरे म्हणजे शासनाने स्वत: पुढाकार घेऊन कोकणातील डोंगरी भागात कॉलेजस काढली पाहिजेत किंवा त्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. परंतु असे काही न करता जो कोणी कॉलेज काढण्याचा प्रयत्न करीत असेल त्याला थांबविण्याचे काम करीत आहे.

सभापती महोदय, मला येथे सांगण्यास अभिमान वाटतो की, मी माझ्या कॉलेजमध्ये शासनाच्या फी पेक्षा 75 हजार रुपये कमी घेऊन 74 विद्यार्थ्यांना ॲडमिशन दिलेली आहे. त्यामुळे माझे 92 लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. मी हे जबाबदारीने बोलत आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

गरीब मुलांना शिक्षणासाठी पैसा कमी पडत असेल तर त्यांना काही ना काही रुपाने मदत करुन त्यांचे शिक्षण पूर्ण झाले पाहिजे ही आमची भावना आहे. कोकणातील लंगोट घालणाऱ्या माणसाचा मुलगा डॉक्टर झाला पाहिजे हीच आमची भूमिका आहे. आम्ही या भावनेने काम करीत असताना आपण झारीतील शुक्राचार्याप्रमाणे आमच्यासमोर अडचणी निर्माण करीत आहात काय ? जर तुम्हाला आमच्या बाबतीत काही आक्षेप असेल तर आपण प्रस्ताव आणून पैसे द्यावेत.

महोदय, न्यायालयाने डेंटल कॉलेजबाबत दिलेले आदेश मला मान्य आहेत. त्या बाबत मला काही म्हणायचे नाही. परंतु आता डेंटल कॉलेजच्या ॲडमीशनसाठी असोसिएटचे दोन राऊंड झाल्यानंतर तिसऱ्या राऊंडमध्ये सरकार प्रत्येक वैद्यकीय महाविद्यालयांना विद्यार्थी देणार आहे. याचाच अर्थ तिसऱ्या राऊंडच्या जागा सरकार आपल्या मनाप्रमाणे भरणार आहे. या निमित्ताने मी माननीय मंत्र्यांना विचारु इच्छितो की, आपला इतरांवर विश्वास नाही काय, आपला केवळ शासनावरच विश्वास आहे काय ? सरकार अशा प्रकारे मेडीकल कॉलेजमधील प्रवेशाचे अधिकार स्वत:कडे घेऊन ही देवाण-घेवाण कशासाठी करीत आहे ? माझी तर मागणी आहे की, तिसऱ्या राऊंडमधील विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी या सभागृहातील सन्माननीय सदस्यांची समिती गठीत करावी. त्या समितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे प्रवेश होऊ द्यावेत. मंत्री आणि सचिव बसून कोणत्या मेडीकल कॉलेजला किती मुले द्यावयाची हे ठरविणार आहेत काय ? जो आपल्याला भेटायला येईल त्यांनाच तुम्ही विद्यार्थी पुरविणार काय ? इतक्या खालच्या पातळीवर तुम्ही आला आहात काय ? काही बाबी मी कदाचित समजू शकतो. परंतु शैक्षणिक क्षेत्रात सुध्दा आपण पळवाटा काढून काम करीत आहात. हे कदापि योग्य नाही.

महोदय, मी तर म्हणेन की, कॉलेजमध्ये प्रवेश देण्यासाठी जे डोनेशन घेत असतील त्यांना फासावर चढवा. मला वाटते माननीय मंत्री महोदय सर्वांची गणना एकसारखीच करीत आहेत. कावीळ झाल्यामुळे तुम्ही सर्वांना एकाच नजरेने पाहणार आहात काय ? हे विधेयक संमत करुन मी आपल्याला पाप करु देणार नाही. माननीय मंत्री महोदय, तुमचे कूळ कोकणातील आहे. आपण या अनुषंगाने सकारात्मक विचार करणे आवश्यक आहे.

महोदय, कोकण हा डोंगरी भाग असल्यामुळे त्या भागात मेडीकल कॉलेज होऊ शकत नाही. कारण मेडीकल कॉलेजसाठी 300 बेडचे रुग्णालय आणि 25 एकर जागा पाहिजे. कोकण

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

डोंगरी भाग असल्यामुळे 100 बेडचे रुग्णालय आणि 10 एकर जागा असली तरी त्या ठिकाणी मेडीकल कॉलेज उघडण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव आपण केंद्र सरकारकडे पाठवू शकत नाही काय ? गडचिरोली सारखा आदिवासी आणि नक्षलाईट भाग असेल तर त्या ठिकाणी सुध्दा असाच नियम लावून मेडीकल कॉलेज सुरु करण्याचा प्रस्ताव पाठवू शकत नाही काय ?

महोदय, सध्याच्या निकषानुसार कोकणात मेडीकल कॉलेज कधीच होऊ शकत नाही. कारण सलग 25-30 एकर जागा कोठून आणणार ? आता आपण 10-10 एकर अशा दोन भागास मान्यता दिली आहे, हा भाग निराळा. तरी देखील सध्याच्या निकषानुसार कोकणात मेडीकल कॉलेज काढणे सोपी बाब नाही. महोदय, मी जुनी मॅट्रीक पास झालेलो आहे. त्या काळात जी वेळ आमच्यावर आली होती ती वेळ आज गरीब आणि सर्वसामान्य विद्यार्थ्यांवर येता कामा नये. आजच्या घडीला आम्ही या विद्यार्थ्यांसाठी काम करीत असताना सुध्दा सरकार आम्हाला काम करु देत नाही.

महोदय, या निमित्ताने मी शासनाला विनंती करतो की, शासनाने हे विधेयक सन्मानाने मागे घ्यावे. कोकण हा डोंगरी आणि मागासलेला भाग असल्यामुळे त्या भागात मेडीकल कॉलेज होण्यासाठी 100 बेडचे रुग्णालय आणि 10 एकर जागेचा निकष लावून तशा प्रकारचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवून तो मान्य करुन आणावा. माननीय मंत्री महोदय, आपण असे केल्यास आपल्या हातून पुण्याचे काम होईल.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

भविष्यामध्ये आयुष्यभर आमच्या कोकणामध्ये मेडिकल कॉलेज देऊ शकणार नाही. आम्ही फक्त पश्चिम महाराष्ट्रामध्ये आणि पुण्यामध्ये जाऊन हाजी-हाजी करीत बसू. आमच्या आई-बहिणींचे दागिने गहाण ठेवू, शेती विकू आणि मग आमचा मुलगा कोठे मेडिकलला जाईल का या विचार करु. आम्हाला यापेक्षा दुसरा मार्ग नसेल. आजही हीच अवस्था आहे.

सभापती महोदय, मी आपल्यामार्फत मंत्री महोदयांना पुन्हा सांगेन की, आपण हे बिल सन्मानाने परत घ्यावे आणि हे बिल संयुक्त चिकित्सा समितीकडे जाऊ द्यावे. त्या समितीमध्ये या बिलावर सहा महिने विचार होऊ द्या. त्यानंतर पुन्हा आपण हे बिल आणावे. आपण चर्चा करु आणि त्यामध्ये काही सुधारणा करता येईल का ते बघू. न्यायालयाने आदेश दिले, सरकारला काही अधिकार नाही म्हणून आम्हाला हे अधिकार द्यावेत असे आपण म्हणत आहात. आपल्याला हे अधिकार देणे पूर्णपणे चुकीचे होईल. तुम्ही अधिकार घेण्यासाठी लायक नाहीत. मी वेगळा शब्द वापरणार नाही. तुम्ही लायक नाहीत हे दाखवून दिले आहे. ही माझी स्वत:ची व्यथा आहे. शासन धंदा म्हणून हे करणार असेल तर ते योग्य नाही. शैक्षणिक विकास म्हणजे सर्वांगीण विकास असे आपण एका बाजूला सांगतो आणि दुसऱ्या बाजूला जर आपण भकासपणा करण्यासाठी या ठिकाणी बसला असाल तर किमान ते पाप आपल्याकडून होता कामा नये. माझी मंत्री महोदयांना पुन्हा विनंती आहे की, आपल्याकडून देखील हे पाप होता कामा नये.

जेव्हा आम्ही विद्यापीठाकडे एखादा प्रस्ताव पाठवितो तेव्हा तीन-तीन तारखा दिल्या जातात. पुन्हा या, पुन्हा या, असे सांगितले जाते. त्यांची व्हिजीट आम्हाला मागावी लागते. या बाबीसाठी जर सरकार स्वत:कडे अधिकार मागत असेल तर ते पूर्णपणे चुकीचे होईल. ही तर कोकणातील संस्था आहे. कदाचित ही संस्था श्री. सुनील तटकरे यांची असावी.

श्री. जयंत. प्र. पाटील : ही संस्था माझी आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, जर कदाचित ही संस्था पश्चिम महाराष्ट्रातील असती तर आपण हे बिल आणले नसते. तुमची तशी हिंमत झाली नसती. पण ही संस्था कोकणातील आहे. कोकणातील मुले आमच्याकडे आली पाहिजेत. कोकणामध्ये कॉलेज होता कामा

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

नये म्हणून माझे कॉलेज बंद करण्यासाठी, परवानगी नाकारण्यासाठी लोकांनी काय काय प्रयत्न केले ते मी सांगू शकणार नाही. कारण त्या ठिकाणी कॉलेज झाले तर आम्हाला डोनेशन कोठून मिळेल ? यामध्ये अनेक गोष्टी आहेत. मी एक गोष्ट या ठिकाणी जाहीरपणे सांगतो. आदरणीय श्री. शरद पवार साहेबांचे मी मनापासून आभार मानतो. मला या डेंटल कॉलेजची परवानगी मिळण्यासाठी श्री. शरद पवार साहेबांनी देखील मदत केली आहे हे मी आज प्रामाणिकपणे सांगतो. कोकणामध्ये एक कॉलेज येत आहे म्हणून राजकारण बाजूला ठेऊन श्री. शरद पवार साहेबांनी सुध्दा मला मदत केली. ते स्वत: मला दिल्लीमध्ये संबंधित मंत्र्यांकडे घेऊन गेले. एखाद्या मंत्र्यांचे विचार किती मोठे असतात, व्यापक असतात आणि आपण फार छोटे विचार घेऊन या ठिकाणी येत आहात. तुमच्यामध्ये आणि त्यांच्यामध्ये मला जमीनअस्मानाचा फरक पहावयास मिळतो.

सभापती महोदय, माझी पुन्हा एकदा आपल्यामार्फत मंत्री महोदयांना कळकळीची विनंती आहे की, आपण हे बिल सन्मानाने परत घ्यावे आणि हे बिल संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे आपण मेडिकल कॉलेजचा प्रस्ताव दिल्लीमध्ये पाठवावा. डोंगरी भागामध्ये जर 100 बेडचे हॉस्पिटल आणि 10 एकर जागा असेल तर त्यांचा प्रस्ताव पाठवावा. शासनाने अधिकृतपणे जाहीर केलेला तो मागासलेला आणि डोंगरी जिल्हा असल्यामुळे तशा प्रकारचा प्रस्ताव आपण दिल्लीमध्ये पाठवावा जेणेकरुन भविष्यामध्ये कोकणाला न्याय मिळेल. भविष्यामध्ये एखाद्या कॉलेजने अशा पध्दतीची परवानगी मागितली तर किमान परवानगी का देता येत नाही याचे उत्तर तरी शासनाने त्यांना पाठवावे. एखादा आमदार तीन-तीन महिने पाठपुरावा करतो, सहा-सहा पत्रे देतो तेव्हा किमान तुम्हाला परवानगी का देता येत नाही याबाबत एखादे उत्तर तरी द्यावे. पण तेही होत नाही. मी पुन्हा एकदा आपल्या माध्यमातून शासनाला कळकळीची, आग्रहाची, नम्रतेची आणि हात जोडून प्रार्थना करतो की, आपण हे बिल सन्मानाने मागे घ्यावे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांना मनापासून धन्यवाद देतो. मी आणि सन्माननीय सदस्य दिवाकर रावते आपल्याला हे बिल पास करण्याची परवानगी देत होतो परंतु मी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांना धन्यवाद देतो. आफ्रिकेत, दुबईमध्ये जे लोक मजुरी करतात, जे लोक बाथरुम साफ करतात, त्या ठिकाणी जे हॉटेलमध्ये वेटर म्हणून काम करतात त्या गरीब लोकांनी चालविलेली ही मोरबा एज्युकेशन सोसायटी आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

या सोसायटीचा निकाल 90 ते 100 टक्के लागतो. मी मंत्री महोदयांनाही धन्यवाद देतो. परंतु सुप्रीम कोर्टामध्ये हा विषय जाईपर्यंत आम्हीच खर्च केलेला आहे. तत्कालीन माजी मुख्यमंत्री श्री.अंतुले यांनी आम्हाला मदत केली होती. त्यांनी शिक्षणाच्या विषयामध्ये कधीही राजकारण आणले नाही. मोरबा एज्युकेशन सोसायटीच्या अकरावी व बारावीच्या वर्गाला मंजुरी पाहिजे. परंतु या वर्गांना अधिकारी मंजुरी देत नाहीत. हे अधिकारी कोण आहेत, या लोकांची खाजगी मालमत्ता आहे काय ? या सभागृहात कोणत्या विषयाची विधेयके मांडली जात आहेत ?

आम्ही कॉलेजचे प्रस्ताव पाठविल्यावर आम्हाला असे सांगण्यात येते की, दादांना, राष्ट्रवादी पक्षाला एवढी दिली आहेत, कॉंग्रेस पक्षाला एवढी दिली आहेत. या गरिबांच्या सोसायटीला 11 वी व 12 वी च्या वर्गाला मंजुरी मिळत नाही ? आम्ही सुप्रीम कोर्टाकडून निर्णय आणलेला आहे. त्यामुळे तुम्हाला काय अधिकार आहे ? या विधेयकामध्ये असे नमूद केलेले आहे की, "शासनाला, विद्यापीठाने शिफारस केलेल्या अर्जांपैकी, राज्य शासनाची अर्थसंकल्पीय साधनसंपत्ती, नवीन परिसंस्था सुरु करण्याची परवानगी मागणाऱ्या व्यवस्थापनांची योग्यायोग्यता" सभापती महोदय, विद्यापीठ झोपले आहे काय, विद्यापीठामध्ये कुलगुरु आहेत, विद्यापीठासाठी शासनाकडून करोडो रुपये खर्च केला जातो. त्या विद्यापीठाला सर्व अधिकार आहेत. त्यांनी हे बघावयाचे आहे, शासनाने काहीच बघावयाचे नाही. या विधेयकाची उद्देश व कारणेही मंत्री महोदयांना नीट नमूद करता आलेली नाहीत. कॉलेजांची योग्यायोग्यता तपासण्याचे काम विद्यापीठाचे आहे. मंत्री महोदय, आपण किती शिक्षण संस्था चालवित आहात हे मला माहीत नाही. परंतु हे विधेयक सभागृहासमोर मांडण्यापूर्वी आपण परिपूर्ण अभ्यास केलेला नाही. कॉलेजांची शिफारस करण्यापूर्वी जागेची योग्यता, आर्थिक स्थिती, इमारतीची स्थिती, बांधकाम किती चौरसफूट केलेले आहे हे सर्व विद्यापीठ तपासून बघते. त्यानंतरच शासनाला शिफारस केली जाते.

या राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री.ए.आर.अंतुले यांनी या कॉलेजसाठी या राज्याच्या प्रत्येक मुख्यमंत्र्यांना 10 पत्रे लिहिली आहेत. परंतु त्यांनी असे सांगितले की, तुम्ही पालक मंत्र्यांना

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

भेटावे. त्यानंतर आम्ही परवानगी देऊ. मी स्वत: माननीय श्री.अंतुले साहेबांना भेटल्यानंतर त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांना फोन केला होता. त्यावेळी ते त्यांना म्हणाले की, साहेब, मी हतबल आहे, मी राष्ट्रवादी काँग्रेसच्या लोकांसंबंधी बोलू शकत नाही. ही खरी परिस्थिती आहे. त्यामुळे सरकारने या सभागृहात अशा प्रकारची विधेयके मंजुरीसाठी आणू नये. सरकारला विधेयक आणावयाचेच असेल तर पक्षीय दृष्टीकोनातून एक विधेयक आणावे. यापुढील काळात या राज्यात शैक्षणिक संस्था केवळ सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनीच काढल्या पाहिजेत अशा आशयाचे शासकीय विधेयक मांडावे. शैक्षणिक संस्थांबाबतचे माझे 3 प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत. परंतु संबंधितांनी मला दादांना भेटण्याचा सल्ला दिला आहे. आम्ही कधीच माननीय उपमुख्यमंत्री श्री.अजित दादांना भेटलेलो नाही. मी कोणत्याही कामासाठी दादांना भेटण्यासाठी गेलेलो नाही. कारण ते आमचे कधीच काम करणार नाहीत. पालक मंत्र्यांना आम्ही भेटल्याशिवाय ते आमच्या प्रस्तावांवर कधीच सही करणार नाहीत. शाळा चालविणे हा आमचा धंदा आहे काय ? मी विना अनुदानित तत्वावरील 40 शाळा चालवितो.

माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे हे एकदा माझ्या संस्थेमध्ये आले होते. माझ्या शाळांचा 100 टक्के निकाल लागतो. माझ्या कंपनीतील असोत की शिक्षण संस्थेतील कर्मचारी असोत त्यांना महिन्याच्या एक तारखेला पगार दिला जातो. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी माझ्या संस्थेत येऊन दीड तास भाषण केले होते. माझ्याकडे कर्मचारी 2000 ते 2500 रुपये पगारावर गेल्या 15 ते 20 वर्षे काम करीत आहेत. हायकोर्टाबाबत बोलत असताना नेहमी म्हणतो की, आपण पथ्ये पाळली पाहिजेत. शासनाने डान्स बारसाठी लगेच विधेयक आणले नाही.

या राज्याचे मुख्यमंत्री म्हणून श्री.ए.आर.अंतुले यांनी शपथ घेतल्यानंतर माझ्या वडिलांनी आठव्या दिवशी अलिबाग तालुक्यातील दोन प्रस्तावांना मंजुरी आणली होती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम....

श्री. जयंत प्र. पाटील...

मुरुड तालुक्यातील दोन प्रस्तावांना मी लगेच मान्यता घेऊन आलो. माझे वडील श्री. प्रभाकर पाटील आणि काका श्री. दत्ता पाटील हे बॅ.अंतुले साहेबांकडे गेले होते. मी देखील त्यांच्या सोबत होतो. बॅ. अंतुले साहेबांनी विचारले, "का आलात ?" त्यांना सांगितले की, "आम्हाला शाळा काढायची आहे. तुम्ही काही मान्यता देणार नाही, परंतु प्रयत्न करुन बघू म्हणून तुमच्याकडे आलो आहोत." बॅ.अंतुले साहेब म्हणाले, "शाळा काढणे ही चांगली गोष्ट आहे". आम्ही विचारले, "एका महिन्यात मान्यता मिळेल का ?" त्यांनी सांगितले, "एका महिन्यात कशाला, एका दिवसात मान्यता देतो". आम्हाला शाळेच्या मान्यतेची ऑर्डर एका तासात मिळाली. मुरुड-श्रीवर्धन हा बॅ.अंतुले साहेबांचा मतदार संघ असताना त्यांनी आम्हाला तेथे शाळा काढण्याची परवानगी दिली. आज त्या शाळा चालू आहेत. सभापती महोदय, कोणत्या गोष्टीमध्ये राजकारण करायचे ? शाळेच्या बाबतीत ? हे कसले राजकारण ?

सभापती महोदय, परवा मोरब्याची निवडणूक झाली. 15 पैकी 11 जागा शेतकरी कामगार पक्षाला मिळाल्या. गेल्या 20 वर्षापासून तेथील गरीब मुस्लिम बांधव आमच्या बरोबर आहेत. या पध्दतीचे विधेयक आपण सभागृहामध्ये आणणे योग्य नाही असे मला वाटते. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी हे विधेयक संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्याची जी मागणी केलेली आहे त्या मागणीचे मी समर्थन करतो. मी माननीय मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. त्यांनी विधेयकाचे विश्लेषण करताना मोरबा एज्युकेशन सोसायटीचा उल्लेख केला. मी पंचायतीमध्ये सत्काराला जेव्हा गेलो होतो त्यावेळी आफ्रिकेमध्ये काम करणारे गरीब लोक तेथे आले होते. मला तेथे सांगण्यात आले की, अजूनही शाळांना मंजुरी मिळू शकत नाही. मी सांगितले हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टापेक्षा कोण मोठे आहे ? त्या ठिकाणी सर्व काँग्रेसचे कार्यकर्ते होते. डॉ. घनशे हे देखील होते. त्यांनी सांगितले की बिल आणून काही तरी घोटाळा केला जाणार आहे. हे शासन एका संस्थेसाठी बिल आणते ?

सभापती महोदय, जे विद्यापीठ बोगस संस्थेची शिफारस करील, जे विद्यापीठ कोणतीही मालमत्ता नसताना, कॉलेजमध्ये पायाभूत सुविधा नसताना संस्थेची शिफारस करील त्याबाबतीत कारवाई करणारे विधेयक शासनाने आणावे. ज्या संस्थेकडे जागा नाही, स्टाफ नाही, पैसे नाहीत अशा संस्थांची जर शिफारस करण्यात येत असेल तर त्याबाबतीत कारवाई झाली

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

पाहिजे. जेथे पायाभूत सुविधा देखील नाहीत अशी अनेक कॉलेजेस आहेत. मी विशिष्ट भागाचा उल्लेख केला तर राग येईल. मी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये फिरत असतो. काही लोकांना मी विचारले तर मला सांगितले जाते की, माझ्याकडे दोन बीएड कॉलेजेस आणि 5 शाळा आहेत...(अडथळा).. जी काही वस्तुस्थिती आहे ती मी सांगत आहे. सभापती महोदय, आपण देखील काही शैक्षणिक संस्थांशी निगडित असाल. एकीकडे शासनाने खाजगी विद्यापीठांचे विधेयक आणून, परदेशी विद्यापीठांना कॉलेजेस काढण्यास आमंत्रित केलेले आहे, परदेशी विद्यापीठे राज्यात यावीत अशा प्रकारचे वातावरण निर्माण केलेले आहे आणि दुसरीकडे कोकणातील मंत्र्यांनी गरीब विद्यार्थ्यांना शाळेपासून वंचित ठेवण्यासंबंधीचे विधेयक आणलेले आहे.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

आपण सायंकाळी माननीय श्री.अशोकराव चव्हाण यांना जाऊन विचारा की, मोरबा एज्युकेशन सोसायटी किती गाजलेली आहे?

सभापती महोदय, या विधेयकाचा मसुदा तयार केला गेला आहे. त्या मसुद्यात अधिकाऱ्यांनी जी भाषा वापरली आहे, त्याला माझा आक्षेप आहे. मोरबा एज्युकेशन सोसायटीसाठी कोणते नॉर्म कमी करण्यात आले होते या बाबतचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी करावा. मोरबा एज्युकेशन सोसायटीकडे स्वत:च्या मालकीची इमारत नाही काय, त्यांच्याकडे ग्राऊंड नाही काय, त्यांच्याकडे निधी नाही काय, त्यांच्याकडे पुरेसा कर्मचारीवर्ग नाही काय, त्यांच्याकडे विद्यार्थी नाहीत काय? या गावामध्ये मी पाच पेट्रोकेमिकल इंजिनिअर तयार केले आहेत. काल मी आय.पी.सी.एल.कंपनीत त्या इंजिनिअर मुलांना घेऊन गेलो होतो. ती मुले शासकीय कॉलेजमधून मेरीटमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. त्या दोन मुलांना मी परवा नोकऱ्या देतो आहे. गरिबांच्या मुलांना शिक्षणापासून वंचीत ठेवावयाचे, त्यांना अशिक्षित ठेवावयाचे काम आपणाकडून केले जात आहे. मुस्लीम बांधवांची मते तुम्हाला मिळावीत म्हणून त्यांच्या मुलांना अशिक्षित ठेवले जाते. त्यांची मुले अशिक्षित राहिलीत तर त्यांची मते तुम्हाला मिळतील अशी तुमची भावना दिसून येते.

सभापती महोदय, मुंबई ही खारघरपर्यंत पोहोचली आहे. आम्ही गेल्या पाच वर्षापासून चौक गावात सिनियर कॉलेजला परवानगी द्यावी अशी मागणी केलेली आहे. त्या ठिकाणी सिनियर कॉलेजकडे 30 एकर जागा आहे. त्या ठिकाणी 50 हजार फुटाचे इमारतीचे बांधकाम तयार आहे. या बाबतीत सचिवांकडे गेलो होतो. त्यांनी मला सांगितले की, तुम्ही माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा यांना भेटा. तुम्हाला सिनियर कॉलेजची परवानगी लागलीच मिळेल. मी माननीय श्री.अजितदादा पवार यांना भेटलो नाही. परंतु तेथे राष्ट्रवादीला अर्धे कॉलेज दिले आणि कॉंग्रेसला अर्धे कॉलेज दिले.

सभापती महोदय, सरदारजी डान्सबार बंदीच्या संदर्भातील बील रद्द करु शकतो. तर मला वाटते की, अशा पध्दतीचे बील सरकारकडून आणले जात असेल तर ते बील देखील मी सुप्रीम कोर्टात जाऊन रद्द करुन घेऊ शकतो. माझ्या दृष्टीने ती गोष्ट अतिशय सोपी आहे. माझे असे

2...

म्हणणे आहे की, विद्यापीठांवर तुम्ही बंधने घाला. त्यांनी योग्य पध्दतीने शिफारस केली नाही तर त्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात येईल अशा प्रकारची सुधारणा या बिलात करावी. त्या सुधारणेसह हे बील शासनाने पुन्हा सभागृहासमोर मंजुरीसाठी आणावे. सुधारणेसह बील आणणार नसाल तर संयुक्त समितीकडे सदर बील पाठवावे अशा प्रकारची विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

------------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )** : काल नियम 260 अन्वये ज्येष्ठ नागरिकांसंदर्भातील सविस्तर चर्चा झालेली आहे.  त्या प्रस्तावावरील माननीय मंत्र्यांचे उत्तर राहिलेले आहे. माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे यांनी माझ्याकडे विनंती केली आहे की, यवतमाळ येथे महापूर आलेला आहे आणि त्याची पाहणी करण्यासाठी त्यांना 4.00 वाजता विमानाने जावयाचे आहे. त्यामुळे सदर प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देण्यासाठी प्राधान्य द्यावे. सभागृहाच्या अनुमतीने त्यांनी केलेल्या विनंती नुसार त्यांचे उत्तर पूर्ण होऊ देवू आणि त्यानंतर विधेयकावरील चर्चा पुन्हा सुरु करु.

श्री.विनोद तावडे : माननीय मंत्री महोदयांचे उत्तर सोमवारी ठेवावे.

श्री.जयंत प्र.पाटील : उद्या आषाढी एकादशी आहे. बऱ्याच सन्माननीय सदस्यांना वारीमध्ये सहभागी व्हावयाचे आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, रामदास कदम आणि मी स्वत: देखील आजचे सभागृहाचे कामकाज दुपारी 3.00 वाजेपर्यंत संपवावे व नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावावरील उत्तराचे भाषण सोमवारी ठेवावे अशी विनंती माननीय सभापती महोदयांकडे केली आहे. आता 2 वाजून 45 मिनिटे झालेली आहेत. आजचे कामकाज सोमवारी ठेवू. अजून अधिवेशन संपण्यास बराच कालावधी शिल्लक आहे. विधेयकावरील चर्चा अपूर्ण ठेवावी आणि माननीय मंत्री महोदयांचे भाषण सोमवारी ठेवावे.

**तालिका सभापती** : काल या प्रस्तावावर सर्व सदस्यांची भाषणे झालेली आहेत. आज फक्त माननीय मंत्री महोदयांचे उत्तरच होणार आहे. माननीय मंत्री महोदयांचे उत्तर होऊ द्यावे असे मला वाटते.

श्री.जयंत प्र.पाटील : ठीक आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी** : ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्यांसाठी ठोस कार्यक्रम आखणे

**मु.शी** : ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्यांसाठी ठोस कार्यक्रम आखणे या विषयावर सर्वश्री हेमंत टकले, रमेश शेंडगे, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री. सुभाष चव्हाण, प्रकाश बिनसाळे, संजय दत्त, श्रीमती विद्या चव्हाण, निरंजन डावखरे, विक्रम काळे, अब्दुल्ला खान दूर्राणी, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री किरण पावसकर, अशोक ऊर्फ भाई जगताप,दीपकराव साळुंखे, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री एम.एम.शेख, ॲड.जयदेवराव गायकवाड, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु.....

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मला एकच सूचना करावयाची आहे. मी माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांचे मनापासून आभार मानतो. त्यांनी एक अत्यंत महत्वाचा विषय या प्रस्तावाच्या निमित्ताने सभागृहात उपस्थित केला आहे. या प्रस्तावामध्ये वृध्दाश्रमाचा उल्लेख केलेला आहे.

सभापती महोदय, युती सरकारच्या काळात राज्यात वृध्दाश्रमाची योजना राबविण्यात आली. शासनाने या योजनेखाली वृध्दाश्रमांना अनुदान देणे सुरु केले. युती सरकार पायउतार झाल्यानंतर आघाडीचे शासन सत्तारुढ झाले. आघाडी शासनाने झुणका भाकर योजना बंद केली, त्याचबरोबर वृध्दाश्रमांना देण्यात येणारे शासकीय अनुदान देखील बंद केले. हे वृध्दाश्रमाचे अनुदान पुन्हा सुरु केले तर तेथील वृध्दांना खूप आधार मिळणार आहे. मी स्वत: 23 वृध्दांना वृध्दाश्रमामध्ये दाखल केले असून मी स्वखर्चाने त्यांच्या जेवण्याखाण्याची, कपड्याची, दैनंदिन गरजेच्या वस्तूंची सोय करीत आहे. त्यांच्या मुलाप्रमाणे मी त्यांची काळजी घेत आहे. हा प्रस्ताव सत्तारुढ पक्षाकडून आला असल्यामुळे मी शासनाला विनंती करतो की, वृध्दाश्रमाच्या विषयाबाबत राजकारण न करता, वृध्दाश्रम कोण चालवित आहे हे न पाहता बंद केलेले अनुदान पुन्हा सुरु करावे आणि ज्येष्ठ नागरिकांना आधार द्यावा, एवढे बोलून वेळेअभावी मी माझे भाषण पूर्ण करतो.

----

..2..

श्री.शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, या सदनाचे अतिशय ज्येष्ठ आणि अभ्यासू, मूलभूत भूमिका मांडणारे माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी अत्यंत महत्वाच्या विषयावरील प्रस्ताव या सभागृहात मांडला आणि मौलिक भाषण केले, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. या प्रस्तावावर बोलत असताना माननीय सदस्य श्री सुभाष चव्हाण यांनी चांगल्या सूचना केल्या आहेत. माननीय सदस्य दिवाकर रावते यांनी संस्कारक्षमापासून आमदार निधी लिंकअप करण्यापर्यंतचे मुद्दे मांडले आहेत. माननीय सदस्य ॲड. जयदेव गायकवाड, श्री.चंद्रकांत पाटील, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री मनिष जैन, प्रकाश बिनसाळे, भाई गिरकर, डॉ.दीपक सावंत, श्री.रमेश शेंडगे, भगवान साळुंखे, ॲड.आशिष शेलार, निरंजन डावखरे व डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आपले विचार या प्रस्तावावर मांडले त्याबद्दल मला खूप आनंद झाला.

सभापती महोदय, राज्य शासन या विषयाबाबत जे धोरण आणू पहात आहे त्यामध्ये माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना इनकार्पोरेट करण्याची ही संधी आहे असे मी मानतो. मानवाचे आयुष्य रोमन काळामध्ये सरासरी 18 वर्षाचे होते असे म्हणतात. कालांतराने त्यात वाढ होऊन सरासरी आयुष्य 24 वर्षे झाले. आजच्या आधुनिक काळातील वैद्यकीय सोयी सुविधांमुळे सरासरी आयुर्मान 50 ते 60 वर्षाचे झाले आहे. जसजसे वय वाढत जाते तसे निसर्गाचे त्याला समर्थन मिळत नाही, पर्यायाने शारीरिक, मानसिक विकलांगता येते. त्यातल्या त्यात आपली मुले, सोयरे विकलांगता पाहून अप्रत्यक्षपणे हात झटकतात. संस्कार कमी पडतात. संस्कार कसे वाढतील याचे खूप सुंदर वर्णन करण्यात आले.

नंतर 2 व्ही.1..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे ....

ज्येष्ठ नागरिकांच्या लोकसंख्येत मोठया प्रमाणात वाढ होत आहे. खरे म्हणजे चांगला औषधोपचार मिळू लागल्यामुळे माणसाच्या आर्युमानात वाढ झालेली आहे. सन 2011 मध्ये ज्येष्ठ नागरिकांचे वय 65 वर्षे धरले तर आज घडीला महाराष्ट्रात ज्येष्ठ नागरिकांची संख्या 1 कोटी असून यामध्ये स्त्रियांचे प्रमाण 53 टक्के असून पुरुषांची संख्या 47 टक्के आहे. एकूण लोकसंख्येत वृध्दांचे प्रमाण 8.7 टक्के होते. 1991 व 2001 मधील आकडेवारीचा विचार करता वृध्दांच्या संख्येत 14.3 टक्के इतकी लक्षवेधी वाढ झालेली आहे.

महाराष्ट्रातील 60 हून अधिक वयाच्या स्त्रियांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण 87 टक्क्यापेक्षा जास्त आहे. स्त्रियांची स्थिती आणखीनच वेगळे चित्र उभे करते. ग्रामीण भागात 60 वर्षावरील गटातील 50 टक्के महिला विधवा होत्या. पुरुष विधुरांची संख्या 12 टक्के इतकी होती. असाच फरक नागरी विभागातही आढळून येतो. नागरी आणि ग्रामीण दोन्ही विभागात 80 हून अधिक वय असणाऱ्या वृध्दांबाबत हेच प्रमाण आणखी प्रकर्षाने दिसून आले आहे. 3/4 पेक्षा अधिक स्त्रिया विधवा आहेत. नागरी विभागात 25 टक्के पुरुष विधुर तर ग्रामीण भागात 28 टक्के पुरुष विधूर असल्याचे आढळून आले आहे. वृध्दांमध्ये दोन प्रकारची दुर्बलता दिसते.

राज्यामध्ये आता संयुक्त कुटुंब पध्दती हळू हळू नष्ट होत चालली आहे. संयुक्त कुटुंब पध्दत ही आपल्या देशातील अनमोल अशी प्रथा होती परंतु मॉडर्न पध्दतीमुळे तसेच आपली प्रवृत्ती बदलल्यामुळे संयुक्त कुटुंब पध्दती बंद पडत चालली आहे.

सभापती महोदय, ज्येष्ठ नागरिकांच्या संदर्भात पाठयपुस्तकात धडे असले पाहिजेत असा उल्लेख प्रस्तावात करण्यात आलेला आहे त्यामुळे पाठयपुस्तकात ज्येष्ठांच्या संदर्भात निश्चितपणे धडे राहतील यासाठी प्रयत्न केला जाईल. व्यसन मुक्तीच्या धडयांचा समावेश पाठयपुस्तकात करण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, मुले आई वडिलांची जबाबदारी घेत नाही, आई-वडिलांचे ऋण मानत नाही. खरे म्हणजे आपली प्रवृत्ती बदलत चालल्यामुळे हे प्रकार आता वाढीस लागले आहेत. हा प्रश्न केवळ गरिबालाच आहे असे नाही, ही अस्थितरता श्रीमंत ज्येष्ठ नागरिकांना जास्त प्रमाणात भेडसाऊ लागली आहे. हा प्रश्न आता श्रीमंत आणि गरिबाच्या पलीकडचा झालेला आहे.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे ....

सभापती महोदय, ज्येष्ठ नागरिकांच्या संदर्भात 2004 मध्ये देशात कायदा झाला. त्या कायद्याचे अनुकरण राज्यशासनाने केलेले आहे. राज्य शासनाने "ज्येष्ठ नागरिकांचे धोरण 2004 भाग (1) असा कायदा केलेला आहे. यामध्ये मुख्य सचिवांच्या लेव्हलला एक कमिटी गठीत करण्यात आली होती त्यांचा रिपोर्ट तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या संदर्भात ज्या काही संघटना काम करतात त्यांच्याकडून आलेली माहिती घेऊन "ज्येष्ठ नागरिकांचे धोरण 2004 भाग (2) आणण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. मध्यंतरीच्या काळात कायद्याच्या दृष्टिकोनातून मुले आपल्या आई-बडिलांना सांभाळत नसतील तर अशा ज्येष्ठांच्या निर्वाहासाठी एक न्यायाधीकरण एसडीओ यांच्या अध्यक्षतेखाली केलेले आहे. यामध्ये एकंदर 87 अर्ज आले होते व त्यातील 57 प्रकरणे निकाली काढण्यात आली.

सभापती महोदय, बॅरिस्टर अंतुले साहेबांच्या काळात या विषयाच्या संदर्भात बरेच काम झालेले आहे. संघटित माणसांना पेन्शन मिळत होती. परंतु असंघटित माणसांना पेन्शन मिळत नव्हती. परंतु आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. ज्येष्ठ नागरिकांना संजय गांधी निराधार योजनेच्या माध्यमातून खूप चांगला फायदा मिळालेला आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या संदर्भात दोन्ही सभागृहाने चांगल्या प्रकारचा कायदा केलेला असून या कायद्याची अंमलबजावणी संपूर्ण देशात झ ालेली आहे. श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन,संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी वृध्द निवृत्ती वेतन योजना आहे. वृध्दांना अगोदर 630 रुपये अनुदान दिले जाते होते ते आता 900 रुपये करण्यात आलेले आहे. शासकीय दवाखान्यात आपण ज्येष्ठांना विनामूल्य सोयी सुविधा देत आहोत. ज्येष्ठ नागरिकांना एस.टी.मधील प्रवासामध्ये 50 टक्के सवलत देत आहोत. राजीव गांधी जीवनदायी योजना 8 जिल्हयांमध्ये लागू असून ही योजना संपूर्ण राज्यात 2/4 महिन्यात लागू होणार आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे....

अशा अनेक योजनांचा फायदा ज्येष्ठ नागरिकांना नक्कीच मिळाल्याशिवाय राहणार नाही.

मी आपणा सर्वांचा जास्त वेळ घेणार नाही. आम्ही एक धोरण आणणार आहोत. हे धोरण दीपावलीच्या पूर्वीच जाहीर होणार होते. परंतु, दिल्ली येथे केंद्रीय मंत्री आणि राज्यातील सर्व सचिवांची ज्येष्ठ नागरिक या विषयावर परिषद झाली. तेव्हा केंद्र शासनाने अशी सूचना केली की,पहिल्यांदा आमचा कायदा होऊ द्यावा नंतर मग आपण आपले धोरण आखावे. त्यामुळे आपण थांबलो होतो. परंतु, पंधरा दिवसांपूर्वीच माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांच्या बरोबर चर्चा झाली असता त्यांनी थांबण्याची आवश्यकता नाही असे सांगितले. त्यांनी हे धोरण ताबडतोब आणावे असे सांगितले. मला पूर्ण विश्वास आहे की, पुढील दोन महिन्यामध्ये हे धोरण आल्याशिवाय राहणार नाही. हे धोरण दीपावलीच्या पूर्वीच जाहीर होणार होते हे मी आपल्याला सांगू इच्छितो.

ज्येष्ठ नागरिकांची व्याख्या आपणा सर्वांना माहीत आहे. 60 वर्षे वयावरील सर्व व्यक्तींना ज्येष्ठ नागरिक समजण्यात येते . ही व्याख्या जात, वंश, लिंग, शैक्षणिक व आर्थिक दर्जा, राजकीय नाते किंवा पंथ या पासून स्वतंत्र असेल. आपण ज्येष्ठ नागरिकांचे प्रवर्ग केले आहेत. 60 ते 69 वयापर्यंतच्या व्यक्तींची कार्यक्षम वृद्धामध्ये गणना केली जाईल. 70 ते 80 वयापर्यंतच्या व्यक्तींची वृद्ध व्यक्ती म्हणून गणना करण्यात येईल आणि 80 वर्षाहून अधिक व्यक्तींची अतिवृद्ध म्हणून गणना करण्यात येईल.

वृद्धांना एकाकी पडू न देणारा समाज निर्माण करणे व राज्य घटनेने देऊ केलेले वृद्धांचे हक्क शाबूत ठेवणे हे आपल्या धोरणातील उद्दिष्ट आहे. या संबंधाचा उल्लेख भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 41 मध्ये करण्यात आला आहे. तसेच सेवानिवृत्ती पूर्व तयारी कशी करावी यासंबंधातील अवेरनेसचा कार्यक्रम राबविणार आहोत. एवढेच नव्हे तर ज्येष्ठ नागरिकांसाठी मनोरंजन व विरंगुळा करण्यासाठी योजना आखणार आहोत. पुढच्या काळात आमचे यावर खूप मोठे कॉन्स्ट्रेशन राहणार आहे. वयोवृद्ध लोकांचे मनोरंजन करणे आवश्यक असते. त्यांना विरंगुळ्याची आवश्यकता असते.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18-07-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) WW 2

BGO/ D/ 15:00

श्री.शिवाजीराव मोघे....

आम्ही शहरांचा वृद्ध मित्र म्हणून विकास करण्याची संकल्पना मांडणार आहोत. हे देखील आम्ही नवीन धोरणामध्ये आणण्याचा प्रयत्न करणार आहोत. ज्येष्ठ नागरिकांचा आरोग्याचा विषय हा मोठा आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य विषयक धोरण आणण्यास आपण सुरूवात केली असून ते पुढच्या काळात अधिक गतिमान करण्याचा विचार आहे. तसेच, ज्येष्ठ नागरिकांसाठी आर्थिक सुरक्षा धोरण देखील आणणार आहोत. हे फार महत्त्वाचे आहे. काल नटसम्राट नाटकातील उदाहरण देण्यात आले. ते अगदी खरे आहे. ताट द्या, पण पाट देऊ नका. जो दुसऱ्यावर अवलंबून आहे त्याने आपली प्रॉपर्टी मुलाला दिली तर तो उघड्यावर पडण्याची शक्यता असते. त्यामुळे तो असुरक्षित राहतो. त्या दृष्टीने देखील त्याने काळजी घेतली पाहिजे. त्यासाठी काही तरतुदी करता येतील काय हे देखील पुढच्या धोरणामध्ये आम्ही आणण्याचा प्रयत्न करणार आहोत. जो वृद्ध आहे त्याला अल्पदराने घर उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. घरविक्री, हस्तांतरण, मालमत्ता करभरणा इ.गोष्टी त्वरित होण्याबाबत संबंधितांना सूचना करण्यात येतील. एवढेच नव्हे तर ज्येष्ठ नागरिकांच्या जीविताचे आणि मालमत्तेचे संरक्षण करणे महत्त्वाचे आहे. कारण ज्येष्ठ नागरिकाला स्वत:च्या जीवाचे व मालमत्तेचे प्रोटेक्शन वय वाढल्यामुळे करता येत नाही. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना कायदेविषयक सल्ला व मदत देण्याचा प्रयत्न देखील करण्यात येणार आहे.

आज ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नांबाबत समाजात जागृती निर्माण करणे गरजेचे आहे. ज्येष्ठ नागरिकांबाबत जागृती करण्यासाठी 15 जून - ज्येष्ठ नागरिक छळ प्रतिबंधन जागृती दिवस, 21 सप्टेंबर - जागतिक अल्झायमर दिवस, 1 ऑक्टोबर - जागतिक ज्येष्ठ नागरिक दिवस पाळण्यात येणार आहे.

ज्येष्ठ नागरिकांसाठी आयुक्तालय असणे आवश्यक आहे अशी अनेकांची मागणी आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी ज्येष्ठ नागरिक आयुक्तालयाची स्थापना करण्याचे आमचे नियोजन राहणार आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ पूर्वी श्री.भारवि.. 15:05

श्री.शिवाजीराव मोघे....

तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणकारी योजनांचा या धोरणामध्ये समावेश आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी चांगल्या प्रकारचे धोरण आणण्याचा शासन प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, आपण ज्येष्ठ नागरिकांना तत्काळ आरोग्य सुविधा आणि सुरक्षा मिळण्यासाठी हेल्प-लाईन सुरु करणार आहोत. त्याच बरोबर त्यांना स्वस्त दरात गृह कर्ज तसेच अन्य सुविधा देण्याचा प्रयत्न करणार आहोत.

सभापती महोदय, ज्येष्ठ नागरिकांना व्यसनाधीन व्यक्तींकडून मोठ्या प्रमाणावर त्रास होतो असा मुद्दा मी कॉन्फरन्समध्ये मांडला होता. माझा हा मुद्दा त्यांना आवडला. घरातील व्यक्ती दारु पिऊन आल्यास भांडण करतात, वाद निर्माण करतात त्याचा त्रास घरातील ज्येष्ठ नागरिकांना होतो. लहान मुले, स्त्रिया आणि ज्येष्ठ नागरिकांना व्यसनाधीन लोकांचा फार त्रास होतो. तेव्हा व्यसनाधीन मुक्त समाज कसा निर्माण करता येईल यासाठी आपण प्रयत्न केला पाहिजे. तसे पाहिले तर ज्येष्ठ नागरिक हा विकर माणूस आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या सनदेचा उल्लेख केला त्याचा देखील आम्ही या धोरणामध्ये विचार करणार आहोत.

सभापती महोदय, ज्येष्ठ नागरिकांचे म्हणणे आहे की, समाजाने आम्हाला कमजोर समजू नये. आम्ही चांगले मजबूत आहोत. आमच्याकडे जास्त अनुभव असल्यामुळे आम्ही अजूनही चांगल्या प्रकारे काम करु शकतो. तेव्हा ज्येष्ठ नागरिकांच्या संघटनेचा समाजासाठी चांगल्याप्रकारे उपयोग करुन घेणे हे देखील या धोरणाचे वैशिष्टय आहे. आपण जे धोरण करणार आहोत त्यामध्ये झाडे लावण्याचा मोठा कार्यक्रम आहे, व्यसनमुक्तीचा कार्यक्रम आहे, चांगले संस्कार घडविण्याचा कार्यक्रम आहे.

सभापती महोदय, मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, ज्येष्ठ नागरिकांच्या तालुका-तालुका पातळीवर संघटना आहेत. एवढेच नाही तर आता गावा गावांमध्ये देखील संघटना झालेल्या आहेत. ज्येष्ठ नागरिकांच्या एक संघटनेने माननीय श्रीमती सोनिया गांधी यांना भेटून ज्येष्ठ नागरिकांचे वय 60 वर्षे करावे असे सांगितले आहे. सांगण्याचा मुद्दा एवढाच की, हा विषय अतिशय महत्वाचा आहे आणि त्यादृष्टीने सर्वांनी काम केले पाहिजे.

.2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे....

सभापती महोदय, शेवटी एवढेच सांगू इच्छितो की, सरकारने ज्येष्ठ नागरिकांच्या बाबतीत धोरण आणले, त्यांच्यासाठी काही कायदे केले तरी आपणास ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न मोठ्या प्रमाणात सोडवावयाचे असतील तर लोकचळवळीची अत्यंत आवश्यकता आहे. कारण हा मोठा विषय आहे.

सभापती महोदय, सर्वात महत्वाची बाब म्हणजे आपण लहान मुले, स्त्रिया, ज्येष्ठ नागरिकांना प्रेम दिले पाहिजे. प्रेम दिल्याने आपणास आनंद मिळेल आणि ज्येष्ठ नागरिकांना देखील आनंद मिळेल. तेव्हा सर्वांना प्रेम द्यावे असे सांगून मी माझे उत्तराचे भाषण पूर्ण करतो.

--------

..3.

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, एका अतिशय महत्वाच्या विषयावर या ठिकाणी चर्चा घडवून आणली. या चर्चेमध्ये दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी आपल्या अनुभवातून आणि आपल्या माहितीतून हा विषय अतिशय विस्ताराने मांडला. माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात बऱ्याच गोष्टींचा उल्लेख केला. मी या ठिकाणी एक गोष्ट कबूल करतो की, माननीय मंत्री महोदयांच्या मनामध्ये ज्येष्ठ नागरिकांबद्दल शंभर टक्के आंतरिक जिव्हाळा असल्याचे दर्शन त्यांच्या उत्तराच्या भाषणातून झाले.

सभापती महोदय, आपला हेतू कितीही चांगला असला तरी ज्येष्ठ नागरिकांच्या संदर्भात ज्या योजना राबवावयाच्या आहेत ते राबविणारे अधिकारी आपला फायदा व्हावा अशा पध्दतीने वागणार असतील तर आपण कितीही चांगले धोरण आणले, कितीही चांगली चौकट बांधून दिली तरी त्यातून ज्येष्ठ नागरिकांना काही न्याय मिळणार नाही. परंतु त्या यंत्रणेचे पुन्हा वाभाडे काढायला आपल्याला वेगवेगळ्या व्यासपीठावर जावे लागेल.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ पूर्वी श्री.अजित.... 15:10

श्री.हेमंत टकले....

ही सतर्कता ज्येष्ठ नागरिकांच्या दृष्टीने पाळणे अत्यंत आवश्यक आहे.

या प्रस्तावातील ज्या दोन-तीन महत्त्वाच्या गोष्टी होत्या त्यांचा विचार ज्येष्ठ नागरिकांच्या धोरणात करण्याचे माननीय मंत्र्यांनी सांगितले आहे. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, केंद्र सरकार ज्येष्ठ नागरिकांसाठी धोरण जाहीर करणार आहे. राज्याचे धोरण केंद्र सरकारच्या धोरणापूर्वीच जाहीर करुन त्याची अंमलबजावणी लवकरात लवकर सुरु करण्याचे आश्वासन माननीय मंत्र्यांनी दिल्यामुळे तेच या चर्चेचे खऱ्या अर्थाने फलित आहे असे मला वाटते. माननीय मंत्र्यांनी वयाच्या 60 व्या वर्षापासून ज्येष्ठ नागरिकांची गणना केली जावी, तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या ज्या तीन कॅटॅगरी सुचविल्या आहेत त्या सुध्दा मला योग्य वाटतात. तसेच दुसरी बाब अशी की, 80 वर्षांपुढील जे वृध्द आहेत त्यांना घरातून नाकारले जाते आणि ते वृध्द इतर संस्थांकडे मदतीसाठी गेले तर त्या संस्था सुध्दा त्यांच्यासाठी काही करु शकत नाही अशी स्थिती आहे. त्यामुळे त्यांच्यापुढे जगावे की मरावे असा प्रश्न निर्माण होतो. अशा लोकांचा ज्येष्ठ नागरिकांच्या धोरणामध्ये 'विशेष घटक' म्हणून विचार करावा.

महोदय, निराधार असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना पेन्शन रुपाने जे अनुदान देण्यात येते त्या अनुदानात औषधोपचाराचा खर्च तसेच आजच्या महागाईचा विचार करता भरीव वाढ करण्याबाबतची घोषणा माननीय मंत्र्यांनी उत्तराच्या भाषणात केली असती तर आनंद झाला असता. या चर्चेच्या निमित्ताने सदस्यांच्या भावना समजून घेऊन ज्येष्ठ नागरिकांसाठी खूप काही चांगले करण्याची सुरुवात माननीय मंत्र्यांच्या माध्यमातून होत आहे. त्यामुळे या विषयाला न्याय मिळाला असे मला वाटते. भविष्यात हा विषय प्रस्ताव वा ठरावाद्वारे सभागृहात चर्चेला आणावाच लागू नये अशी अपेक्षा व्यक्त करतो व येथेच थांबतो.

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, सन 2013 चे वि.प.वि.क्रमांक 8 - महाराष्ट्र विद्यापीठ (दुसरी सुधारणा) हे विधेयक सोमवार दि.22 जुलै, 2013 रोजी पुन्हा चर्चेला घेण्यात येईल. तसेच आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या म.वि.स. नियम 260 च्या प्रस्तावाबाबत माननीय सभापती सोमवारी निर्णय घेतील.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती**....

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक सोमवार, दिनांक 22 जुलै, 2013 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 12 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 22 जुलै, 2013 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही